म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल-वाङ्मय
दा. क्र. ४३६३



BVBK-0404363

# आधुनिक कवि

पु. १ ले

अनुक्र. २९६५३
विभाग वा. वा
क्रमांक १९२८
नों. दि. ३-८-६२

## या पुस्तकांतील
## लेखकांचीं कांहीं वाचनीय पुस्तकें

केशवसुत

१. केशवसुतांची कविता

गोविंदाग्रज

१. वाग्वैजयंती

भा. रा. तांबे

१. तांबे यांची कविता

बालकवि

१. बालकवींची समग्र कविता

बा. भ. बोरकर

१. जीवन-संगीत
२. दूध-सागर
३. आनंद-भैरवी

BVBK-0404363
... ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ४३६३ नों. दि. ...........
वि. वा. वा. क्र. ...

# शिखरे-वाङ्मय

## चरित्रें

म. गांधींचें चरित्र
गांधी–जीवन–कथा
राष्ट्र–पिता गांधीजी
गांधी–रण–गीता
राष्ट्र–जनक टिळक
लोकमान्य टिळक
सुधारकाचार्य आगरकर
डॉ. राधाकृष्णन

## प्रबंध

गांधीजींचें रामराज्य
साम्राज्य व स्वराज्य
सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म
आजकालचे साहित्यिक

## कादंबरी

थोरली आई
आईची कृपा
भावनांचा नाच
जिवलग

## नाटकें

वैष्णवजन
आठ साल

## लघुकथा

क्रांति–किरण
गंगेचे थेंब

'मराठीचे पंचप्राण' साहित्य-माला

(११)

# आधुनिक कवि

भाग १ ला

लेखक

श्री. दामोदर नरहर शिखरे,
एम्. ए.

संग्रहालय
२९६९३
वा.वा.
७९२४
३-७-६७

म. ई. ले. आपे, कार्यालय, सातारा.
वा. क्र. ४३६३ नों. दि.
वि. वा. वा.

BVBK-0404363

मूल्य १४ आणे

प्रकाशक :
न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.
दि टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि.,
७७ शनिवार पेठ, पुणें २ करितां.

आवृत्ति पहिली : १९५३
मुखपृष्ठ चित्रकार–दीनानाथ दलाल
अंतर्गत चित्रकार–जि. भि. दीक्षित

मुद्रक :
य. गो. जोशी, बी. ए. (ऑ.)
आनंद मुद्रणालय,
१९६।४६ सदाशिव, पुणें २.

# म नो ग त

'मराठी असे आमुची मायबोली' असें आपण उंच स्वरांत गातों. आणि तें खरेंच आहे. जशी मातृभूमि तशीच मातृभाषा. दोघीहि सारख्याच पूज्य, सारख्याच अभिमानार्ह. पण मातृभूमीचें स्वरूप आपण आपल्या डोळ्यांनीं कधीं पाहिलें आहे ? आपल्या राष्ट्राच्या किती अंगांचें प्रत्यक्ष दर्शन आपण घेतलें आहे ? त्या 'सुजला—सुफला' भारतभूमीच्या चरणावर आपण किती वेळां खेळलों आहों ?—तिच्या अंकावर किती वेळां लोळलों आहों ? तीच अनास्था, तीच उपेक्षा तेंच अज्ञान आपणां बहुतेकांचें मातृभाषेच्या बाबतींतहि नसतें काय ?

मराठीच्या आरंभापासूनचा इतिहास आपल्याला कितीसा माहीत असतो ? निदान प्रमुख लेखक व ठळक कवि यांची तोंडओळख तरी आपल्या? पैकीं—सुशिक्षितांपैकीं--पदवीधरांपैकींहि किती जणांस कितीशी असते - मराठी साहित्याची धनदौलत कोणती व किती आहे याचा स्थूल परिचय तरी आपल्याला असावयास नको काय ? थोरथोर ग्रंथकारांच्या अक्षर-कृति-निदान त्यांतील सारभूत वचनें तरी—आपल्या स्मृतींत घोळलीं जावयास नकोत काय ?—आपल्या जिव्हेवर खेळलीं जावयास नकोत काय ?

या दोन्ही मातांकडे आपलें आजवर दुर्लक्ष झालें, याचें मुख्य कारण म्हणजे आपलें पारतंत्र्य. इंग्लंड देशाचा व इंग्रजी भाषेचा पगडा आपल्या साऱ्या जीवनालाच झाकोळून टाकीत होता. सुदैव असें कीं, आतां पारतंत्र्याचा तो अंधार पार नाहींसा झाला आहे. पूर्ण स्वातंत्र्याचीं किरणें राष्ट्राच्या सर्वांगावर नाचत आहेत. मातृभाषेला प्राथमिक शिक्षणा-पासून अंतिम पदवीपर्यंत सर्वत्र संचार करण्याचें स्वातंत्र्य लाभलेलें आहे. शिक्षणाच्या साद्यंत अभ्यासक्रमांत मराठीला मानाचें स्थान मिळालेलें आहे. शिक्षणाचें माध्यम होण्याचा तिचा नैसर्गिक हक्कहि तिला सर्वत्र सत्वरच प्राप्त होईल अशीं सुचिन्हेंहि दिसत आहेत.

शाळांत व महाविद्यालयांत मराठीचा मूलग्राही व व्यापक अभ्यासक्रम आंखून दिला जातो. परीक्षेंत विद्यार्थ्यांकडूनहि मोठमोठ्या अपेक्षा केल्या जातात. पण त्याला पोषक अशीं पुस्तकें आहेत कोठें ? थेट महानुभावा-पासून आजच्या लेखकांपर्यंत मराठी वाङ्मयाची वाढ कशी झाली, याचें साधार ज्ञान देणारे ग्रंथ किती आहेत ? श्री. वि. ल. भावे यांचें 'महाराष्ट्र सारस्वत' किंवा श्री. ल. रा. पांगारकर यांचा 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' हे ग्रंथ मोठ्या तोलामोलाचे आहेत हें निर्विवाद. पण त्यांच्या ग्रंथांची अखेर स्वराज्याच्या समाप्तीपाशींच झालेली आहे. पुढच्या काळाला तसे प्रकाशमान लेखक केव्हां लाभणार ? तोंवर ही छोटीशी पणती लावण्यास मी पुढें झालों आहें.

आरंभापासून अद्ययावत् अशा मराठी साहित्याचा परिचय मूलाधारासह करून देण्याचा विचार माझ्या मनांत बराच काळ घोळत होता. पण 'उत्पद्यन्ते विलीयन्ते लेखकानां मनोरथाः' अशी स्थिति प्रकाशकाचे अभावीं होते. सध्यांचा काल प्रकाशनास प्रतिकूल--त्यांतहि अशा ग्रंथाच्या प्रकाशनास तर अधिकच बिकट. पण 'दी टीचर्स आयडियल पाब्लिशिंग हाऊस लि.'चे श्री.कुलकर्णी यांनीं दूरदृष्टि ठेवली व हिंमत धरली; म्हणून ही माला लिहि-ण्यास मी आतां प्रवृत्त झालों. या मालेची योजना अशी कीं, महाराष्ट्र-भाषेचे प्रतिनिधि असे ठळक-ठळक ग्रंथकार निवडावयाचे आणि आधीं त्यांचें चरित्र थोडक्यांत देऊन त्यांच्या साहित्याचें गुण-ग्रहण करावयाचें. त्या गुणांचें द्योतक असे प्रत्यक्ष त्या ग्रंथकाराचे छोटेछोटे वेचेहि, जरुरी-पुरते, मधूनमधून द्यावयाचे. सुमारें साठ प्रमुख लेखकांच्या कृतींचा आस्वाद अशा बारा पुष्पांतून देण्यांत येईल. त्या बारा पुष्पांच्या सेवनानें मराठी साहित्याचें आरंभापासून आतांपर्यंतचें स्वरूप स्थूलमानानें तरी समजून यावें अशी माझी अपेक्षा आहे.

पन्नास-साठ सरस्वती-पुत्रांचा सत्कार या बारा पुष्पांच्या मालेनें मी करणार असलों, तरी ज्यांचा समावेश मीं तींत करूं शकलों नाहीं अशा थोरथोर साहित्यिकांच्या रांगा माझ्या डोळ्यापुढें दिसत आहेत. ते शारदा-

भक्त मजवर डोळे वटारणार नाहींत अशी मी उमेद बाळगतों. कारण ते माझी अपात्रता व परिस्थितीची मर्यादा जाणण्याइतके सुजाण व उदार आहेत. शक्य होईल तेव्हां त्या सर्वांसाठीं ताटपाट मांडण्याची माझी उभारी आहे. संकल्प सहस्रभोजनाचा आहे, सिद्धता आज तरी साठांचीच आहे.

ज्या वाग्भटांना मी आंवतणें दिलीं, त्यांनाहि मी पूर्ण संतुष्ट कोठें करूं शकलों ? सहस्रावधि ओंव्या व अभंग रचणाऱ्या संतकवींचा साक्षात्कार अवघ्या वीस पानांत मला कसा करून देतां येणार ? बारा हजाराहून अधिक पृष्ठांचें वाङ्मय रचणारे साहित्य-सम्राट मराठीच्या राज्यांत अनेक झाले; त्यांचीं हीं केवळ 'क्षण-चित्रें' ( स्नॅपशॉट ) होत. पण मूळ वस्तूची यथार्थ कल्पना देण्यास ती समर्थ ठरतील असा विश्वास मला वाटतो.

माध्यमिक विद्यालयांतील आठवी, नववी व दहावी या यत्तांतील विद्यार्थ्यांचें जीवन म्हणजे मूर्तिमंत महत्वाकांक्षा. आपले मित्र, आपला देश, आपला धर्म, आपलें ध्येय यांचीं मनोरम काल्पनिक दृश्यें मनासमोर उभीं करून हे विद्यार्थी आपल्या या उदात्त व भव्य कल्पना–सृष्टींत रममाण होत असतात. जीवनाच्या या सुवर्णकाळांत मराठी भाषेंतील साधुसंत व इतर प्रमुख साहित्यिक यांची ओळख होणें अत्यंत महत्त्वाचें आहे. ही गोष्ट ध्यानांत ठेवून त्या विद्यार्थ्यांसाठीं ' पुरवणी वाचन ' म्हणून हीं पुस्तकें सुबोध रीतीनें रचलेलीं आहेत. शालेय दृष्टीनें पुस्तकांची उपयुक्तता वाढावी म्हणून प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं प्रश्न वगैरे जोडण्याचें कार्य प्रा. वा. दा. गोखले एम्. ए., बी. टी. यांनीं आस्थेनें केलें, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

या पुस्तकांत ग्रंथकारांचें समालोचन व गुण-दोष-विवेचनहि यथावसर केलेलें असल्यानें महाविद्यालयांतील त्यांच्या ' थोरल्या भावंडांना ' व सर्व-सामान्य वाचकवर्गालाहि हीं पुस्तकें उपयुक्त वाटतील अशी आशा मी धरतों.

' महात्मा ' मासिक<br>नातूबाग पुणें २.

**दा. न. शिखरे.**

● ● ●

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | केशवसुत | १– ३७ |
| २. | गोविंदाग्रज | ३८– ६९ |
| ३. | राजकवि तांबे | ७०– ९१ |
| ४. | बाल-कवि | ९२–१०३ |
| ५. | बा. भ. बोरकर | १०४–११२ |

# केशवसुत : : : : १

"युग-प्रवर्तक' ही उच्च पदवी मराठीच्या नव-काव्य-सृष्टींत 'केशवसुतां'स यथार्थपणें लावली जाते. मराठीचे 'आद्य कवि' म्हणून ज्ञानदेवांना प्रतिष्ठा लाभलेली आहे, 'आद्य निबंधकार' असा मान मालाकार चिपळूणकरांना प्राप्त झालेला आहे, 'आद्य कादंबरीकार' असा गौरव हरिभाऊ आपटे यांचा झाला आहे, 'आद्य विनोदकार' हें स्थान श्री. कृ. कोल्हटकर यांनीं मिळविलें आहे, 'आद्य इतिहास-संशोधक' हें पद राजवाडे यांना अर्पण करण्यांत येतें, 'आद्य कोशकार' हा किताब डॉ. केतकरांना चिकटलेली आहे, 'आद्य नाटककार' या नात्यानें आण्णासाहेब किर्लोस्करांनीं कामगिरी बजावली आहे; 'आद्य लघुनिबंधकार' म्हणून प्रा. फडके यांनीं कीर्ति कमावली आहे, त्याचप्रमाणें 'आद्य-नवकवि' ही थोरवी केशवसुतांना लाभलेली आहे. आपल्या काव्याचें स्वतंत्र लेणेंच त्यांनीं कोरलें आहे. भाषा, विषय, विचार-या सर्व बाबतींत अगदीं अभिनव असा एक काव्यप्रवाह सुरू करण्याचें श्रेय त्यांना आहे. गडकऱ्यासारखे कैक कवि आपण केशवसुतांचे "सच्चे चेले" आहोंत, म्हणून अभिमानानें सांगतात.

## सहा काव्य-खंड

सुमारें सहाशें वर्षांच्या काळांत मराठी काव्य-सृष्टीमध्यें स्थूल मानानें सहा युगें निर्माण झालीं, म्हटलें तरी चालेल. ज्ञानदेवादि संत-कवींनीं

---

[ केशवसुतांनीं आपलें छायाचित्र कधींच काढूं दिलें नाहीं; म्हणून तें येथें देतां आलें नाहीं. ]

संस्कृतविरुद्ध बंडाचा झेंडा फडकवून मराठी काव्याचें स्वराज्य स्थापन केलें. संत–काव्याचे विषय पारमार्थिक, भाषालंकारादि बाह्यांगाकडे कांहींसें दुर्लक्ष पण भावनेची तळमळ तीव्र, त्यामुळें जिवंत झऱ्याचा खळखळाट त्या काव्यांत ऐकूं येतो. ज्ञानेश्वर व तुकाराम यांच्या अमृतमधुर काव्याला तर जगाच्या वाङ्मयांतहि तोड क्वचित्‌च सांपडेल. दुसरा काल-खंड पंडित-कवींचा. वामन, मोरोपंत, रघुनाथ वगैरे पढिक विद्वानांनीं पौराणिक आख्यानें सुसंस्कृत मराठीमध्यें रंगवून महाराष्ट्र–शारदेला बहुमोल अलंकारांनीं नटविलें. त्यानंतर आले शाहीर. प्रभाकर-होनाजी–परशराम वगैरे स्वराज्यांतील या कवींनीं आपल्या काव्यांत एकीकडे वीरश्रीचें रणशिंग फुंकलें, तर लावण्यामध्यें अस्सल मराठी शृंगाराचें वारें खेळविलें; इंग्रजी अंमलामध्यें आंग्ल व संस्कृत काव्याचे पडसाद मराठीमध्यें उठविण्याचें कार्य चौथ्या कालखंडांत कृष्णशास्त्री चिपळूणकर, कुंटे, लेंभे, मोगरे, इत्यादि कवींनीं केलें. पांचवा काव्य–विभाग उघडण्याचें श्रेय केशवसुतां-कडे आहे.

निबंधद्वारें आगरकरांनीं सामाजिक सुधारणेचा पुरस्कार जसा हिरीरीनें केला, तसाच केशवसुतांनीं आपल्या काव्याच्या ‘ तुतारी ’ तून आवेशानें केला. गडकरी, माधव ज्यूलियन, यशवंत इत्यादि नवकवींनीं तोच सामाजिक क्रांतीचा संदेश आपापल्या काव्यांतून दिला. त्याच वेळीं तांबे, बालकवि, टिळक, बोरकर इत्यादि सौंदर्यवादी कवींच्या काव्याचा प्रवाहहि समांतर वहात होता. या नवकाव्याचे विषय पारमार्थिकाऐवजीं लौकिक असून त्यांत देवाऐवजीं मानवाला महत्त्व दिलेलें आढळतें. मानवाचें सुखदुःख, त्याचे शृंगार-पराक्रम, त्याचे न्याय-अन्याय या सर्वांवर आपल्या काव्याचें मंदिर नवकवींनीं उभारलें आहे. त्यानंतरचा काल-खंड नुकताच सुरू झालेला दिसत आहे. मर्ढेकर, करंदीकर, भावे, रेगे, मुक्तिबोध इत्यादि ‘ अत्याधुनिक कवीं ’ च्या कृति क्षितिजावर लुकलुकूं लागल्या आहेत. त्यांचें तेज अद्याप पूर्णपणें प्रगट व्हावयाचें आहे, त्यांचा आकार अजून निश्चित व्हावयाचा आहे व त्यांची दिशा यापुढें नक्की होणार आहे.

## कीर्तिमान बंधु

केशवसुत हें टोपण नांव धारण करणाऱ्या कवीचें खरें नांव कृष्णाजी केशव दामले. ' कुणी तरी ', ' जगन्मित्र ' अशींहि टोपणनांवें कृष्णाजीपंतांनीं आपल्या प्रारंभींच्या कवितांखालीं दिलीं होतीं. पण ' केशवसुत ' हेंच टोपणनांव अखेर तरलें. कृष्णाजपिंतांचा जन्म कोंकणांत झाला. रत्नागिरी जिल्ह्यांतील मालगुंड हें त्यांचें जन्म–ग्राम. त्याचाच गौरव त्यांनीं 'माल्यकूट' या नांवानें आपल्या एका कवितेंत केला आहे. त्या गांवीं ता. १५ मार्च १८६६ रोजीं कृष्णाजीपंत जन्मले. त्यांचे वडील मराठी शाळेंत शिक्षक होते. त्यांना बारा मुलें झालीं. त्यांत केशवसुत पांचवे. त्यांचे तीन बंध बुद्धीनें चलाख व शिक्षणानें अग्रेसर असून नांवालौकिकास चढले होते. वडील बंधू श्रीधरपंत यांनीं मॅट्रिकच्या परीक्षेंत 'जगन्नाथ शंकरशेट' ही संस्कृतची शिष्यवृत्ति संपादन केली व ते पुढें बडोदें कॉलेजांत प्राध्यापक झाले. दुसरे दोघे बंधूहि प्राध्यापकाच्या पदापर्यंत जाऊन पोचले होते, त्यांपैकीं मोरोपंतांनीं " शास्त्रीय मराठी व्याकरण " हा प्रचंड व महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहून कीर्ति कमावली; तर सीतारामपंतांनीं राजकारणांत भाग घेऊन ' सी. के. दामले ' हें आपलें नांव मान्यतेस चढाविलें. ' राष्ट्रमत ' हें दैनिक व ' राजकारण ' हें साप्ताहिक–अशीं दोन वृत्तपत्रें त्यांनीं चालविलीं; शिवाय काव्य, कादंबरी, विनोद, चरित्र इत्यादि क्षेत्रांतहि त्यांनीं भर घालून लौकिक संपादिला. पण या तिन्ही भावांपेक्षां शिक्षणांत मागें, लेखनांत कमी व ऐश्वर्यांत उणे असूनहि केशवसुतांनीं सर्वांच्या आदरास पात्र व स्फूर्तीस कारण व्हावी अशी अलौकिक काव्य–संपदा निर्माण करून आपलें नांव चिरंजीव केलें.

## निराशेचें मूळ

केशवसुतांना आपल्या आयुष्यांत शिक्षणाचा, धनाचा वा मानाचाहि लाभ झाला नाहीं. त्यांचा कविता–संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर बारा वर्षांनीं प्रसिद्ध झाला–आणि मग त्यांच्यावर स्तुतिस्तोत्रांच्या सहस्रधारा कोसळूं लागल्या. शिक्षणाची मजल पाहिली, तर मॅट्रिकच्या परीक्षेनेंच त्यांची

तीन वर्षें खालीं. दोनदां अपयश पदरांत पडलें, तरी ते तिसऱ्यांदा मॅट्रिकला बसले व एकदांचे उत्तीर्ण झाले. शाळेंत त्यांचें वर्तन एकलकोंडें व वृत्ति अबोल असे. त्यामुळें संस्कृतचे प्रि. आपटे यांनीं त्यांना 'दुर्मुखलेला' असें म्हणून एकदां हिणविलें. त्याबरोबर त्यांच्या अंगांतील काव्य-शक्ति डिवचली गेली व तिनें सिंह–गर्जना केली कीं, " माझ्या दुर्मुखल्या मुखामधुंनी या चालावयाचा पुढें । आहे सुंदर तो सदा सरस वाङ्‌निष्यन्द चोहींकडे. ॥"

बडोदें, वर्धा व नागपूर येथें शिक्षणाची त्रिस्थळी यात्रा त्यांना घडली ! नागपूर येथें रे. टिळकांची मैत्री त्यांनीं जोडली. १८८४सालीं केशवसुत पुणें येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें विद्यार्थी म्हणून आले. तेथें त्यांना टिळक–आगरकरांसारखे गुरु लाभले. त्या शाळेतून ते वयाचे २३ वे वर्षीं, १८८९ सालीं, मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या वेळीं त्यांचे धाकटे बंधु मोरोपंत बी. ए. च्या वर्गांत होते ! नंतरचीं सात वर्षें केशवसुतांनीं मुंबईस नोकरी करण्यांत घालविलीं. आपले लहानमोठे बंधु शारदेच्या दरबारांत मानाचें स्थान मिळवीत आहेत, पण आपल्याला मात्र मॅट्रिकच्या प्रवेश–द्वाराशींच टकरा घ्याव्या लागत आहेत, यामुळें केशवसुतांच्या चित्तांत निराशेचा जो अंधार पसरला, तो घनदाट करण्यासारखाच कटु अनुभव त्यांना मुंबईस आला.

## नोकरीच्या बेड्या

शिक्षणाचे पंख कापून त्यांनीं नोकरीच्या बेड्या पायांत अडकाविल्या. पण ती नोकरी तरी एकच रहावी कीं नाहीं ? सात वर्षांत ते कधीं मिशनच्या शाळेंत शिक्षक म्हणून काम करीत होते, तर कधीं 'ज्ञानोदय' कचेरींत कारकुनी करीत, तर कधीं कमीसीरएट ऑफिसमध्यें हंगामी नोकरी पार पाडीत. मुंबईची महागडी रहाणी. आणि हंगामी नोकरीचा पगार पंचवीस–तीस रुपये. त्यामुळें आर्थिक ओढाताणहि या कवीला सोसावी लागली. शिक्षण नाहीं, संपत्ति नाहीं, स्थिर व्यवसाय नाहीं, मान नाहीं— अशा विपरीत परिस्थितीमुळेंच कीं काय त्यांचें मन कधीं कधीं असे खिन्न उद्गार काढी—

"जन्मा येऊनि मीं उगा शिणविलें आई ! तुला हाय गे।
ताता ! भागविलें तुला फुकट मी मत्पोषणीं हाय रे॥

पुढें मुंबईस प्लेग झाला. त्यामुळें आमच्या कवीला खो बसला. ते खानदेशांत गेले. तेथें १९०३ सालपर्यंत त्यांनीं नोकरी केली. नंतर धारवाड येथील हायस्कूलांत शिक्षक म्हणून ते लागले. कोठें खानदेश व कोठें कर्नाटक ! पण पोटासाठीं त्यांनीं तेथें धांव घेतली. तिकडेहि प्लेगनें कहर उडविला. हुबळी येथें गेले असतांना केशवसुतांना प्लेगनें गांठलें; आणि ता. ७ नोव्हेंबर १९०५ रोजीं, आपलें केवळ काव्य-धन मागें ठेवून, ते स्वर्गीं निघून गेले. त्यांची पत्नीहि त्यांच्या पश्चात् प्लेगनें आठ दिवसांनींच दिवंगत झाली. आपलें छायाचित्रसुद्धां केशवसुतांनीं आपल्या मागें ठेवलें नाहीं.

## नवा संप्रदाय

केशवसुतांना अवघें ३९ वर्षांचेंच आयुर्मान लाभलें. प्रिं. आगरकरां-प्रमाणेंच त्यांनीं सामाजिक क्रांतीचें निशाण हातीं धरलें, तीव्र तळमळीनें जीर्ण रूढीवर हल्ले चढविले आणि आवेशानें व आत्मविश्वासानें समाजांत नवचैतन्य संचरून दिलें. हें सुदैवी साम्य येथेंच संपतें तर ? पण दुर्दैव असें कीं, हे दोघेहि श्रेष्ठ वाग्वीर आपल्या वयाच्या अवघ्या ३९ वे वर्षींच मृत्युमुखीं पडले. या आपल्या अल्पायुष्यांत केशवसुतांनीं एकंदर सतरा वर्षें काव्य-लेखन केलें. विद्यार्थीदशेंत त्यांनीं एक नाटक लिहिलें होतें पण तें अप्रसिद्ध आहे. त्यांची पहिली कविता 'खिडकीकडे मौज पहावयास' ही १८८५ सालीं प्रसिद्ध झाली आणि 'हरपलें श्रेय' ही शेवटची कविता १९०५ सालीं, निधनापूर्वीं सुमारें सहा महिने, रसिकांच्या हृदयांत प्रविष्ट झाली. त्यांनीं एकूण १३२ कविता लिहिल्या. त्यांपैकीं सुमारें वीस संस्कृत व इंग्रजी भाषांतरें आहेत. उरलेल्या कवितांपैकी वीस सृष्टिवर्णनपरें असून पस्तीस कवि व काव्य यांना वाहिलेल्या आहेत. केशवसुतांच्या कवितांची संख्या थोडी असली तरी त्यांचे गुण नावीन्याचे व बहुमोलाचे आहेत. कांहीं प्रासंगिक व वैयक्तिक कविता सोडल्यास त्यांच्या इतर कविता

महाराष्ट्र शारदेला चिरकाल भूषणभूत ठरणाऱ्या आहेत. 'सतारीचे बोल' 'तुतारी' 'झपूर्झा,', 'म्हातारी' 'हरपलें श्रेय'—अशीं एकाहून एक सरस, अभिनव, आवेशपूर्ण व तत्त्वगर्भ कवनें त्यांच्या लेखणींतून निघालीं.

## सुभाषितांच्या सरी

हीं केवळ पांच कवनें पाहिलीं तरी ती पंचनद्यासारखीं भव्य व गंभीर वाटतात. महाबळेश्वराहून उगम पावणाऱ्या कृष्णा, वेण्या, सावित्री इत्यादि पांच नद्या जशा महाराष्ट्राची जमीन सुपीक बनवून त्याच्या धारण-पोषणास आधारभूत होतात; तशाच केशवसुतांच्या या पांच कवितांनीं आधुनिक मराठी काव्याचा प्रांत पुष्ट व समृद्ध बनविला आहे. त्यांच्या तुतारीचे पडसाद गेलीं साठ वर्षें मराठी काव्य-सृष्टींत उमटत आहेत. गडकऱ्यांचा ' दसरा ' किंवा रे. टिळकांचें ' रणशिंग ' म्हणजे त्या ' तुतारीचीं 'च अपत्यें होत. रे. टिळक, गोविंदाग्रज, बालकवि ठोमरे, रेंदाळकर वगैरे आधुनिक कवि केशवसुतांना गुरुस्थानींच मानीत. त्यांनीं ' तुतारी मंडळ ' नांवाची संस्थाच त्यांच्या स्मारकार्थ स्थापिली होती. हरिभाऊ आपटे, प्रा. वा. ब. पटवर्धन, किरात, विनायक वगैरे थोर थोर रसिकांनीं त्यांना वर्डस्वर्थ, कीटस्, शेले या आंग्ल कवींच्या उज्ज्वल मालिकेंत बसविलें. ' हजारांतुनी एकादा ' असाच हा युग-प्रवर्तक कवि होऊन गेला, अशीच ग्वाही अनेक कवींनीं व रसिकांनीं दिली. त्यांनीं निर्माण केलेला काव्य-संप्रदाय आपल्या तेजानें अधिकाधिक उज्ज्वलच होत गेला. त्यांच्या काव्यांचे कांहीं चरणांना तर सुभाषिताची लोकप्रियता व महति लाभली. त्याचे कांहीं नमुने पुढें देतों.

" प्रौढत्वीं निज शैशवासि जपणें बाणा कवीचा असे । "
" साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे । "
" जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे । "
" आम्ही कोण म्हणूनि काय पुसतां ? आम्ही असूं लाडके- । "
" एक शब्द बोलेन जरी । सकलां कुंठित करिन तरी । "
" त्रिखंड हिंडुनि धुंडितसें । न परि हरपलें तें गवसे । "

"कंटक–शल्यें बोथटलीं । मखमालिची लव वठली ॥"
"व्यर्थी अधिकचि अर्थ असे । तो त्यांस दिसे । ज्या म्हणति पिसे॥"
"शारदेनें जो मंत्र दिला कानीं । तसें लिहिलें मी, काव्य तिचें मानीं ॥"
"द्या उत्तेजन हो कवीस न करा गाणें तयाचें मुकें ॥
"गाण्यानें श्रम वाटतात हलके, हेंही नसे थोडकें ॥"
"प्रीती नसे बाजारीं । प्रीती नसे शेजारीं ।
प्रीतीचा असा असे गे सौदा । प्रीतीनें प्रीति संपादा ॥"
"वैर तयाला, जे गरिबी शिकवितात बालांस ॥"
"बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे ।
उडवुनि देउनि जुलमाचे या करूं पहा तुकडे तुकडे ॥"
"पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर ।"
"प्राप्तकाल हा विशाल भूधर । सुंदर लेणीं तयांत खोदा ।
निजनामें त्यांवरतीं नोंदा ॥"

## लौकिक विषय

केशवसुतांच्या काव्यांत सर्वसामान्य माणसाचें हृदय हलविणारे विविध विषय गुंफलेले आहेत. संत–कवींनीं मराठी कवितेला वारकरीण बनविलें असलें तर शाहीरांनीं तिला नर्तकीचें स्वरूप दिलें होतें, पण केशवसुता-पासूनच्या आधुनिक कवींनीं तिला खरीखुरी गृहिणी केलें आहे. मुख्यतः काव्याचा महिमा, निसर्गाचें प्रेम, प्रणयाची भावना व राष्ट्रमातेची भक्ति या चार विषयांनींच त्यांची सारी काव्य–सृष्टि व्यापलेली; तरी एखाद्या बारीक फुलापासून व लहानशा खेड्यापासून ज्ञानाच्या कुंपणापलीकडे असलेल्या गूढ शक्तीपर्यंत व दिव्य तेजापर्यंत केशवसुतांची प्रतिभा भरारी मारीत असे. त्यांच्यापूर्वी कृष्णशास्त्री चिपळूणकर, मोगरे, लेंभे इत्यादि कवि संस्कृत काव्याचे पाट मराठींत आणून सोडीत; तसेच केशवसुतांनींहि रघुवंश, किरातार्जुन वगैरे संस्कृत काव्यांचे अनुवाद कांहीं कांहीं कवितांत केलेले आहेत. त्याचप्रमाणें कच–देवयानी, शांतनु इत्यादि आख्यानांतील रसपूर्ण प्रसंगावरहि काव्य–रचना केली आहे. अशा बऱ्याच कवितांचा वेषहि

संस्कृतमयच आहे. “ विकसित–तरुमाला–केश–पंक्तींत, ” ‘ चेतोनिबद्ध–जनचित्र ’ ‘ तन्मस्तिष्कपिंडावरी ’ ‘ आनंद–निधान–शैल–शिखरीं ’ ‘ चलद्देवझषकीं, ’ ‘ द्युत्याविष्कृति , ’ ‘ विपत्समाकुल ’ इत्यादि क्लिष्ट सामासिक शब्दांची चवडच्या चवडहि त्यांच्या काव्य–पंक्तींत ठेवून दिलेली आढळते. मात्र त्यांची सर्वसामान्य भाषाशैली साधी, सोपी, व आवेशपूर्ण अशीच आहे.

संस्कृतच्या या ओघाप्रमाणेच आंग्ल वाङ्मयाचाहिओघ त्यावेळीं मराठींत प्रवेश करीत होता. कुंटे, महाजनि, कीर्तिकर वगैरे कवींनीं इंग्रजी कवितांना मराठीचा साज चढविला होता. ती कारागिरीहि केशवसुतांनीं बऱ्याच कवितांत करून दाखविली आहे. कांहीं कवितांवर तर त्यांनीं आधारभूत इंग्रजी कवितांचा स्पष्ट उल्लेखच केला आहे. पण त्याशिवाय इतर कैक कवितांना आंग्ल कवीपासून स्फूर्ति मिळाल्याचें उघड दिसतें. वर्डस्वर्थ–शेले इत्यादि थोर थोर आंग्ल कवींच्या काव्यापासून स्फुरलेल्या पण स्वतंत्रपणें रचलेल्या त्यांच्या कविता मान्यता पावल्या आहेत.

## वृत्तांची विविधता

जशी विषयांची विविधता; तशीच वृत्तांचीहि. ओवी–अभंगापासून शार्दूलविक्रीडित–भुजंगप्रयातापर्यंतचीं नाना वृत्तें त्यांनीं योजलीं आहेत. त्याचप्रमाणें विविध जातींतहि त्यांनीं काव्य–रचना केली आहे. उद्धव, बालानंद, मेघावलि वगैरे जातींतील त्यांचीं कवनें पदाप्रमाणें गेय व रम्य आहेत. इंग्रजींतल्याप्रमाणें त्यांनीं निर्यमक कविताहि बरींच लिहिली आहे. कांहींमध्यें यमक साधलें आहे, तें एक–तीन, दोन–चार अशा चरणांचें. चौदा ओळींचें सुनीत हा काव्य–प्रकार तर त्यांनींच मराठींत आणला. क्वचित् ओबडधोबड भाषा, क्वचित् यतिभंग तर क्वचित् निरर्थक शब्द–असे कांहीं दोष त्यांच्या काव्यांत आढळतात. पुनः पुनः घासून–पुसून कवितेचा परिष्कार करण्याइतकें स्वास्थ्य केशवसुतांना, आर्थिक वा मानसिक या दोन्ही दृष्टींनीं, होतें कोठें ? निराशेनें तापलेलें मन गूढ अध्यात्म–

वादांत भरारी मारी. गूढगुंजनात्मक कवितांचा संप्रदाय त्यांनीं मराठींत नव्यानेंच सुरू केला म्हटलें तरी चालेल.

## नवयुगाची आशा

विषयांचें वैचित्र्य, वृत्तांचें वैविध्य, आणि गूढ–गुंजनाचे, निसर्ग–भक्तीचे व कुटुंब–प्रेमाचे विचार या वैशिष्ट्यांपेक्षांहि केशवसुती काव्याचें एक लक्षण महत्त्वाचें आहे. तें म्हणजे नव्या युगाविषयींचा आशावाद. आपल्या कवित्व–शक्तीविषयीं अभेद्य आत्मविश्वास अंगीं बाळगून, जुन्या दुष्ट रूढींना ' मरणालागुनि ' टाकून ते ज्ञान, समता व स्वतंत्रता यांच्या नवयुगाची तुतारी पंचप्राणांच्या आवेशानें फुंकीत आहेत. " स्फूर्ति, तुतारी, गोफण, नवा शिपाई " इत्यादि काव्यांच्या ओळीओळींतून हा आत्मविश्वास व आशावाद मोठ्या आवेशानें उसळ्या मारीत आहे. " म्हातारी, सतारीचे बोल, झपूर्झा, हरपलें श्रेय " या कवितांतील गूढगुंजन सूक्ष्म भावनेनें बहरलेलें, मधुर भाषेनें सजलेलें व खोल विचारानें नटलेलें आहे. केशवसुतांच्या या आठ–दहा कविता म्हणजे क्रांतीच्या तुताऱ्या होत, नवयुगाच्या निशाण्या होत, मानवधर्माच्या पताका होत.

## कवित्वाची आढ्यता

कवित्व-शक्तीचा महिमा केशवसुत मोठा मानीत, याचा अर्थ ते स्वतःला महत्त्व देत असा मात्र नव्हे. बिचाऱ्याच्या उभ्या हयातींत स्तुतीचा एक शब्द किंवा मोबदल्याचा एक पैसा कांहीं पत्रा–मासिकाकडून त्यांना लाभला नाहीं. ते स्वतःविषयीं नम्र भावच प्रगट करीत. ज्ञानेश्वर–तुकारामादि संतांसारखींच ही दुहेरी भूमिका आहे. वैयक्तिक दृष्ट्या ते स्वतःला धुळीच्या कणाची किंमत देत, पण ब्रह्मस्वरूपाचा अंश या दृष्टीनें ' तुका ब्रह्मांडाएवढा ' वगैरे व्यापक सत्तेची भाषा काढीत. त्याचप्रमाणें " कवि आम्हांलागुनि म्हणणें । कविशब्दार्था लोळविणें " असा विनय धारण करणारे केशवसुतच " आम्ही कोण म्हणूनि काय पुसतां ? " असें आढ्यतेनें हटकीत आहेत. एकीकडे स्वतःचा व्यक्तिविषयक विचार आहे,

तर दुसरीकडे कविवर्गाची तरफदारी आहे 'गणमात्रा जुळणारे' असें स्वतःचें शालीन वर्णन करणारे केशवसुत शारदेच्या अंकावर, प्रतिभेच्या तेजोवलयामध्यें, काव्याच्या उन्मादांत बसून टीकाकारांना विचारतात, "अशी असावी कविता, फिरून। तशी नसावी कविता म्हणून। सांगावया कोण तुम्ही कवीला। अहांत मोठे ? पुसतो तुम्हांला ॥" रसिकांपुढें काव्य आणणें हा दुय्यम हेतु; काव्य-रचनेचा प्रधान हेतु आत्मानंद. अध्यात्मांतील समाधि-सुखासारखाच हा आनंद. त्याचें वर्णन करतांना केशवसुत म्हणतात, "करूनिया काव्य जनांत आणणें। न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणें। करूनि तें दंग मनांत गुंगणें,। तदीय हा सुन्दर हेतु मी म्हणें." ॥

प्रेतांनाहि खडबडून उठविण्याइतकी सामर्थ्यशाली कविता निर्माण करणारा कवि समाजाच्या उपयोगीं पडत नाहीं, असें कोण म्हणेल ? जणु कांहीं स्वतःच्याच भूमिकेचें चित्र रेखाटतांना केशवसुत 'कवितेचें प्रयोजन' सांगतात, "हातीं घेउनियां निशाण कवि तो पाचारितो बान्धवां-। 'या हो या झगडावयास सरसे व्हा मेळवा वाहवा!'। प्रेतेंही उठवील जी निजरवें, ती तो तुतारी करी। आतां नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी ?" ॥ कवींचें अपार सामर्थ्य समर्थ रामदासांनींहि 'नसता कवीचा व्यापार। कैसा असता जगदुद्धार" या सूत्रांत वर्णिलें आहे. वर्डस्वर्थसारखे आंग्ल कविवर तर आपल्या काव्याची तरफ करून सारें जग उलथण्याची ईर्षा धरतात. त्याच भाषेंत केशवसुतहि काव्य-महिमा गातात; तो असा—"पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे टेकुनि ती जनता-शीर्षावरि जग उलथुनियां देउं कसे!" नुसतें जगच काय, पण कवि आपल्या प्रतिभेची नौका आकाशाच्या सागरावर नेईल आणि तेथील तारकांचीं रत्नें या 'गरिब' पृथ्वीवर फेकून देईल असा विश्वासहि केशवसुत प्रगट करतात.

## खऱ्या कवीचा महिमा

"आम्ही कोण ?" हें केशवसुतांचें सुनीत चिरंजीव आहे. त्यांत जातिवंत काव्याचा महिमा व सामर्थ्य वर्णिलें आहे. प्रतिभेच्या बळावर

विश्वभर संचार करणारे व दिक्कालांतून आरपार पहाणारे कवि देवाचे लाडके होत. त्यांच्या स्पर्शाच्या जादूनें वस्तुमात्र सुंदर बनतें; प्रत्येक वस्तूंतील सत्त्व ते शोधून काढूं शकतात. ते आणखी काय करतात ? " शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरें ? पृथ्वीला सुरलोक-साम्य झटती आणावया कोण ते ? । ते आम्हीच सुधा कृतींमधुनिया ज्याच्या सदा पाझरे; । ते आम्हीच शरण्य मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभतें ! ॥ " अशा सामर्थ्यवान कवींचा जगाला किती उपयोग आहे ? याचें उत्तर देतांना कवि आत्मविश्वासानें बजावतो, " आम्हांला वगळा—गतप्रभ झणीं होतील तारांगणें; । आम्हांला वगळा—विकेल कवडी-मोलावरी हें जिणें ! "

खऱ्या कवीच्या जातिवंत काव्याचा हा बडिवार झाला. याचा अर्थ त्या स्तुतीच्या साऱ्या माळा केशवसुत स्वतःच्या गळ्यांत घालून घेत आहेत व त्या प्रशंसेच्या पंचारतींनीं स्वतःला ओवाळून घेत आहेत, असा मात्र मुळींच नाहीं. तें केवळ काव्याचें ध्येय आहे. व्यक्तिशः स्वतः किती नम्रता केशवसुत धारण करतात पहा—' अस्मद्गान नव्हे ' गान ' । तें गाना चिंध्यादान ! ॥ चंद्राला जुन्या कपड्याची चिंधोटी दान करावी तसें आमचें काव्य, अशी विनयाची वृत्ति प्रगट करून केशवसुत 'भृंगा'स म्हणतात, " परंतु भृंगां ! तव गान । परमानंदें परिपूर्ण ! । उदासीन ही जगाविशीं । तव तन्मयता सृष्टीशीं ! " निसर्गाचें माहात्म्य येथें किती सूचकतेनें वर्णिलें आहे !

## निसर्ग व काव्य

निसर्गाच्या सहवासानेंच आपल्या कवनांत कांहीं काव्य आलें तर येतें, हें कबूल करतांना ते लिहितात, " प्रत्येक मेघ वरता फिरतां नभांत । एकेक शब्द लिहितों मम पुस्तकांत । " निसर्गाचें प्रतीक म्हणून एक पुष्प घेऊन केशवसुत म्हणतात, " पुष्पामध्यें प्रकट होय न जें जराहीं । सृष्टींत एकहि रहस्य असें न कांहीं; । ज्याचा ध्वनी न उमटे खगकूजितांत । नाहीं निगूढ इतिहास असा जगांत ॥ "

2९०५ का·वा

आपलें ‘ हरपलें श्रेयहि ’ निसर्गांतच आढळतें, असें सांगतांना ते गुणगुणतात, “ जेथें ओढे वनराजी । वृत्ति रमे तेथें माझी; । कारण कांहीं साक्ष तिथें । मज त्या श्रेयाची पटते । ”

काव्य म्हणजे रसात्मक वाक्य. या रसाचें स्थान म्हणजे हृदय. हृदयांतील शक्तिशाली भावनांचा सहज उद्रेक म्हणजे काव्य. हा आशय व्यक्त करतांना ‘ दूर कोठें ऐकला जाउनियां ’ या कवितेंत केशवसुत म्हणतात, “ हृदय आत्म्याला जर्धी खेळवीतें, । हृदय आत्म्याला जर्धी आळवीतें; । तर्धी तुमचें तें नको कलाज्ञान, । तर्धी हृदयासम नसे तानसेन ॥ ”

## शारदेचा देव्हारा

‘ शब्दांनो ! मागुते या ! ’ या कवितेंत कवीनें अशी रम्य कल्पना लढविली आहे कीं, तेजाचे पंख हालवीत शब्दपंक्ति शारदेचा देव्हारा घेऊन चालली होती. त्या शब्दांना कवीचें विकसित हृदय दिसलें, त्याबरोबर त्यांनीं तो देव्हारा त्या हृदयावर ठेवला. “ शब्दांहीं चित्तभूमी विकसित हिरवी तों मदीया बघूनी । देव्हारा माझिया तो उतरुनि हृदयीं स्थापिला गौरवूनी ॥ ” शारदेचा वरदहस्त लाभलेला कवि जेथून चालत जातो, तेथील धुळीचें सोनें होतें. “चाले तो धरणीवरी तर पहा! जेथूनि तो चालिला, । धूली तेथिल होतसे कनकिता ।–घेऊं नका भ्रान्तिला ॥ ” अशा कवीला पाहण्यासाठीं स्वर्गांचे देवहि पृथ्वीवर येतात; “ राही तो, तर देव भूमिवरतीं येतात. हिंडावया, । जातां स्वर्ग सवें धरेस उतरे त्यालागि धुंडावया ! ॥ ”

## काव्याचें कार्य काय ?

पृथ्वीवरील दिवा आपल्या उजेडाची बढाई मारूं लागला, तेव्हां आकाशांतील तारा त्याला आपल्या तेजाचें महत्त्व समजावून सांगतो. जड शास्त्रें जगांतील बाह्यसुखें वाढवितात, पण काव्य हें मानस-सृष्टीचा विकास करतें, हा भेद दाखवितांना कवि ताऱ्याच्या मुखानें म्हणतो,

" भांडीं, तीं मडकीं, डबे, ढकलिसी अंधार यांपासुनी, । ब्रह्मांडास परन्तु मी उजाळितो, गेलीं युगें होउनी; । तेजानें वरुनी दिव्या । खुलविसी तूं मानवी चेहरे, । आत्मे उज्ज्वल आंतले पण गड्या ! होतात माझे करें !॥" 'निशाणाची प्रशंसा' त्यांनीं जी केली, तीच जातिवंत कवितेला लागू पडणारी आहे. निशाणांचें महत्त्व व कार्य कोणतें ? " भक्ति जिथें, दिव्यत्व जिथें, उत्सव जेथें फार । तेथें तेथें दिसे तुझा प्रोत्साहक आकार ! "

खरा कवि हा तत्ववेत्ता असतो - जगाचा मार्गदर्शक असतो—मानवतेचा उपकारकर्ता असतो. या उच्च भूमिकेची ओळख केशवसुतांनीं आपल्या अनेक काव्यांतून प्रभावी रीतीनें करून दिली आहे. 'स्फूर्ति' या कवितेंत तर ते कवितेच्या साहाय्यानें व जनतेच्या पाठिंब्यानें सारी पृथ्वी उलथून देण्याची हिंमत व्यक्त करतात. ते म्हणतात, " पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे । टेंकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुन या देऊं कसें । बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे । उडवुनि देउनि जुलुमाचे या करूं पहा तुकडे तुकडे । "

## काळाचें प्रतिबिंब

काव्याच्या महिम्याप्रमाणेंच राष्ट्राच्या स्वातंत्र्याविषयींहि केशवसुतांच्या आशा–आकांक्षा उत्तुंग होत्या. ते पुण्यास आले, तेव्हांपासूनच त्यांच्या अंतःकरणावर राष्ट्रीय जागृतीचे संस्कार होऊं लागले होते. पारतंत्र्याच्या झोपेंतून राष्ट्राचा आत्मा जागा होऊं लागल्याच्या खुणा त्यांना दिसत होत्या. १८८५ सालीं त्यांनीं पहिली कविता लिहिली; तो काळ जागृतीनें व चैतन्यानें रसरसलेला होता. 'मालाकार' चिपळूणकर १८८२ सालीं आपल्या कर्तृत्वाची उष्णता व कीर्तीची प्रभा पसरवून दिवंगत झाले होते. टिळक–आगरकर हे तरुण 'केसरीकर्ते' 'डोंगरीच्या तुरुंगाची' हवा खाऊन 'लोककल्याण साधावया'साठीं सरसावले होते. १८८५ सालींच राष्ट्रिय सभेचा जन्म झालेला. या राजकीय क्रांतीबरोबरच सामाजिक क्रांतीचेंहि रण-शिंग फुंकलें गेलें, त १८८८ मध्यें. त्या वर्षी प्रि. आगरकर यांनीं आपल्या स्वतःच्या 'सुधारक' साप्ताहिकांतून सामाजिक सुधारणेचा

पुरस्कार धडाक्यानें सुरू केला. तेंच कार्य कादंबरीच्या द्वारें करण्यासाठीं कमर कसलेले हरिभाऊ आपटे यांची ‘ पण लक्षांत कोण घेतो ? ’ ही समाजाला धक्के देणारी कादंबरी १८९३ सालीं प्रकाशित झाली. नाट्य-क्षेत्रांतहि हे क्रांति-किरण पाडणारें ‘शारदा’ हें देवलांचें नाटक १८९९ सालीं रंगभूमीवर आलें. अशा राजकीय व सामाजिक उलथापालथीच्या काळांत मराठी कवितेची ‘ तरफ ’ हातीं घेऊन केशवसुत मोठ्या आशेनें व बळानें पुढें झाले. पारतंत्र्याची चीड व स्वातंत्र्याची आस या राजकीय भावना त्यांच्या कांहीं कांहीं कवनांत तीव्रतेनें व्यक्त झाल्या आहेत; त्याचप्रमाणें बुद्धिप्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य हीं सामाजिक ध्येयेंहि त्यांच्या कांहीं काव्यांतून ध्वनिक्षेपित झालीं आहेत. ‘नवसमाजनिर्मितीचा आशावाद’ केशवसुतांच्या कवनांतून ओसंडत आहे.

## स्वातंत्र्यासाठीं तळमळ

‘ गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे ’ या १८८७ सालीं रचलेल्या कवितेंत केशवसुतांनीं आपल्या घराचें, ओसरीवरील घड्याळाचें, माच्यावर निजलेल्या पित्याचें—असें कौटुंबिक जिव्हाळ्यानें ओथंबलेलें वर्णन करतां करतां आपल्या धाकट्या बंधूविषयीं जे उद्गार काढले, त्यांत त्यांची सारी स्वातंत्र्यलालसा प्रगट झाली आहे. आपला भाऊ बाल आहे, अज्ञान आहे, तरी ‘ त्याचेविशीं मम मनीं अतिलोभ राहे ’ अशी आपली भावना व्यक्त करून केशवसुत त्याचेकडून कोणती अपेक्षा करतात ? तर “ बापू ! गड्या ! ध्वज उभा करशील काय ?। तूं देशकारण करूं झटशील काय ?” बापू ! जनांत दिवटी धरशील काय ? । स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ? ।। या चार ओळींत कवीच्या जिवींची आर्तता किती ठासून भरली आहे ? आपल्या आयुष्यांतील एकमेव साध्य हस्तगत करून घेण्यास आपण असमर्थ ठरलों, या निराशेनें हृदय फाटून गेलेल्या कवीनें आपल्या धाकट्या भावापाशीं हें मागणें मागितलें आहे—याचना केली आहे. त्याच उदात्त भावनेचा करुण आविष्कार “ गांवीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून ” या काव्यांतहि झालेला आहे. विद्यार्थि-दशेंत कवि

आपल्या मित्राबरोबर कोणत्या गोष्टी बोलत होता ! तर "तेव्हां आम्हीं म्हटलें—'ही ऱ्हासाची । रजनी केव्हां जाइल विरूनि साची ? । स्वतंत्रतेची पहाट ती येईल । उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील ? ॥ "

" या डोळ्यांनीं पहाट ती बघण्याचें । असेल का हो नशिबीं दुर्दैव्यांचें?। किंवा "तीतें आणावयाचे कांहीं । यत्न आमुच्या होतिल काय करांहीं?॥" टिळक-आगरकरांचा कॉलेजांतील जो देशभक्तिपर संवाद प्रसिद्ध आहे, त्याची आठवण हे श्लोक वाचून कोणास होणार नाहीं ? बॅ. सावरकर यांनीं ' वहिनीस लिहिलेल्या पत्रांत ' 'वैशाखिचा कुमुदनाथ नभांत हासे' अशा रम्यकालीं सर्व कुटुंबीय मंडळी राष्ट्रोद्धाराच्याच कथा कशा सांगत हें पुढें वर्णिलें; त्याची स्मृति करून देण्यासारख्या पंक्ति केशवसुतांच्या याच काव्यांत आहेत. त्या अशा—" देशाविषयीं गोष्टी बोलत येथें । बसलों, विसरुनि कितीकदां निद्रेतें । श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हां । अश्रूंमध्यें अश्रु गळाले तेव्हां ॥ "

संध्याकाळची कांति पाहिली, तरी हाच विचार आणि प्रातःकालीं वरवर चढणारा सूर्य पाहिला, तरी विचार हाच—अशी आपली अवस्था केशवसुतांनीं ' एका भारतीयाचे उद्गारां ' त वर्णिली आहे. वेलींचीं फुलें पाहिलीं, तरी या कवीचें रसिक मन, राजकीय दृष्टया जागृत झालेलें असल्यानें, कळवळून म्हणतें, वल्लीं ! हीं सुबक सुमनें काय आम्हांस होत?। युष्मद्गानें मधुर, खग हो ! या जनां काय होत ?—। आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो ! । ऐकायला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळें हो ! ॥

आणि शेवटीं स्वातंत्र्यासाठीं तळमळणारा कवि ईश्वराचा धावा करतो, " देवा ! केव्हां परवशपणाची निशा ही सरून । स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ? । केव्हां आम्ही सुटुनि सहसा पंजरांतूनि, देवा, राष्ट्रत्वाला फिरुनि आमुचा देश येईल केव्हां ? ॥" आज आपण पारतंत्र्यांतून मुक्त व स्वातंत्र्यानें संपन्न झालों, म्हणून गेलेल्या संकटाचें व आलेल्या सौख्याचें तितकेसें स्मरण नाहीं व महत्त्वहि वाटत नाहीं. पण त्या काळीं पारतंत्र्याचा तिटकारा व स्वातंत्र्याचा हव्यास प्राणापलीकडे कसा होता, हें हें या कवितेवरून स्पष्ट होतें.

## निराशेवर उतारा

खुद्द केशवसुतांना 'नैराश्यें पुरें घेरिलें' होतें. त्यांचें जीवनच निराशेनें ग्रासलेलें होतें. 'आंतिल विषण्ण वृत्ति' त्यांना सतत जाळीत होती. पण त्यांचा मोठेपणा हाच कीं, सांसारिक सुखाकडे व वैयक्तिक आशांकडे पाठ फिरवून त्यांनीं सामाजिक प्रपंचाकडे लक्ष दिलें व समाजाला ओजस्वी संदेश दिला. तरी त्यांच्या चित्तांतील निराशा मधूनमधून डोकें वर काढीच. 'पुष्पाप्रत' या कवितेंत ते म्हणतात, " चिरतरुणा रे। चिररुचिरा रे ! तुज सन्निध तो वास बरा रे ! । तुजमजमध्यें परी केवढी—आहे रुंद दरा रे ! ॥. काळोखाच्या जगामध्यें या, । मृत आशांच्या चित्तावरुनि या । पिशाच्च माझें भटकत आहे—शांति नसेचि तया !" पिशाचाप्रमाणें भटकणाऱ्या कवि–मनाला घुब्रडाची सोबत आवडावी हें योग्यच नव्हे काय ? 'घुब्रड' या कवितेंत केशवसुत म्हणतात, " खाशी सोबत !" कवी म्हणाला । " माझ्या विरहव्यथित मनाला । वाटे मनुजांचा कंटाळा; । दुःख करीत बैसणें आवडे, जेथें राहे अंधार । "

पण आपल्या दुःखाची मीमांसा करतां करतां कवीला हें तत्वज्ञान उमगलें कीं, जग हेंच मुळीं सुखदुःखामिश्रित आहे—' जगीं सर्वसूखी ' कोणीच नाहीं. हेंच तत्व काव्यात्मक भाषेनें ते मांडतात, " कांट्यावाचुनी गुलाब नाहीं हें धर हृदयीं साच; । नैराश्याचा मग तुजला तो होइल न कधीं जाच ॥ सुखदुःखें हीं मिश्रित ऐशीं असती नित्य जगांत; सुखा-कारणें झटतां पडतें दुःख पहा पदरांत ॥

स्वतःच्या वाट्यास आलेल्या दुःखाचाहि उपयोग समाज–हितासाठीं करावा, असा सुविचार सांगतांना केशवसुत म्हणतात, " अमुचा पेला दुःखाचा । डोळे मिटुनी प्यायाचा । पितां बुडाशीं गाळ दिसे, । त्या त्या अनुभव हें नांव असे । फेंकुनि द्या तो जगावरी, । अमृत होऊं तो कुणावरी। " अखेर 'दिनानाथ देवाकडे' धांव घेऊन केशवसुत प्रार्थना करतात, "भिकार या जगीं । इच्छित न मिळे कांहीं । म्हणूनी तुझे पायीं । भिक्षांदेही. ॥ "

## निसर्गाचीं गीतें

'निसर्ग-काव्य' ही मराठी वाङ्मयाला आंग्ल भाषा-भगिनीची एक सुंदर देणगी आहे आणि ती वाहून आणण्याचा मान केशवसुतांच्या लेखणीला लाभला आहे. त्यापूर्वीच्या मराठींत मुक्तेश्वरासारख्या प्रतिभाशाली कवींनीं निसर्गाचें वर्णन आपल्या काव्यांत केलेलें आहे, नाहीं असें नाहीं. कालिदासासारख्या प्राचीन गीर्वाण कवीनेंहि सृष्टि-सौंदर्याचीं शब्द-चित्रें मनोहरपणें रेखाटलीं आहेत. पण तें सारें मुख्य कथेला पार्श्वभूमीप्रमाणें असे—मानवाचीं कृत्यें प्रधान व निसर्गाची लीला गौण, असा भाव त्या कवींचा असे. पण पाश्चात्य कवींना निसर्ग हाच प्रधान वाटे, स्वतंत्र व जीवंत वस्तु भासे, आणि त्याचें सान्निध्य मानवाचें मन विशाल करतें अशी त्यांची समजूत असे. सूर्योदय व सूर्यास्त, पर्वत व नदी, आकाश व समुद्र, वृक्ष व वेली–इत्यादि सृष्टींतील नानाविध प्रसंग व पदार्थ हे सचेतन आहेत, बोलके आहेत, दिव्यत्वानें नटलेले आहेत–असें आंग्ल कवींना भासे. आकाशांत पडलेलें इंद्रधनुष्य पाहतांच वर्डस्वर्थसारख्या कवीचें हृदय तर झेंपावें ! त्याला ओढ्यांच्या खळखळाटांतून प्रेमाच्या ऋचा ऐकूं येत आणि पाषाणांतून भाषणांचे प्रवाह पाझरतांना दिसत. सृष्टीशीं ही तन्मयता साधण्याचा योग केशवसुतांनीं आरंभिला.

'एक खेडें' या काव्यांत केशवसुतांनीं सृष्टीचें हृदयंगम शब्द–चित्र रेखाटलें आहे. दापोली तालुक्यांतील 'वळणें' गांवीं त्यांचे वडील होते. त्या गांवाचेंच वर्णन या कवितेंत तपशीलवार केलें आहे. शहरोशहरीं पोटासाठीं भटकण्याऐवजीं त्या निसर्ग–रम्य खेड्यांत आपल्याला रहावयास मिळावें ही आपली मनीषा ते पुढील शब्दांनीं व्यक्त करीत आहेत. "अहा ! अज्ञात स्थळीं अशा मातें । एक गवताळू खोप रहायातें, । शेतवाडी एक ती खपायला, । लाधती, तर किति सौख्य मन्मनाला ! ।। तरी नसतों मी दरिद्री धनानें, । तरी नसतों मी क्षुद्र शिक्षणानें । तरी होतीं तीं स्वर्गसुखें थोडीं, । तरी नसती कीर्तिची मला चाडी ! ।। "

" स्वर्ग–सुखाचा आनंद खेड्यामध्यें तुम्हांला का वाटतो ? " असा

प्रश्न कोणी कवीला केला असता, तर कवीचें उत्तर तयार होतें; तें असें,
" स्तोत्र ओढे थांबल्यावीण गाती, । सूर-वारे आपुला नित्य देती, ।
वृक्षगण तो हालुनी डुलताहे; । अशा भक्तीच्या स्थळीं देव राहे ! ॥
उंच डोंगर ते, उंच कडे भारी, । पडे धो ! धो ! ज्यांचियावरुनि वारी, ।
भोंवतालें रान तें दाट आहे; । अशा ठायीं देव तो स्वयं राहे ! ॥ "

देव जेथें राहतो तें स्थान स्वर्गच नव्हे काय ? आणि देव राहतो शांत-प्रसन्न अशा निसर्गामध्यें. सूर्य, वृक्ष, पक्षी इत्यादि निसर्गाचीं बालकें रोज रोज आपल्याला दिसतात आणि तरीहि त्यांचें आकर्षण कमी होत नाहीं, याचें कारण सांगतांना 'अढळ सौंदर्य' या कवितेंत केशवसुत म्हणतात, " म्हणूनि कथितों निःशंक मी तुम्हांते,— । असे सुन्दरता अढळ जरी कोठें । तरी ती सृष्टींत मात्र वास— । पहा मोहिल सर्वदा ती तुम्हांस. ॥"

## प्रणयाचें मानवी स्वरूप

निसर्ग–काव्याप्रमाणें प्रणय–गीतांचीहि देणगी केशवसुतांनीं इंग्रजी वाङ्मयांतून मराठींत आणली, असें म्हटलें तरी चालेल. त्यापूर्वीं मराठींत प्रणय नव्हता असें कोण म्हणेल ? शृंगार हा तर रसराज. त्याचा गौरव सर्व जगाच्याच वाङ्मयांत केलेला आहे. पण संस्कृत किंवा मराठी काव्यांत राधा–कृष्णादि देवादिकांच्या, फार झालें तर, दुष्यंत–शंतनूसारख्या राजे-रजवाड्यांच्या प्रेमाला स्थान मिळे; पण सर्वसामान्य माणसाच्या हृदयांतील प्रेम–भावनेला वाचा फोडणें हें पूर्वीं काव्याला कमीपणा आणणारें वाटे. पाश्चात्य कवि इहलोकवादी असल्यामुळें तेथील हमाला–मजुरापासून सर्वांच्या प्रीति–भावनेवर त्यांनीं आपल्या काव्याचीं फुलें वाहिलीं आहेत. ही मानवता केशवसुतांच्या अंतःकरणाला सहजच पटली; आणि म्हणून त्यांनीं वैयक्तिक प्रेमाचीं पस्तीस गाणीं रचलीं. 'नसे प्रणय तो माझियाहि कां अंतरीं ? ' असा सरळ सवाल त्यांनीं 'संध्याकाळ' या कवितेमध्यें केला आहे. 'प्रीति' हें त्यांचें प्रेम–गीत तर सर्वतोमुखींच झालें आहे—चित्र-पटांतहि निनादत आहे. " प्रीती मिळेल कां हो बाजारीं ? । प्रीती मिळेल कां हो शेजारीं ? । " असे प्रश्न करून कवि प्रीतीच्या निर्मितीची काव्य-

मय मीमांसा अशी करतोः—" नंदनवनामधीं आला । कल्पलतेला बहर भला; । तिची हृदयीं बीजें पडलीं, । प्रीति त्यांतुनी अवतरली ! । प्रीतिची असे अशि ग मात; । पहा आपुल्या हृदयांत ! ॥ प्रेमळ कृत्यांची माळ । प्रियजनकण्ठीं तूं घाल; । द्विगुणित मग तो प्रीति तुला । देइल, न धरीं शंकेला. । प्रीतिचा असा असे ग सौदाः— । प्रीतिनें प्रीति संपादा ! ॥ "

'फिर्याद,' 'स्मरण आणि उत्कंठा' यामध्यें त्यांनीं शृंगाररस खेळविला आहे. प्रेमाचें अद्वैत कसें असतें, याचें वर्णन करतांना '-प्रत' या कवितेंत कवि सांगतो, "नाडि माझी तव करीं वाहताहे, । हृदय माझें तव उरीं हालताहे । करा आपुल्या तूं पहा चांचपून, । उरा आपुलिया पहा तपासून ॥" केवळ तरुण-तरुणींचें प्रेम म्हणजेच प्रीति, अशी संकुचित व्याख्या केशवसुत करीत नाहींत. त्यांच्या प्रीतीच्या जगांत आईबाप, बंधुभगिनी, आप्तमित्र वगैरे सारे येतात.

## कौटुंबिक जिव्हाळा

कौटुंबिक जिव्हाळ्यानें ओसंडणारीं कांहीं रसाळ व रमणीय कवनें केशवसुतांनीं रचलीं. नोकरीनिमित्त खानदेशापासून कर्नाटकापर्यंत त्यांना दूरदूर जावें लागे. त्यावेळीं त्यांचें प्रेमार्त हृदय आपल्या घराकडे सहजच धाव घेई. 'एक खेडें' यामध्यें आपल्या गांवाचें सुंदर शब्द-चित्र त्यांनीं रेखाटलें. त्या गांवांतील आपलें घर व त्या घरांतील आपली नातलग माणसें—यांच्याभोंवतीं प्रेमाच्या भावनेचे जे रेशमी धागे त्यांनीं गुंफले आहेत, ते अतिशय हृदयस्पर्शी आहेत. 'गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे' ही सारी कविताच अशा भावनेनें भिजलेली आहे. घराच्या पडवींत बांधलेली ती म्हैस, तें ओसरीवरील घड्याळ, तो माच्यावर निजलेला आपला पिता, ती माता, तो भाऊ, त्या बहिणी, ती कांता, ती तुळस—या सर्वांचें दर्शन कवीनें इतक्या बारकाईनें व जिव्हाळ्यानें वाचकांना घडविलें आहे कीं, जणुं कांहीं तो हातांत विजेची दिवटी घेऊन वाचकाला प्रत्यक्ष आपल्या घरांतूनच फिरवून आणीत आहे असें वाटावें. आणि प्रत्येक आप्ताच्या स्मृतीभोंवतीं त्यानें भावनांचें जें जाळें

विणलें आहे, तें किती नाजूक व मनोहर आहे! " तातास या ब्रघुनिया हृदयांत खातें। होऊन हें हृदय विव्हळ सर्व जातें " अशी अपर्ळी अवस्था कवीनें मूर्तिमंत उभी केली आहे. आपल्या इतर बंधूंप्रमाणें आपण ज्ञान, धन, सत्ता, मान यांपैकीं कांहींच मिळविलें नाहीं, त्यामुळें ' त्याचा खरोखर न मी क्षण पुत्र शोभे ' अशी निराशा त्याचे चित्ताला वाटत आहे.

## मातृप्रेमाचें चित्र

पण हा व्यावहारिक मोठेपणा हा हिशेबी प्रीतिभाव आईजवळ कोठला? तिच्याजवळ केवळ निरपेक्ष प्रेमच! म्हणून कवि आधीं-पासूनच बजावतो, " मित्रा, असा हळुच ये उजवे कडेस." दुष्यंतराजाहि कण्वाच्या आश्रमांत शिरतांना म्हणाला, ' तपोवनांत नम्र वेषानेंच गेलें पाहिजे.' आणि माता म्हणजे तपांचें तप, तीर्थांचें तीर्थ व पुण्याचें पुण्य! याच भावनेनें कवि आईच्या खाटेजवळ 'हळूंच' जातो. तिच्याकडे पाहतांना त्याचे मनांत विचार येतात, " आतां आपली आई निजली आहे; पण निजण्यापूर्वीं तिनें काय केलें असेल? देवाची प्रार्थना? कशासाठीं? माझ्या कल्याणासाठीं. तिचे उपकार माझ्या हातून थोडे तरी कधीं फिटतील काय? " या मातृ-प्रेमाचें चित्रण कवीनें अवघ्या चार ओळींत किती कौशल्यानें केलें आहे, पहा—" मत्कारणें स्तवुनि देव, निजावयातें। आलीस तूं खचित गे असशील मातें!। मोठे त्वदीय उपकार, जरा तरी ते। जातील कां फिटुनियां तव पुत्रहस्तें?॥ " किती थोडक्यांत, किती सोप्या शब्दांनीं, केशवसुतांनीं आपल्या अंतःकरणांतील कोमल भावनांचें भांडार खोललें आहे!—आणि म्हणूनच ते थोर कवि!

पुढें दोन बहिणी निजलेल्या दिसतात. त्यांचें प्रेम किती सूचकतेनें रंगविलें आहे. " गोष्टी जयांस कथितां न पुऱ्याच झाल्या! " या एका ओळींत आई आपल्या मुलींना गोष्टी सांगते व त्यांची गोडी मुलींना अवीट वाटते, हा सारा आशय येऊन गेला! अशीच आपल्या पत्नीची अवस्थाहि कवीनें दोन ओळींतच रेखाटली आहे. " ती कोण

दूर दिसते ?–निजली असूनी । जी श्वास टाकित असे मधुनी मधूनी ”
या दोन चरणावरूनहि पत्नीची विरह--व्यथा, मेघदूतांतील यक्षाच्या कांते-सारखी, व्यक्त होत नाहीं काय ?

## कोंकणचें वर्णन

याच कौटुंबिक प्रेमाचा विस्तृत व रमणीय आविष्कार “ नैर्ऋत्येकडील वारा ” या कवितेंत केशवसुतांनीं केला आहे. सर्व वाऱ्यांत नैर्ऋत्येचा वारा आपल्याला सुखदायक वाटतो असें प्रथम सांगून त्याचें कारण कथन करतांना कवि म्हणतो, “ तो वारा मम जन्मभूमिवरूनी येतो जवें वाहत ।” तो वारा अंगावरून वाहूं लागला कीं, कवीच्या डोळ्यापुढें कोंकणांतील तीं उंच गिरिशिखेंर, तें विस्तीर्ण सागराचें तरंग-तांडव, ते खळखळा वाहणारे निर्झर व ते जुनेपुराणे किल्ले—हें सारें वैभव उभें राहतें. वळणें गांवाजवळून जगबुडी नांवाची नदी वाहते. तिचेंहि वर्णन कवीनें केलें आहे. पण कुरूपाला सुरूप देणें हें तर कवीचें कर्तव्यच. म्हणून केशव-सुतांनीं आपल्या त्या लोकमातेला ‘ जगदुद्धरा ’ असें सोज्वळ नांव दिलें आहे. आईबापांच्या प्रेमाची आठवण होऊन कवि म्हणतो, “ आईच्या नयनांत नित्य मग मी स्वर्गास त्या पाहतों, तातांकावरि नित्य मी मग जगद्राज्यासना भावितों ” ॥ बापाच्या मांडीवर लोळतांना सर्व पृथ्वीचें राज्य आपल्या हातीं आलें असें बालकाला वाटतें आणि आईचे ते प्रेमळ डोळे ?—स्वर्गसुखाचीच बरसात करीत असतात, ते !

## अनुतापाची तळमळ

मातापित्यांच्या या अमोल उपकाराची फेड आपल्या हातून केव्हां, कशी होणार ? याचा विचार करून कवि दुःख प्रगट करतो, “ कां हो यापरि वाढलों फुकट मी ? हा-हंत ! मी नष्ट हा ! ” ही टोंचणी केशव-सुतांना आमरण राहिली होती. “ जन्मा येउनि मीं उगा शिणविलें आई ! तुला हाय गे । ताता ! भागविलें तुला फुकट मीं मत्पोषणीं हाय रे ! ॥ ” असे सुस्कारे ते शेवटपर्यंत सोडीत राहिले. आपल्या आयुष्याचें ‘ सिंहाव-

लोकन' करतांनाहि असे आंतरिक तळमळीचे बोल केशवसुतांनीं काढले आहेत. जुन्या स्मृतींचें सुख व विद्यमान निराशेचें दुःख यांनीं विणलेल्या आपल्या भावना त्यांनीं पुढील हृदयस्पर्शी शब्दांनीं रंगविल्या आहेत, " प्रदेश किती मागुते रुचिर ते बरें टाकिले, । कितीक तटिनीतटें श्रम जिथें अम्हीं वारिलें; । किती स्मृतिस धन्यतास्पद वनस्थली राहिल्या । जिथें धवलिता निशा प्रियजनासवें भोगिल्या ! ॥ सुखें न मिळतील तीं फिरुनि !–तीं जरी लाविती, । मनास चटका, तरी नयन त्यांवरी लोभती. । परन्तु हृदयास जे त्वरित जाउनी झोंबती, । प्रमाद दिसतां असे, नयन हे मिटूं पाहती ".! ॥ '

## रेखीव शब्दचित्र

एकाद्या प्रसंगाचें सूक्ष्म व रम्य वर्णन केशवसुत कांहीं कांहीं कवितांत करतात. ' रांगोळी घालतांना पाहून ' या प्रसन्न काव्यांतील बालिकेचें शब्द–चित्र ते पुढील शब्दांनीं रेखाटतात. " होती मंजुल गीत गात वदनीं अस्पष्ट कांहीं तरी, । गेला दाटुनि शान्त तो रस अहा तेणें मदभ्यन्तरीं; । तीर्थे, देव, सती, मुनी, नरपती, देवी तशा पावना, अन्तर्दृष्टिपुढूनियां सरकल्या, सन्तोष झाला मना ! ॥ रांगोळींतील चित्रांचा भावार्थ काय हें आपल्या कल्पकतेनें कवि सांगतो, ' आदित्यादिक आकृती सुचविती दिव्यत्व तें उज्ज्वल, । तैसें स्वस्तिक सूचवी सफलता धर्मार्थकामांतिल; । पावित्र्याप्रत गोष्पदें तुळसही, शोभेस हीं सारसें,। पुष्पें प्रीतिस, चक्र हें सुचवितें द्वारीं हरी या असे ! ॥ घराघरापुढें रोजरोज दिसणाऱ्या रांगोळींतून इतका अर्थ कवीनें काढला आणि त्यावरून असा सिद्धांत बांधला कीं, " साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे । नित्याच्या अवलोकनें जन परी होती पहा अंधळे ॥ "

' दिवाळी ' या कवितेंतील वीस श्लोकांत त्या सणाचें तपशीलवार वर्णन आहे. त्याचा नमुना–"भिंती रंगविल्या नव्या फिरुनिया, केलीं नवीं अंगणें । वीथी (=रस्ते) झाडुनि, रान काढुनि, दिसे सर्वत्र केराविणें । दारीं उंच दिले दिवे चढवुनी, हंड्या घरीं लाविल्या । लोकीं शक्त्यनुरूप

आत्मसदनीं भूषा नव्या जोडिल्या " हें झालें साधें-सरळ निवेदन. पण कवीला वक्रोक्तीची आवड असते. तो दिवाळींतील फराळ, खेळ, जागरण यांचें वर्णन किती खुबीनें करतो पहा—" आतां भार नसे कुणास, पण तो शिंक्यास भारी असे । हातां काम नसे, परंतु पडतें तोंडास तें फारसें । कोणा मार नसे, तरी पण शिरीं तो सोंगट्यांच्या बसे । कोणा त्रास नसे, परंतु नयनां तो जागरें होतसे । "

## कल्पनेचा रम्य विलास

सकाळचें वर्णन नाना कवींनीं नाना रीतींनीं केलेलें आहे. ' फुलांची पखरण' मध्यें केशवसुत कोमल उपमा मंजुळ शब्दांनीं देतात; त्या अशा— " किती सकाळ ही सुंदर । जसें मुलींचें माहेर । जगाचे ते व्याप । दुरि तैसे संताप । मनिं न शिरे मुळिं पाप ॥ पुण्याची ही वेळ पहा गे । सूर्यानें उजळीली । आशेचिया वेलीवरती । गाणीं तीं फुललीं । तर मौजेनें या वेलीखालीं । टिप् फुलें टिप् ॥ " जणुं कांहीं अंगणांतील दाणे चिमणी टिपीत आहे, असा भास या शब्दांनीं कवीनें निर्माण केला आहे. संसारांतील घटनांचें वर्णन नैसर्गिक दाखल्यांनीं नेहमीं केलें जातें; पण सृष्टि-सौंदर्याचें वर्णन सांसारिक उपमांनीं करण्याचें कौशल्य केशवसुतांनीं ' कर्तव्य आणि प्रीति ' या कवितेंत दाखविलें आहे. वेलींचीं फुलें म्हणजे गृहिणींचीं मुलें व वनांतील सुगंध म्हणजे कुटुंबांतील प्रेम, हें सांगतांना ते म्हणतात, " तृणाची गे खालीं रुचिर हिरवी चादर बरी । लतांची वृक्षांची निबिड फुगडी शोभत बरी । फुलें तीं वल्लींचीं नव किसलयीं शोभत किती । तुझ्या ओंच्यामध्यें जशि नीज अपत्यें विलसती ॥ सुगंधें तें होतें स्थल भरुनि गेलें अतिशय । तुझ्या प्रेमानें हे भरुनि असतें जेंवि निलय ( =घर ) ॥ "

हवेंत तरंगणारी ' म्हातारी ' पाहून कवीला अशी कल्पना सुचते कीं, " वा गंधर्वांचें । विमानच सूक्ष्मरूप साचें । वद असशी का । तूं तरंगत वातावरणांतुन । सूक्ष्म देह धरुनी । असति का तुजवरि ते बसुनी ? ॥ दिव्य असें गाणें । गात ते असतिल सौख्यानें । ते मज पाण्याला । कशाचें

ये ऐकायाला ॥ परि मम वत्सेतें । गमे तें परिसाया मिळतें । म्हणुनिच उल्हासें । अशी ही वेडावुनि हासे । ”

‘ एक खेडें ’ मध्यें ते म्हणतात, “ कीर्ति म्हणजे काय रे ?—एक पीस । शिरीं लोकांच्या त्यास चढायास, । छरे पडती पक्ष्यास खावयास । मागुनी तें गळणार हेंहि खास ॥ ”

“पाशांला जो तोडायाला पाही । स्वदेशासाठीं अपणा बांधुनि घेई ॥” असे विरोधाभास त्यांनीं क्वचित् गुंफिले आहेत. ‘ दिवस आणि रात्र ’—मध्यें ते असें मौजेचें वर्णन करतात, “ नक्षत्रें जगतीवरलीं । दिवस फुलवितो; असे खरें । पुष्पें आकाशामधलीं । रात्र खुलविते, पहा बरें ॥”

## वात्सल्य व कारुण्य

‘ दंवाचे थेंब ’ ही कविता रम्य व रसाळ आहे. साध्या—छोट्या शब्दांतून वत्सल व करुण हे रस वहात आहेत. एका बाईचीं अनेक मुलें मेलेलीं असतात आणि एकच बाळ वाचलेला असतो. तो बागेंत सकाळीं गेला असतांना वेलीच्या पानापानावर दंव पडलेलें पहातो. तें पाहून तो आपल्या आईला बालसुलभ जिज्ञासेनें विचारतो, ‘ कोठुनि हे आले येथें ? ’ वर बोट करून आई उत्तर देते, “ जेथून चंद्र—नक्षत्रें, प्रकाश—पाऊस येतो, तेथूनच हे आले आणि तूंहि पण आलास तेथूनच.” पुढें ती त्याला बजावते “ कौतुक कर बघुनी त्यांतें । असती ते जोंवरि येथें । सूर्य त्यांस अपुल्या किरणीं । नेईलाचि लौकर गगनीं ” पण आईच्या अंतःकरणांत दुसरेच तरंग उठले. “ जातिल ते लौकर गगनीं । वदतां गहिंवरली जननी । गतझालें तिजला स्मरलीं । डोळ्यांत आंसवें आलीं ॥ “ देवा रे । ” मग ती स्फुंदे —। “ एवढा तरी लाभूं दे । ” म्हणुनि तिनें त्या बाळासी । धरिलें दृढ निज हृदयाशीं ॥ ”

केशवसुतांचीं कांहीं कांहीं काव्यें अत्यंत रसाळ आहेत. ‘ आईकरितां शोक ’ कवितेमध्यें कवि म्हणतो, “ फिरुनि तुझें कोठें तें तीर्थरूप पाहूं । पादरजीं लोळुनि तव धन्य केंवि होऊं । जनकामागें जागृत जननी गे तूं दैवत । उरलिस तीहि साम्प्रत । गेलीस सोडुनि आम्हां दीन बालकांतें ।

अंतरले पाय तुझे हाय हाय माते ॥ " आईच्या विरहानें कवीची अवस्था किती शोचनीय झाली याचें रेखीव शब्द--चित्र पुढील श्लोकांत काढलेलें आहे. कष्ट दिले तुजला मी फार फार आई । त्यांची मजकडुनि फेड जाहली न कांहीं । दुर्भग मी असा असें । म्हणुनि दुःख वाटतसे । कंठ फार दाटतसे । रडतो गुडघ्यांत म्हणुनी घालुनी शिरातें । अन्तरले पाय तुझे हाय हाय माते । "

## सतारीची मोहिनी

काव्याचें, गायनाचें, कोणत्याहि कलेचें रहस्य काय, कार्य काय व महत्त्व काय, याचें मनोरम वर्णन केशवसुतांनीं 'सतारीचे बोल' या हृदयंगम कवनांत केलें आहे. त्याचें पद-लालित्य मधुर आहे, वर्णन-कौशल्य प्रशंसनीय आहे, कल्पना-वैभव मोहनी घालणारें आहे आणि त्याच्या अंतरंगींचें तत्त्व तर उदात्त आहे. गूढगुंजनाचें सूक्ष्म वलयहि या कवितेभोंवतीं आहे. रात्रीच्या वेळीं कवि विमनस्कपणें चाललेला असतांना त्याच्या कानीं सतारीचे ध्वनि येतात, हें आरंभीं सांगतांना केशवसुत म्हणतात, "काळोखाची रजनी होती, । हृदयीं भरल्या होत्या खंती; । अंधारांतचि गढलें सारें । लक्ष्य, न लक्षी वरचे तारे, । विमनस्कपणें स्वपदें उचलित । रस्त्यांतुनि मी होतों हिंडत; । एका खिडकींतुनि सूर । तदा पडले-दिड दा दिड दा, दिड दा । "

पण कवि निराश झालेला होता. जग जड आहे, हृदयहि जड आहे—अशा स्थितींत विष खावें असा विचार ज्या कवीच्या चित्तांत खेळतो, तो सतारीचे मंजुळ ध्वनि कशाला ऐकत बसतो ? 'बाह्य भैरवीं धरिते प्रीती' अशीच त्याची वृत्ति. म्हणून 'पिरपिर कसली खुशालचंदा ?' असें तो त्या सतारवाल्यावर खेकसतो. पण जसजसे तो ते बोल ऐकतो, तसतसे—" आकर्षुनि घे; हृदय निवालें, । तन्मय झालें, द्रवलें; आलें । लोचनांतुनी तोय कितिकदां । ऐकत असतां—दिड दा दिड दा "

कलेनें हृदयाचा दरवाजा खोलला, अंतचक्षु उघडले आणि "आशा-प्रेरक निघूं लागले । सूर तधीं मीं डोळे पुशिले; । वरती मग मी नजर

फिरवली, । नक्षत्रें तों अगणित दिसलीं; । अस्तित्वाची त्यांच्या नव्हती । हा वेळवरी दादच मज ती । " तम अल्प–द्युति बहु " या शब्दां । वदती रव ते–दिड दा दिड दा ॥ '

सतारीचे उदात्त सूर ऐकतां ऐकतां आपलें व्यक्तित्व विरलें व विश्वामध्यें पसरलें असें कवीला वाटूं लागलें. प्रत्येक बोलाबरोबर स्वर्ग–सुखाचा आनंद त्याला होऊं लागला. त्याला असा भास झाला, " स्वर्ग धरेला चुम्बायाला । खालीं लवला–मजला गमला । अशा वितरिती अत्यानंदा । ध्वनि ते–दिड दा, दिड हा, दिड दा " अखेर सर्व वृत्तींचा लय झाला व शांतीचा लाभ विषण्ण कवि–मनाला झाला. " शान्त वाजली गती शेवटीं । शान्त धरित्री, शान्त निशा ती, । शान्तच वारे, शान्तच तारे । शान्तच हृदयीं झालें सारें । "

हें जें परिवर्तन सतारीनें केलें, तेंच कवीचें काव्य करितें, नाहीं का ? तुकाराम-एकनाथापासून मोरोपंतापर्यंत कवींच्या काव्यावर आक्षेपकांनीं प्रथम नाराजी प्रगट केली, पण त्या काव्याचें दिव्य सौंदर्य पाहतांच ' निंदक तेच स्तवक ' झाले. हाच आशय केशवसुतांनीं आपल्या या रमणीय कवनांतून व्यक्त केला आहे काय ?

## ब्रह्मानंदाची स्थिती

हर्ष–शोकाच्या व सुख–दुःखाच्या पलीकडे मानवी मनाची कांहीं अवस्था असते. मग तिला समाधि म्हणा, एकतानता म्हणा किंवा तंद्री म्हणा. या अवस्थेचें वर्णन ' झपूर्झा ' या कवितेंत केशवसुतांनीं केलें आहे. गूढगुंजनाचा उत्कृष्ट नमुना म्हणून हें गीत प्रसिद्ध आहे. त्याचा प्रारंभच संतकवींच्या समाधि–वर्णनासारखा आहे, तो असा–" हर्षखेद ते मावळले, हास्य निमालें । अश्रु पळाले । कण्टकशल्यें बोंथटलीं । मखमालीची लव वठली; । कांहीं न दिसे दृष्टीला । प्रकाश गेला । तिमिर हरपला । काय म्हणावें या स्थितिला ? । झपूर्झा ! गडे झपूर्झा ! "

लहान मुलीं एक खेळ खेळतात व तो खेळतांना ' जा पोरी जा ' म्हणतात; त्या शब्दांचा अपभ्रंश म्हणजेच ' झपूर्झा ' ध्येयवादी महा-

त्यांच्या अंतःकरणांतील चिद्‌घनचपला ज्ञानाच्या कुंपणावरून उड्डाण करून जाते, आणि मग ‘ आंतला आवाज ’ ऐकून ते ‘ निगूढ गीती ’ गातात. असा महात्मा ‘ मनुष्याणां सहस्रेषु ’ एकादाच, हें सत्य सांगतांना केशवसुत म्हणतात, “ नांगरल्याविण भुई बरी । असें किति तरी, । पण शेतकरी । सनदी तेथें कोण वदा ?-। हजारांतुनी एकादा ! तरी न, तेथूनि वनमाला । आणायाला, । अटक तुम्हांला । मात्र गात हा मंत्र चला-। झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ”

अशा दिव्य भूमिकेवर चढलेल्या महात्म्याला सारे ‘ प्रेमभरें ’ नाचत आहेत अशी जाणीव होते आणि ‘ खुडित खपुष्पें ’ तो सर्वत्र संचार करतो. ‘ वाचे बरवें कवित्व । कवित्वीं रासिकत्व । रसिकत्वा परत्व-। स्पर्शु जैसा ’ या ज्ञानदेवांच्या आध्यात्मिक भूमिकेचेंच चित्र केशवसुतांनीं आधुनिक शब्दांनीं, नव्या चालीनें रेखाटलें आहे, असें वाटतें.

## मानवतेचा महामंत्र

‘ जिकडे जावे तिकडे माझीं भावंडें आहेत ’ असें विश्वबंधुत्व केशवसुतांचा ‘ नवा शिपाई ’ उद्‌घोषितो. स्वतःच्या कुटुंबावर त्यांचें प्रेम आहे, आपल्या कोकणावर त्यांची प्रीति आहे, आपल्या राष्ट्रमातेची त्यांना भक्ति आहे; पण या संकुचित मर्यादेपलीकडेहि पहाण्याची व्यापक दृष्टि त्यांचेठायीं आहे. ‘ मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे ’ अशी त्यांची मानवताप्रेमी वृत्ति आहे. आणि ती प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचीहि त्यांची तयारी आहे. ‘ ब्रह्मदृष्ट्या सर्व समान, पण व्यवहारदृष्ट्या भेदाभेद आहेतच ’ अशी दुटप्पी भाषा त्यांचेपाशीं नाहीं. श्रीमंत-गरीब, मजूर-मालक, स्पृश्य-अस्पृश्य, स्त्री-पुरुष असले भेदभाव ते मुळींच मानीत नाहींत. ‘ समतेचा ध्वज उंच ’ धरून ते मानवतेचा मंत्र पढवीत आहेत. ‘ अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न ’ १८८८ सालीं त्यांनीं आपल्या कवितेच्या द्वारें समाजापुढें मांडला. रस्त्यावर महार-मांगांचीं मुलें खेळत असतांना एक ब्राह्मण त्यांचेवर खेकसतो, “ सरा रे दुरी पोर हो म्हारड्यांचें । चला ! खेळ हे मांडले डोंबलाचे । निघा !

वाट द्या लौकरी ब्राह्मणातें ” । पळालीं मुलें;—कोण राहील तेथें !॥” तरी एक राहिलाच. तेव्हां त्याचेवर सोवळ्या ब्राह्मणानें काठी उगारली व ‘ म्हणे–गाढवा ! सांवली ना पडेल ? ’ तेव्हां तो मुलगा घरीं गेला व आईला विचारूं लागला, “ जरी त्यावरी सांवली माझि गेली । तरी काय बाधा असे ठेवलेली ? ” या प्रश्नाला उत्तर काय ?–कांहींच नाहीं— आणि म्हणूनच आतां अस्पृश्यतेची रूढि नामशेष झाली. पण साठ वर्षांपूर्वीं असा प्रश्न कवितेंतून विचारणें हें मोठें धाष्टर्याचें काम होतें. तें केशवसुतांनीं हिंमतीनें केलें.

## दलिताविषयीं अनुकंपा

धर्म--व्यवस्थेंत अस्पृश्य; तसेच अर्थ–व्यवस्थेंत मजूर;–दीन, दलित व उपेक्षित. त्यांचेकडे लक्ष वेधण्यासाठीं केशवसुतांनीं ‘ मजुरावर उपासमारीची पाळी ’ ही कविता १८८९ सालीं लिहिली. साऱ्या दिवसांत हातांत कवडीहि आली नाहीं, तेव्हां एक मजूर आपल्या मनाशीं प्रश्न करतो, “ हीं मंदिरें हो खुलतात चांगलीं; । माझ्या वडीलींच न काय बांधिलीं ? । मी मात्र हो आज मरे भुकेमुळें; । श्रीमंत हे नाचति मन्दिरीं भले ! ॥ ” तो आपली अल्पसंतुष्ट मागणी देवाकडे करतांना म्हणतो, “ हेवा तयांचा मजला मुळीं नसे, । जाडी मला भाकर ती पुरी असे; । कष्टांत देवा ! मरण्यास तत्पर, । कां मारिसी हाय ? भुकेमुळें तर ?॥ ”

घरीं गेल्यावर आपल्या कारभारिणीला व मुलाबाळांना खावयास आपण काय देणार ? या विचारानें त्या मजुराचें आंतडें तुटतें व तो निराशेनें मनांत म्हणतो, “ हे लाडके ! आणिक लाडक्यांनो ! । दावू तुम्हां तोंड कसे फिरोन ? । जन्मास मी काय म्हणोनि आलों ? । येतांच वा कां न मरोनि गेलों ? ॥ ”

शाळेच्या चिमण्या जगांतील अन्यायांचीहि अशीच चीड केशवसुतांना येई. “ मुलांस झोडपणाऱ्या पंतोजीस ” ते रागारागानें विचारतात, “ कोणें मूर्खपणें गुरुपण तुला क्रूरा असे रे दिलें ? । कां खाटीक न जाहलास !—तुजला तें शोभतें चांगलें । या बाळांप्रत फार निर्दयपणें कां

तूं असा मारिसी ? । केला रे अपराध काय असला यांनीं ?-वदें रे मशीं ॥" मौज ही कीं, असे सवाल करणारे केशवसुत हे स्वत: तापट व मारकट शिक्षक होते असें म्हणतात. पण निवांत वेळीं शांत विचार करीत ते बसले; म्हणजे त्यांना आदर्श शिक्षक कसा असावा याचें योग्य ज्ञान होई. त्याच कवितेंत ते खऱ्या गुरूचें वर्णन करतात, "केव्हां धाकहि, पारितोषिक कधीं, गोडीगुलाबी कधीं । शिक्षा योग्य कधीं करुनि गुरु ते नांवास येती सुधी ॥"

## समाजावर टीका

" आगबोटीच्या कांठाशीं समुद्राच्या शोभेकडे पहात उभ्या असलेल्या एका तरुणीस " हें एका कवितेचें शीर्षक किती प्रदीर्घ व गद्य वाटतें ! पण ती सारी कविता निसर्ग-वर्णनानें व कल्पकतेनें नटलेली आहे. 'पृथ्वी-वरील जिणें जड ' कां वाटतें हें सांगतांना केशवसुत त्या कवितेंत म्हणतात, " इथें न्यायस्थानीं अनय उघडा स्वैर फिरतो । नरालागीं येथें नरच चरणांहीं तुडवितो ॥ "

## देव-दैत्यांचा झगडा

" गंगौघापरि भव्य केशवसुता, सावेश वाणी तुझी " अशी प्रशस्ति कवि रेंदाळकर यांनीं केली आहे. ती यथार्थ ठरविणारीं त्यांचीं कवनें म्हणजे स्फूर्ति, गोफण, नवा शिपाई, तुतारी इत्यादि. " कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ' असा स्फूर्तिदायक आवेश त्या कवि-तांतून खळाळत आहे. " जोर मनगटांतला पुरा घाल घाल खर्चीं । हाण टोमणा चळ न जरा, अचुक मार बर्चीं ॥" अशा प्रेरक शब्दांचे घावामागून घाव ते घालीत आहेत. जगांत सर्वत्र द्वेष, अन्याय व विषमता यांचें थैमान चालू आहे. त्याचाच अर्थ मानव अपूर्ण आहे. पण त्याच्या आत्म्याची धडपड पूर्णतेकडे जाण्यासाठीं आहे. म्हणून तो प्रेम, न्याय व समता यांचें राज्य स्थापूं पाहतो. त्यासाठीं त्याला दुष्टत्वाशीं झगडा करावा लागत आहे. या आसुरी व दैवी संपदांच्या संग्रामांत ' देवांच्या मदतीस चला तर ! '

अशी जोराची हाक केशवसुत देतात. देव म्हणजे प्रेम, न्याय व समता या गुणांचा सागर—' मंगल मंगलानां ' हें त्याचें स्वरूप. द्वेष—हिंसादि सैतानी प्रवृत्तींशीं सामना देणारा तो देवांचा पक्ष. पण हें सत्य स्वरूप न ओळखतां देवांना स्वार्थाचें व धर्माला रूढीचें सोंग जर देण्यांत आलें, किंबहुना सैतानाच्याच पक्षाला ' देवाचा पक्ष ' म्हणून संबोधण्यांत आलें; तर—? साऱ्या जगाला कणसाप्रमाणें कापूं निघालेला हिटलरहि आत्मचारित्रांत लिहितो कीं, " मी प्रभूचेंच कार्य करीत आहें. ' अशा ढोंगी देवाधर्मांची धोंड मानवाच्या प्रगतीचे आड आली, तर, केशवसुत एकाद्या सेनापतीप्रमाणें गरजतात, " अडवितील देव जरी। झगडूं त्यांच्याशीं निकरीं। हार न जाऊं रतीभरी। "

## तुतारीचे सूर

याच सत्पक्षाच्या भूमिकेवरून त्यांनीं आपली तुतारी फुंकली, काव्यांचा पेला स्फूर्तीनें कांठोकाठ भरला आणि गोफणींतून जोराची हाणाहाण केली. ' सगळीं गगनें ' भेदून टाकणारा आवाज काढणारी तुतारी ' फुंकीन मी स्वप्राणानें ' असें ते म्हणतात. या तुतारीची ललकारी ऐकतांच ' मुके पडसाद वाचाळ ' होतील असा आत्मविश्वास त्यांना वाटतो. सध्यांची वेळ क्रांतीची आहे, उलथापालथीची आहे, जुनें टाकून नवें घेण्याची आहे,—अशा वेळीं काव्य—गायनाचे जलसे कसले करतां? असा प्रेरक प्रश्न करून त्यांनीं तरुणांना व शूरांना समतेचा ध्वज धरण्यास व नीतीचा प्रसार करण्यास पाचारण केलें आहे. ' पुढें सरा रे ' असा प्रगतीचा संदेश त्यांनीं इतक्या आवेशपूर्ण भाषेनें दिला आहे कीं, मराठी काव्यांत तरी त्याला तोड मिळणें कठीण! आरंभापासूनच तिसऱ्या सप्तकांतील सूर लावून ते म्हणतात,

" एक तुतारी द्या मज आणुनी, । फुंकिन मी जी स्वप्राणानें, । भेदुनि टाकिन सगळीं गगनें—। दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें; । अशी तुतारी द्या मजलागुनि ॥ " कोणी म्हणेल, ' तुतारीसारखें रण—वाद्यच तुम्हांला कां हवें? ' त्याला उत्तर कवि देतो, " सारंगी ती सतार सुन्दर। वीणा,

बीनहि, मृदंग, बाजा, । सूरहि, सनई, अलगुज माझ्या-। कसचीं हीं हो पडतिल काजा ? । एक तुतारी द्या तर सत्वर ॥ " हीं कोमल-मंजुल वाद्यें आपल्याला कां नकोत हें सांगतांना कवि म्हणतो, " रूढी-जुलूम यांची भेसुर । सन्तानें राक्षसी तुम्हांला । फाडुनि खाती, ही हतवेला-। जल्शाची का ? पुसा मनाला । तुतारिनें द्या सावध व्हा तर ! "

धर्मावर रूढीचीं पुटें बसून त्याचें मूळचें स्वरूप लोप पावलें आहे, हें केशवसुतांनीं काव्यपूर्ण वाणीनें सांगितलें आहे. तें असे, " अवडम्बरलीं ढगें कितीतरि, । रविकिरणांचा चूर होतसें, । मोहर सगळा गळुनि जातसें, । कीड पिकांवरि सर्वत्र दिसे । गाफीलगिरी तरिहि जगावरि । " टाकाऊ ठरलेल्या जुन्याला कवटाळून न धरतां इष्ट तें नवें स्वीकारण्यास तयार रहा, असा आदेशहि अलंकारिक भाषेनें त्यांनीं दिला आहे, तो असा—" जुन्या नभीं या ताजे तारक, । जुन्या भूमिवर नवी टवटवी, जुना समुद्रहि नव रत्नें वीं; । जुन्यांतून जी निष्पत्ति । नवी काय नव्हे ती श्रेयस्कारक ? "

अलंकाराचा आडपडदा टाकून आतां ते स्पष्टच म्हणतात, " जुनें जाउं द्या मरणालागुनि, । जाळुनि किंवा पुरुनि टाका, । सडत न एक्या ठायीं ठाका, । सावध ! ऐका पुढच्या हांका ? । खांद्यास चला खांदा भिडवुनि ! " घरकोंबड्यासारखे स्वस्थ बसून न रहतां मानवानें कायमची कीर्ति मिळण्यासारखीं सत्कृत्यें करावींत, हें ध्येय कवीनें किती सुंदर दृष्टांतानें सांगितलें आहे, पहा, ' प्राप्तकाल हा विशाल भूधर, । सुन्दर लेणीं तयांत खोदा, । निजनामें त्यांवरती नोंदा । बसुनी कां वाढवितां मेदा ? । विक्रम कांहीं करा, चला तर ! " वर्तमानकाळ हाच एक पर्वत आहे अशी कल्पना केली, तर त्यावर आपल्या नांवाची नोंद करा, त्याच्या पोटांत कलायुक्त लेणीं खोदा आणि पराक्रम करून लौकिक कमवा.

स्त्रियांना पुरुषांइतकें स्वातंत्र्य व समता द्या, अस्पृश्यतेचा मानवतेवरील कलंक पुसून टाका, इत्यादि आगरकरी विचारांचे स्फोट ' तुतारी ' मध्यें केशवसुतांनीं पुढील शब्दांत केले आहेत:-" स्त्रीवर्गाला दास्यीं दडपुनि,। दासीपुत्राचि मानव होतो, । स्त्रीला अज्ञानांत ठेवितो । परिणामीं दुर्दशेस

जातो, । धिक्कार अशा चालीलागुनि । पत्नींनिधनीं अन्य वरी नर, । परि पति मरतां स्त्रीचा, तीतें । बळेचि देतो संन्यासातें । पडली छाया मनुजाची जर । विटाळ होतो तर मनुजाला, । व्हावें स्नानाचि सचैल त्याला; । काय म्हणावें या मूर्खाला ?—नरेंच केला हीन किती नर ! ”

## नीतीची मीमांसा

आगरकरप्रभृतींनीं पुरस्कारलेल्या समाज—सुधारणेचा आत्मा समता हा आहे—‘ सारे मानव समान ’ हा युग-मंत्र आहे. तो तरुणांच्या चित्ता-वर बिंबवितांना केशवसुत हाकारतात, “ हल्ला करण्या तर दंभावर तर बंडांवर, । शूरांनो ! या, त्वरा करा रे ! समतेचा ध्वज उंच धरा रे । नीतीची द्वाही पसरा रे :। तुतारिच्या ह्या सुराबरोबर ! ” धर्माच्या आज्ञा, नीतीचे निर्बंध, या नांवाखालीं दुष्ट रूढि व घातक चालीरीती यांचेंच दडपण मानवावर पडतें. तें दूर करण्यासाठीं कवि असा सिद्धांत सांगतो कीं, “ नियमन मनुजासाठीं, मानव- । नसे नियमनासाठीं, जाणा प्रगतिस जर ते हाणी टोणा, । झुगारुनि तें देउनि, बाणा । मिरवा निज ओजाचा अभिनव ” गाईसाठीं दावें, दाव्यासाठीं गाय नव्हे; पतंगासाठीं दोरा, दोऱ्यासाठीं पतंग नव्हे; जहाजासाठीं नांगर, नांगरासाठीं जहाज नव्हे; त्याप्रमाणें मानवाच्या स्थैर्यासाठीं व प्रगतीसाठीं नीतीचे नियम, त्या नियमासाठीं मानव नाहीं, त्या नियमानें तो स्वतःला जखडून घेणार नाहीं हें तत्त्व सर्वमान्य होण्यासारखेंच आहे. पण मानवसमाजानें कोणतेंहि बंधन न पाळतां ‘ मनःपूत ’ वागावयाचें ठरविलें, तर दावें तोडलेल्या गाई-प्रमाणें तो समाज उधळेल, दोरा तुटलेल्या पतंगाप्रमाणें गोते खाईल आणि नांगर सुटलेल्या जहाजाप्रमाणें रसातळास जाईल. शाश्वत तत्त्वें व चंचल चालीरीति यांचा विवेक करण्याची बुद्धि समाज-नेत्यांनीं नीट वाप-रली, तरच समाजाची प्रगति योग्य दिशेनें होते. कारण, शेवटीं ‘ प्रगति ’ म्हणजे तरी काय ? याचा विचार येतोच. तो करूनच प्रगतीला पोषक अशीं तत्त्वें शांत—दांत व निर्लोभी—निर्मळ ऋषिमुनींनीं एकत्र केलीं. त्यांचा समुच्चय म्हणजेच नीति. अर्थात् त्या प्राचीन ज्ञानवंताइतका व

नीतिमंताइतकाच अधिकार आजच्या थोर पुरुषांना देशकालानुरूप नवी नीति घडविण्याचा आहे. म्हणून सत्य व शाश्वत तत्त्व कोणतें, देवांची बाजू कोणती, याचा स्वतंत्र बुद्धीनें पक्का निश्चय करून मग आपली सारी शक्ति त्या सत्पक्षाच्या पाठीशीं उभी करावी, असा उपदेश करतांना कवि शेवटीं म्हणतो, " पूर्वींपासुन अजुनि सुरासुर । तुंबळ संग्रामाला करिती;। सम्प्रति दानव फार माजती, । देवांवर झेंडा मिरविती । देवांच्या मदतीस चला तर ॥ "

## शांतीचा संदेश

' तुतारी 'सारखें रण-वाद्य ज्यांनीं आणलें, त्यांनींच रणांगणावरील सैनिकहि उभे केले. केशवसुतांनीं आपला नवा शिपाई' नव्या निशाणाखालीं उभा केला आहे. तो आपलें वर्णन करतांना म्हणतो, "नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें. । कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें । ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा, । तेच पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा " या नव्या शिपायाची वृत्ति विश्वबंधुत्वाची आहे. मानवता-धर्माचा जयजयकार करतांना तो आपला अनुभव सांगतो, " जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत, । सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत; । कोठेंही जा-पायांखालीं तृणावृता भू दिसते; । कोठेंही जा-डोईवरतें दिसतें नीलांबर तें ! " हिरवीं शेतें व निळें आकाश सर्वत्र समान आहे.

जगांतील तंटे-कलह नष्ट करून, आक्रमण व शोषण गाडून टाकून, युद्धें व महायुद्धें नामशेष करण्याचें ध्येय या शिपायाच्या डोळ्यापुढें आहे. तो म्हणतो, " शान्तीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे, । प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे ! "

## प्रगतीची प्रेरणा

' तुतारी ' किंवा ' नवा शिपाई ' यांच्याइतकेंच आवेशपूर्ण काव्य ' स्फूर्ति ' हेंहि आहे. त्याचा प्रारंभच किती उत्साहजनक व आशा-



संग्रहा

दायक आहे, पहा—" कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या। प्राशन करितां रंग जगाचे क्षणोक्षणीं ते बदलूं द्या ॥ " अमर्याद महत्त्वाकांक्षा व अकुंठित कर्तृत्व यांचा चैतन्यदायी संदेश त्या वेळच्या परतंत्र भारतीयाला केशवसुत देत आहेत. काव्याच्या नौकेंत बसून, आकाशापर्यंत आपण जाऊं व तेथून सारीं नक्षत्रें पृथ्वीवर, झाडावरून बोरें टाकावींत त्याप्रमाणें, फेकून देऊं, अशी कल्पनेची भरारी मारतांना ते म्हणतात, " क्लृप्तीची मग करुनी नौका व्योमसागरावरि जाऊं, । उडुरत्नें या गरिब घरेला तेथुनि फेंकुनियां देऊं । अडवतील जर देव, तरी झगडूं त्यांच्याशीं निकरीं, । हार न खाऊं रतीभरी ! ॥ "

ह्याच प्रगतीचा संदेश व आशावादाचा उपदेश, केशवसुतांनीं ' गोफण केली छान ! ' या कवितेंत जोरदार शब्दांनीं केला आहे. त्या कवितेच्या शब्दाशब्दांतून आवेश कसा उसळत आहे. आळशी, लोचट, बोलघेवडे अशा लोकांशीं झुंज खेळण्यासाठीं आवाहन करतांना कवि म्हणतो, " गांठ मारुनी वैराची । गोफण केली छान; । कठिण शब्द या धोंड्यांनीं । करितों हाणाहाण ॥ वैर तयाला, बसती जे । स्तिमितचि आलस्यांत । वैर तयांला पोकळ जे । बडबडती तोऱ्यांत । वैर तयांला वैरी जे । त्यांच्या पायधुळींत । लोळुनि कृतार्थ जे । प्राप्त तूपपोळींत । "

शब्दाची प्रेरक शक्ति किती असूं शकते, हें ' उत्तेजनाचे दोन शब्द ' या कवितेंत दिसून येते. पानपतचे भाऊसाहेब किंवा सिंहगडाचे शेलार-मामा यांच्या वीरश्रीनें रसरसणारे शब्द या कवितेंत भरलेले आहेत. आरंभच मुळीं असा जोरदार आहे, " जोर मनगटांतला पुरा । घाल घाल खर्चीं; । हाण टोमणा, चळ न जरा अचूक मार बर्ची ! ॥ दे टोले जोंवरी असे । तप्त लाल लोखंड; । येइल आकारास कसें । झाल्यावर तें थंड ? ॥ "

आगरकरांच्या सुधारकी विचारांचा एक प्रवाह केशवसुतांच्या काव्यां-तून जसा खळाळत वाहत आहे, तसाच दुसरा प्रवाह हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतून पाझरत आहे. विशेषतः स्त्रियांच्या उद्धारासाठीं

त्यांनीं आपल्या प्रतिभासंपन्न कादंबऱ्या लिहिल्या. त्यामुळें आनंदून जाऊन् केशवसुत " पण लक्षांत कोण घेतो 'च्या कर्त्यांस " अभिनंदनपूर्वक म्हणतात, " धीरा ! उन्नतिचे पथांत उमदा राऊत तूं चालसी ! । नाहीं काय ? करूनि चीत अगदीं ही रूढिका—राक्षसी, । टांकानें अपुल्या दुराग्रह जुना मर्मीं तसा विंधुनी, । स्त्रीजातीस असाच काढ वरती !—घे कीर्ति संपादुनी ! ॥ "

## मानवी कर्तृत्वाला हाक

मानवाच्या अंगचें कर्तृत्त्व त्याला जाणवून देण्याचें कार्य केशवसुतांनीं केलें आहे. ' विद्यार्थ्यांप्रत ' या कवितेंतील विचार किती उत्तेजनपर आहेत पहा — ' महत्व भारी आहे या पृथ्वीचें, । त्याहुनि अतिशय या सगळ्या विश्वाचें; । परि तुजमध्यें महतीचें जें बीज । त्याहुनि कांहीं मोठी नाहीं चीज ॥ अग्नि असे हा तेजस्वी रे फार, । त्याहुनि भारी सूर्य नभींचा थोर, । परी किरण जो तुजमध्यें सत्याचा । प्रकाश सर्वोत्तम तो आहे त्याचा ॥ पृथ्वीमध्यें रत्नें बहु आहेत; । आकाशीं तर असंख्य दिसताहेत; । परि एक रत्न तुजमध्यें जें सच्छील । कोणाला नच सर त्याची येईल ॥ "

सत्य व शील यांनीं संपन्न असलेला मनुष्य हा बलाढ्य राजालाहि भारी आहे, हा सिद्धांत मांडतांना अखेरीस ते म्हणतात, " स्नायूमध्यें पुष्कळ आहे शक्ति, । नृपवेत्रीं तर फारच आहे म्हणती; । परि एक एक जो नवा शब्द तूं शिकसी । शक्ति तयाची उलथिल सर्व जगासीं ॥ "

प्रगतीची आशा दाखविली, तशीच कृतीची प्रेरणाहि केशवसुतांनीं दिली आहे. प्रवृत्तिवादाचा उपदेश त्यांनीं अनेक कवितांतून केला आहे. ' सतत उद्योग ' हा मंत्र त्यांनीं शिकविला आहे. ' घड्याळ ' या कवितेंत ते म्हणतात, " वार्द्धक्य जर सौख्यांत जावया । व्हावें, पश्चात्ताप नुरुनियां तर तरुणा रे ! मला वाटतें, । ध्यानीं संतत आपुल्या आण घड्याळ जें हें अविरत वदतें— । ' आला क्षण—गेला क्षण ॥ भिंतीवरील घड्याळाचा लंबक इकडून तिकडे व तिकडून इकडे येतो; त्याप्रमाणें प्रत्येक

कडव्याच्या शेवटचे ' आला क्षण—गेला क्षण ' हे शब्द हेलकावे खातात,—नाहीं ?

## ' निघतील तयांचे चेले '

लौकिकी विषय, विविध चाली, देशभक्तीचे विचार, गूढगूंजनाचें तत्त्वज्ञान, निसर्गाचें प्रेम, प्रणयाची भावना, निर्यमक रचना इत्यादि नवीं लेणीं महाराष्ट्र शारदेच्या अंगावर केशवसुतांनीं चढविलीं. सुनीतें हा काव्य-प्रकार त्यांनींच रूढ केला. त्यांनीं जीं आठ सुनीतें रचलीं, त्यांतील " मयूरासन आणि ताजमहाल " हें आदर्शभूत आहे. सहा कोटि रुपये खर्चून केलेलें मयूरासन चोरानें पळविलें, पण त्याच्या निम्या खर्चांतच यमुनातीरावर बांधलेलें प्रेम—मंदिर-तो ताजमहाल, मात्र तेथें कायम आहे. स्वार्थापेक्षां प्रीतीचें हें श्रेष्ठत्व ' मत्त भ्रांत नरा 'स पटवून कवि शेवटच्या दोन ओळींत सालंकृत भाषेनें असा सिद्धांत सांगतो, " काडी एकच गंध-युक्त, नमुनी प्रीतीस तूं लाव ती । तीचा वास सदा जगीं पसरुनी देईल तो तुष्टिला ॥ " सारींच सुनीतें अशीं 'अैट श्लोकी' आहेत असें नाहीं.

ललित शब्दरचना किंवा अलंकारांची सजावट या बाह्यांगाकडे केशव-सुत फारसें लक्ष देत नाहींत. गोफणींतील धोंड्यांनीं हाणाहाण करण्याचाच त्यांचा बाणा—श्रीसमर्थ रामदासांच्या संप्रदायास शोभणारा. तथापि 'सतारीचे बोल' यासारखीं कवनें बाह्यांगानेंहि रमणीय आहेत. 'फुलपांखरूं', ' गुलाबाची कळी ' दंवाचे थेंब ' इत्यादि कविता तर धावत्या—बागडत्या भाषा—शैलीनें नटलेल्या आहेत—' बालकवी 'नाहि शोभण्यासारख्या आहेत. ' नाहीं ज्यांपरि डोंगळा ' या एका चतुःश्लोकी कवितेंतील चौदा ओळींत बारा उपमा केशवसुतांनीं गुंफिल्या आहेत. तसेंच ' वियुक्ताचा उद्गार ' या सुनीतावर आठ उपमांची माळ घातली आहे. पण अशीं बाहिरंगाची खुलावट हें कांहीं केशवसुतांचें वैशिष्ट्य नव्हे. नव्या युगाचें स्वागत करून त्याचा मंत्र वाचकांच्या कानीं स्वतंत्र रीतीनें व आवेशानें त्यांनीं घातला, यांत त्यांची थोरवी आहे. या त्यांच्या कार्याचें गुण-गान त्यांचे 'सच्चे चेले' गोविंदाग्रज पुढील सूचक व वेधक शब्दांनीं करतात,

निजलेल्या जागृति आली । हो ताजे जें थकलेलें ।
तों शब्द मुक्याला सुचलें ।
गूढास रूप सांपडलें ।
स्वच्छंद अचेतन हाले ।
नश्वर ते ईश्वर केलें । केशवसुत गाउनि गेले ॥

अशा जागृतिकारक, चैतन्यदायक व नावीन्यपूर्ण कवितांचा संप्रदाय निर्माण करणारे केशवसुत "सर्वांच्या हृदयीं भरले । सर्वांच्या जीवीं भिनले । निघतील तयांचे चेले । केशवसुत गाउनि गेले ॥"

## अभ्यासाच्या वाटा

(१) 'आद्य नवकवि' 'युगप्रवर्तक' हीं विशेषणें केशवसुतांच्या नांवामागें लावतात, तीं कां ?

(२) 'नव्या युगाविषयीं आशावाद' ही गोष्ट केशवसुतांच्या काव्याचें वैशिष्ट्य आहे. हा आशावाद कोणता ? कोणत्या कवितांतून तो दिसून येतो ?

(३) कवित्वशक्तीचा महिमा केशवसुतांनीं कोणत्या प्रकारें वर्णिला आहे ? त्यांत आत्मप्रौढी आहे असें कांहीं म्हणतात, तुम्हांस तें पटतें काय ?

(४) आगरकरांचें सामाजिक कार्य केशवसुतांनीं काव्यद्वारां पुरस्कारिलें हें कशावरून ?

(५) कौटुंबिक जिव्हाळा ज्या कवितांत केशवसुतांनीं रंगविला आहे, त्यांच्या आधारें या जिव्हाळ्यासंबंधींचे कर्त्याचे विचार लिहा.

(६) सतारीचे बोल, झपूर्झा, तुतारी, या कविता मूळ पुस्तकांतून नीट अभ्यासा व त्यांतील विचार थोडक्यांत लिहा.

# गोविंदाग्रज : : : : २

' प्रतिभासंपन्न कवि ' म्हणून गडकऱ्यांनीं अर्वाचीन मराठी कविवर्गामध्यें अत्युच्च स्थान संपादिलें आहे. विनोदकार म्हणून त्यांनीं अलोट लौकिक कमावला व नाटककार म्हणूनहि असामान्य यश मिळविलें, पण



कवि म्हणून त्यांनीं जी कीर्ति प्राप्त करून घेतली, तिला आधुनिक मराठी साहित्यांत तोडच नाहीं. ते हाडाचे कवि होते आणि त्यांचा पिंड भावनोत्कट होता. हास्यपूर्ण विनोद करण्यांत ते जितके यशस्वी झाले, त्याहून कारुण्यपूर्ण नाटकें रचण्यांत त्यांना अधिक सिद्धि लाभली; पण सर्वांत श्रेष्ठ पद त्यांनीं पटकावलें तें प्रेम–कवि म्हणूनच. शब्दांचें नाद–माधुर्य, कल्पनेचें सौंदर्य व भावनेची तीव्रता या तीन गुणांचे बाबतींत त्यांचा हात धरणारा दुसरा कवि अर्वाचीन मराठींत निर्माण व्हावयाचा आहे. आधुनिक मराठी काव्याचे ' गडकरी ' अद्याप तेच आहेत. त्यावर आपल्या यशाचें नवें निशाण चढविणारा वाग्वीर अद्याप जन्मास यावयाचा आहे.

## केशवसुतांचा सच्चा चेला

केशवसुती काव्य—संप्रदाय गडकऱ्यांनीं आपल्या कवनांनीं पुष्ट व रम्य केला. आधुनिक काव्याचा गाडा मराठीच्या मुलुखांत गडकऱ्यांनीं पुष्कळच पुढें नेला. आंग्ल काव्यांतील प्रवृत्तिवाद केशवसुतांनीं मराठींत

रोकड्या भाषेनें पुरस्कारला, तोच त्यांच्या 'सच्या चेल्यानें' अधिक काव्य-मयतेनें मांडला. गुरूपेक्षां चेल्याला कल्पकतेची देणगी अधिक प्रमाणांत लाभली होती हं निःसंशय. राष्ट्रीय व सामाजिक विषयांची तळमळ मात्र केशवसुताइतकी गोविंदाग्रजांमध्यें दिसत नाहीं. पण त्याची भरपाई त्यांच्या उज्ज्वल प्रतिभेनें भरून काढली आहे. पहिल्याची 'तुतारी,' तसा दुसऱ्याचा 'दसरा'; पहिल्याचा 'झपूर्झा' तशी दुसऱ्याची 'फुटकी तपेली,' पहिल्याची 'सतार' तशी दुसऱ्याची 'मुरली.' अज्ञेयाचा शोध करीत गूढ-गुंजनामध्यें रमण्याची वृत्तिहि केशवसुतांप्रमाणें, गोविंग्रजांमध्यें आहे, पण कमी प्रमाणांत. प्रतिभेची भरारी मारण्यात मात्र शिष्यानें गुरूचा पराजय केला आहे. अल्पायुष्यांतहि गडकऱ्यांनीं केशवसुतांवर ताण केली आहे. केशवसुतांना ३९ वर्षेच आयुष्य लाभलें म्हणून हळहळ-णाऱ्या रसिकांच्या डोळ्यांना गोविंदाग्रज अवघ्या ३४ व्या वर्षींच जगाच्या रंगभूमीवरून, काळाच्या पडद्याआड जाऊन, अंतर्धान पावल्याचें दुःखद दृश्य पहावें लागलें. यामुळें साहित्याची विपुलता दोघांच्याहि गांठीं नाहीं. केशवसुतांनीं १३५ कविता रचल्या. तर गोविंदाग्रजांनीं सुमारें १५० कविता लिहूनच आपल्या आयुष्याचा ग्रंथ आटोपला !

## गडकऱ्यांचे गुण-विशेष

ऐन जोमाचें व जोसाचें काव्य—लेखन गडकऱ्यांनीं १९११ ते १९१६ या पांच वर्षांतच केलें. आतां हें खरें कीं, तारुण्याच्या भावनो-त्कट काळांतच खरें काव्य स्फुरतें. कोकिळा वसंतांतच कूजन करते, इतर दहा महिने तिच्या दृष्टीनें व्यर्थच. आणखी पन्नास वर्षें गडकरी जगते, तरी "राजहंस, प्रेमपाठ, गुलाबी कोडें, गोड निराशा, गोफ" अशा काव्य-रत्नें त्यांच्या कल्पकतेच्या खाणींतून निघालींच असतीं, अशी ग्वाही कोण देऊं शकेल ? कदाचित् भाषेची सहजता वाढली असती, दृष्टीला व्यापकपणा लाभला असता, भावनेला विवेकाची जोड मिळाली असती; पण पूर्ववयांतील भावनेची उधाण भरती शिल्लक राहिली असती काय ? आणि लाटांचा खुळखुळ आवाज व मोत्यासारखा फेस यांना लाजविणारें

मंजुळ व रेखीव पद-लालित्य तरी पुढें कायम राहिलें असतें कीं नाहीं ? शब्द-माधुर्य, कल्पना-सौंदर्य व भावना-तीव्रता या त्रिगुणांची चमक तारुण्यांत एकदां लकाकून गेली ती गेली ! गोविंदाग्रजांच्या या अलौकिक गुणांचें वर्णन त्यांच्यापेक्षां अधिक सरस रीतीनें दुसरें कोण करूं शकेल ? त्यांनींच एका कवितेंत योजलेले शब्द त्यांच्या लालित्यपूर्ण, कल्पनासंपन्न व भावनोत्कट काव्याचें यथार्थ गुण-वर्णन करूं शकतील. ते शब्द असे–

“ नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी।
नाचंत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हां ताजीं ॥
शब्दांचा चढविला क्षुणोक्षणीं फुलता पोशाख ।......
तुरा शिरावर डुलतो पवनीं तरल कल्पनांचा ॥

## निराशेची कारण-मीमांसा

अल्पायुष्याप्रमाणेंच निराशेच्या बाबतींतहि गोविंदाग्रज केशवसुतांशीं ‘ समानधर्मी ’ आहेत. केशवसुतांना मॅट्रिकनंतर शिक्षणाचा दरवाजा बंद झाला, तर गोविंदाग्रजांना कॉलेजच्या पहिल्या वर्षाचें वारें अंगावर घेतां आलें, इतकेंच. स्वतःच्या बुद्धिमत्तेबद्दल गोविंदाग्रजांना पराकाष्ठेचा अभिमान होता–आणि त्यामुळें तर त्या बुद्धीला शिक्षणाच्या अंतराळांत उड्डाण करावयास न लाभल्यानें त्यांना निराशेचें दुःख अधिकच जाणवलें. त्यांत भर आर्थिक आपत्तींची. चारितार्थासाठीं केशवसुतांना कोणतीहि नोकरी, कोठें तरी करावी लागली आणि खानदेशापासून कर्नाटकापर्यंत धांव मारावी लागली. गडकऱ्यांना सामान्यतः पुणें हें एकच मायपोट ठरलें, तरी कांहीं काळ न्यू इंग्लिश स्कूलमध्यें काढावा लागला, तर कांहीं काळ ‘ किर्लोस्कर नाटक मंडळीं ’तील बाल-नटांना शिकविण्यांत कंठावा लागला. क्वचित् नाट्यगृहाच्या प्रवेशद्वाराशीं उभें राहण्याचाहि प्रसंग आला. काव्यापेक्षां नाटक अधिक द्रव्य-दायक. ‘ प्रेम-संन्यास ’ या पहिल्या नाटकाचा मोबदला त्यांना पांचशें रुपये मिळाला. पण उभ्या आयुष्यांत त्यांनीं नाटकें लिहिलीं किती ? चार पूर्ण व दोन अपूर्ण.

आयुष्याच्या शेवटीं शेवटीं त्यांना नाटकापासून भरीव अर्थ-प्राप्ति झाली. पण तोंपर्यंत दारिद्र्यानें त्यांच्या जीवनाची फरफटच चालविली होती !

## प्रेम-भंगाचें रहस्य

विद्या व व्यवसाय या दोन्ही क्षेत्रांतील निराशेला कडवटपणाची धार पाजण्याचें काम गोविंदाग्रजांचे बाबतींत आणखी एका घटनेनें केलें. ती घटना म्हणजे प्रेम-भंग ! त्यांचें ज्या मुलीवर प्रेम बसलें होतें, तिचें लग्न दुसऱ्याशीं झालें आणि गडकऱ्यांनींहि हताश मनःस्थितींत १९१७ सालीं, मरणापूर्वीं दोनच वर्षें दुसरा विवाह केला. या नाखुषीच्या बंधनाचें वर्णन ते करतात, ' नवीं बंधनें तुला लाभलीं–आणि लाभतील तशीं मला । परंतु गेली पहिली प्रीति ... । '

ही पहिली प्रीति कोणती ? तर ' गडकऱ्यांचें अंतरंग ' या टीका-ग्रंथांत प्रा. वाळिंबे सूक्ष्म चिकित्सा व गाढ संशोधन करून असें उत्तर देतात कीं, पंधराव्या वर्षीं गडकऱ्यांनीं एका बालेवर प्रेम केलें होतें. लॉर्ड बायरन या आंग्ल कवीनेंहि पंधराव्या वर्षींच एका मुलीला आपल्या प्रेमाचा विषय बनविलें होतें—आणि पुढें ती मुलगी त्याच्या अनेक काव्यांचा विषय होऊन बसली ! गडकऱ्यांची ही हृदय–शारदा' कोण ? याचाहि बारीक तपास त्यांच्या काव्याच्या चरणावरून करून, प्रा. वाळिंबे यांनीं त्या मुलीचें नांव ' तारा ' असल्याचा छडा लावला आहे. "माझी तारा, माझा वारा. तुझ्या प्रेमधार्मीं " असे सूचक उद्गार गडकऱ्यांनीं अनेक कवनांत खुबीनें पेरलेले आहेत, हा त्यांचा पुरावा. सात वर्षें त्या प्रेम – मूर्तीचा जो निदिध्यास गडकऱ्यांना लागला व अखेर जो दारुण निराशेचा तीव्र घाव त्यांच्या हळुवार हृदयावर बसला, त्या सर्वांचे पडसाद त्यांच्या वेळोवेळींच्या काव्यांतून उमटले आहेत. ' एकांतीं तच्चिंतन करणें दुःखावेगीं विस्मरणें ' या निराशेचे आर्त सूर त्यांच्या काव्याच्या गोलघुमटांत एकसारखे ऐकूं येतात.

## अल्पायुष्यांतील महत्कार्य

गुजरातेंतील नवसारी तालुक्यांत गणदेवी या गांवीं गडकऱ्यांचा जन्म

ता. २४ मे १८८५ रोजीं झाला. लहानपणींच त्यांचे वडील वारले. त्यामुळें दारिद्र्य त्यांच्या शिक्षणाच्या वाटेंत आड आलें. वयाच्या १९ व्या वर्षीं ते मॅट्रिक झाले आणि कॉलेजांतील पहिल्या वर्षी अपयश पावून त्यांनीं शिक्षणाला पूर्णविराम दिला. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें त्यांनीं कांहीं दिवस शिक्षकाचें काम केलें व कांहीं काळ 'किर्लोस्कर नाटक मंडळीं'तील मुलांना शिकविलें. चार पूर्ण व दोन अपूर्ण नाटकें लिहून त्यांनीं द्रव्य व कीर्ति संपादिली. हा प्रतिभाशाली कवि वयाचे ३४ वे वर्षीं, ता. २३ जानेवारी १९१९ रोजीं दिवंगत झाला.

## प्रेमाचा शाहीर

गोविंदाग्रजांनीं जीं दीडशें कवनें रचलीं तीं नादमाधुर्य, कल्पनासौंदर्य व भावोत्कटता या तिन्ही गुणांमुळें महाराष्ट्र रसिकांच्या जिव्हाग्रावर नाचत राहिली. त्यांतील निम्याहून अधिक कविता तर प्रेमविषयकच आहेत. प्रेमाचा विषयच मुळांत मधुर. तो गोविंदाग्रजांनीं मधुरतर भाषेनें नटवून व मधुरतम कल्पनेनें फुलवून मांडलेला. प्रेमाचे जे निरनिराळे पैलू-प्रकार आहेत ते त्यांनीं घोळघोळून गायलेले आहेत. कोठें प्रेमाचा अंकुर आहे, कोठे प्रेमाचें साफल्य आहे तर कोठें प्रेमभंग आहे. हे सर्व सूर त्यांच्या काव्यसृष्टींत निनादत असलेले ऐकूं येतात. 'गोफ' 'गोड निराशा' 'गुलाबी कोडें' 'पहिलें चुम्बन,' 'प्रेमपाठ,' 'प्रेम आणि मरण,' 'भीमकवाळा' इत्यादि त्यांच्या कविता म्हणजे रसपूर्ण प्रेमगीतें होत. मराठींतील शृंगार-रसाचीं सभ्य व सुंदर उदाहरणें म्हणून या प्रेमगींताकडे कोणीहि अभिमानानें बोट दाखवावें.

## रसांची विविधता

'घास' 'घुंगुरवाळा' इत्यादि कांहीं थोड्या कवितांमधून त्यांनीं जो वत्सलरस खेळविला आहे, तो अत्यंत कोमल व हृदयस्पर्शी आहे. आणि करुणरसांत तर त्यांचा हात धरणारा कवि क्वाचितच ! 'राजहंस माझा निजला' हें त्यांचें शोकगीत म्हणजे त्यांच्या काव्यमालेंतील

'कौस्तुभ'च होय. महाराष्ट्र-शारदेच्या कंठांत गोविंदाग्रजांनीं घातलला ही 'वैजयंती' माला नवरत्नहाराहून अधिक मोलाची आहे. जसा कारुण्यांत तसाच हास्यांत गडकऱ्यांचा हातखंडा होता. रसिकांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु वहावयास ते जसे लावीत तसेंच त्यांना खोखो हसावयासहि ते लावीत. करुण व हास्य या दोन रसांच्या गंगा-यमुना त्यांच्या नाटकांतुन जशा मोठ्या वेगानें दुथडी भरून चाललेल्या आढळतात, तशाच त्यांच्या निरनिराळ्या काव्यामध्येंहि दिसून येतात. 'चिन्तातुर जन्तु' 'विहिर्णीचा कलकलाट' 'काय करावें?' इत्यादि कवितांमध्यें त्यांनीं विनोद निर्माण केला आहे. गडकऱ्यांच्या मनांत अमर्याद इच्छा खेळत असल्यानें आणि त्या तृप्त न झाल्यानें निराशेचें वादळ तुफान वेगानें सदैव वहात असे. त्या वादळाचे पडसाद त्यांच्या काव्यांतून सहजच ऐकूं येतात. समाजांतील द्वेष व दंभ, दैन्य व दारिद्र्य, वंचना व वैफल्य हें पाहून तर त्यांच्या निराशेला भरती येत असेच, पण त्याशिवाय मानवी जीवनाची अपूर्णता ध्यानांत आल्यानेंहि त्यांच्या बुद्धीची तडफड होई. त्या तडफडींतूनच 'फुटकी तपेली,' 'स्मशानांतलें गाणें' 'मुरली' वगैरे तात्त्विक काव्यें बाहेर पडलीं. गडकऱ्यांना महाराष्ट्राचा किती जाज्वल्य अभिमान होता-आणि त्यांतहि शिवरायावर त्यांची किती गाढ भक्ति होती हें 'श्रीमहाराष्ट्रगीत,' 'पांच देवींचा पाळणा' वगैरे कवितावरून दिसून येतें. तसेंच लो. टिळक, ना. गोखले अशासारखे राष्ट्र-नेते आणि केशवसुत, बालकवि यांसारखे काव्यांतील संप्रदाय-निर्माते यांजविषयींचा आदरभाव प्रगट करणारीं काव्येंहि त्यांच्या भक्तिपूर्ण अंतःकरणांतून झुळझुळत आहेत.

## मराठीचा ताजमहाल

संस्कृत वाङ्मयांत कालिदासाचा अज-विलाप जितका प्रसिद्ध आहे, तितकाच गोविंदाग्रजांचा 'राजहंस' मराठींत प्रशंसा पावलेला आहे. १९१२ सालीं मनोरंजन मासिकाच्या जुलै महिन्यांच्या अंकांत ज्या वाचकांनी ही कविता प्रथम वाचली, त्यांचीं अंतःकरणें जशीं कारुण्यानें तशीच विस्मयानें

भरून गेलीं. एखाद्या व्यापाऱ्यानें एकाहून एक अधिक तेजस्वी असें जडजवाहीर दाखवावें, त्याप्रमाणें गोविंदाग्रजांनीं एकाहून एक सरस अशीं कडवीं या नाट्यगीतांत गोवलेलीं आहेत. तीं पाहतांना चकित व मुदित न होणारा रसिक विरळा. एका प्रतिभाशाली कवीनें कोरलेलें हें 'कैलास लेणें' आहे. ही बालगंधर्वांची करुणरम्य तान आहे—हें अर्वाचीन मराठी काव्याचें गौरीशिखर आहे. यांतील शब्दाचें शिल्प, भावनांचें तेज, कल्पनेची चमत्कृति आणि भाषेची मोहिनी इतकी असामान्य आहे कीं, खरोखर या काव्याला 'साहित्यांतील ताजमहाल 'च म्हटलें पाहिजे. ताजमहाल म्हटला कीं, सर्वत्र संगमरवराचें शुभ्र सौंदर्य विलसत असतें, त्यावरील ताजेपणा अखंड फुललेला असतो आणि मेहरपीपासून मनोऱ्यापर्यंत त्याचे अंगन्‌अंग कांतिमान्‌, प्रमाणबद्ध व आकर्षक असते, तेंच तेज, तेंच वैभव, तोच डौल ' राजहंस ' या काव्यांत गडकऱ्यांनीं आणलेला आहे. ताजमहालाला उठाव आणणारी पार्श्वभूमि म्हणजे काळी यमुना; तशीच करुणरसाची धार राजहंस काव्यामध्यें आरंभापासून अंतापर्यंत चढत्या वेगानें वहात आहे. ताजमहाल म्हणजे एका बादशहानें उभारलेलें आपल्या पत्निप्रेमाचें करुणरम्य काव्य; तर 'राजहंस' म्हणजे 'राम बादशहानें ' रचलेलें शोक–काव्याचें शिल्पच !

या काव्यांत दोष असलाच तर अतिरेकाचा आहे—अल्पत्वाचा नाहीं. त्यांतील भावनेचा उद्वेग कोणाला अस्वाभाविक वाटेल तर कोणाला त्यांतील अलंकारांचा वर्षाव नकोसा होईल. कण्वाश्रमांतील शिष्यांना दुष्यंताचा लखलखीत राजवाडा पाहून आग लागल्यासारखें वाटलें ना? कांहीं साध्याभोळ्या लोकांना पंचपक्वानांची मेजवानी पाहूनच जिभेला मिठी बसते आणि कांहींना तर अत्तराचा वासहि उग्र वाटून खपेनासा होतो. अशा साध्यासुध्या अभिरुचीच्या रसिकांनाहि मान डोलावयास लावण्याजोगी पुष्कळ कडवीं राजहंसाच्या रत्न–मालेंत गुंफलेलीं आहेत. ज्याची अभिरुची सूक्ष्म व सुसंस्कृत आहे, त्याला तर हें काव्य म्हणजें अमृतरसानें भरलेलें सुवर्णपात्रच वाटेल. यांतील एकेक ओळ म्हणजें. रसवत्तेचा तरंग आहे. "तें हृदय कसें आईचें । मी उगाच

सांगत नाहीं ॥ " ही ओळ किती साधी ! पण तिच्यांत मातृप्रेमाचें केवढें भाण्डार लपलेलें आहे ! "जें आनंदेंही रडतें । दुःखांत कसें तें होई ? ॥" या सात शब्दांत मातृप्रेमाचे सप्तसमुद्र सांठवलेले नाहींत काय ? जसें परमेश्वराचें स्वरुप, तसेंच मातेचें प्रेम !—दोन्हीहि शब्दांच्या पलीकडे ! म्हणूनच कवि हवाला देतो " हें कुणि कुणा सांगावें ? । आईच्या बाळा ठावें । प्रेमाच्या गांवा जावें । मग ऐकावें या बोला ॥ "

## कथानकांतील कारुण्य

' राजहंस माझा निजला ! ' हे बोल कोणी काढले आहेत ? एका विधवा मातेनें ! तिचा पति नुकताच निधन पावलेला. तिच्या आशेचा तंतु म्हणजे तिचें तें चिमुकलें मूल. पण तेंहि देवाघरीं गेलें आणि तिच्या भावी जीवनाचा आधार तुटला ! त्यामुळें तिच्या शोकाचा कळस झाला-तिच्या मनाला भ्रम झाला—तिचें हृदय बधिर झालें—" अति दुःख थिजवि चित्ताला. " त्यामुळें तिच्या मांडीवर मेलेलें मूल असतांनाहि तिला वाटतच होतें कीं, माझा बाळ केवळ निजला आहे. पण—" जन चार भोंवतीं जमले । मृत बाळा उचलायाला । तो काळ नाथ-निधनाचा । हतभागि मना आठवला । तो प्रसंग पहिला तसला । हा दुसरा आतां असला ॥ तें चित्र दिसें चित्ताला । हें चित्र दिसें डोळ्यांना । निज चित्र चित्तनयनांला, । मग रडुनि वदे ती सकलां । " राजहंस माझा निजला ! " । आपल्या पतीच्या मृत्यूचा प्रसंग तिच्या मनापुढें उभा राहिला, मुलाच्या मरणाचें दृश्य तिच्या डोळ्यापुढें दिसूं लागलें आणि पति नाहीं, पुत्र नाहीं, कोणताच आधार नाहीं अशा असहाय्य स्थितींत आपण आपलें जीवन एकाकीपणानें कंठीत आहोंत, हें स्वतःचें चित्र तिच्या मनापुढें व डोळ्यापुढें खडें झालें.

पण तिच्या हृदयाला पुनःपुनः शोकाचे झटके येत होते आणि तिच्या प्रेमान्ध बुद्धिला वाटत होतें कीं, आपला बाळ नुकताच झोपीं गेला आहे. त्याची झोपमोड होऊं नये म्हणून ती वत्सल माता इतर लोकांना विनवीत आहे, " करुं नका गलबला अगदीं । लागली झोंप मम बाळा । आधींच

झोप त्या नाहीं । खेळाचा एकच चाळा । जागतांच वाऱ्यासरसा । खेळाचा घेइल आळा ॥ वाजवूं नका पाऊल । लागेल तया चाहूल । झोंपेचा हलका फूल । मग झोपायाचा कुठला । "राजहंस माझा निजला !"

## भावनेची तरलता

आणि तें बालक किती मनोहर होतें ? आई सांगते "हे काळे कुरळे केस । खेळतात डोक्यावरती । ही दृष्टि पहा मम वदनीं । नेहमीं अशी हीं असती । हें तेज अशा रत्नाचें । झालें का आहे कमती ? ॥ कानांत नाचती डूल । तोंडावर हंसरें फूल । जीवाची घालुनि झूल । मी असाच झांकिन याला । राजहंस माझा निजला" बिचारीला असें पुनः पुनः वाटत होतें कीं, आपला बाळ मेलेला नाहीं—जिवंतच आहे. इंदुमतीचे कुरळे केंस वाऱ्यानें हालतांच अज राजाला नाहीं का भास झाला तीं जिवंत असल्याचा ? "कुसुमोत्खचितान्वलीभृतश्चलयन् भृंगरुचस्तवालकान् । करभोरु करोति मारुतस्त्वदुपावर्तनशंकि मे मनः" (रघुवंश ८ वा सर्ग ५३ वा श्लोक) आणि ही तर बोलूनचालून अल्पवयी माता ! शोकसागरांत तिचें मन पार बुडालें आहे. खऱ्याखोट्याचें तिचें भानच नाहींसें झालेलें. तीच इतरांना पुनः पुन विचारीत आहे, "या अर्ध्याउघड्या नयनीं । बाळ काय पाहत नाहीं ? । या अर्ध्यामिटल्या तोंडीं । बाळ काय बोलत नाहीं ? । अर्थ या अशा हंसण्याचा मज माझा कळतो बाई ॥ हें हसें मुखावर नाचे । जणुं बोल दुग्धपानाचे । कीं मुक्या समाधानाचे । इतुकेंहि कळे न कुणाला—। "राजहंस माझा निजला !"

## कल्पनांची मोहनमाळ

"बाळाचे हे काळेभोर डोळे, त्याचें हें कोवळें मुखकमल, त्यावर नाचणारें हें मुक्तहास्य—नेहमींसारखें जसेंच्या तसेंच अखंड आहे. तो केवळ निजलेला आहे हो ! मानस सरोवरामध्यें पोहणारा राजहंस मोती खाऊन जसा झोंपी जातो, तसा माझ्या प्रेमानें पोट भरलेला हा माझा

बाळ निजून राहिला आहे, असें इतरांना परोपरीनें समजावून सांगण्यासाठीं ती शोकानें वेडी झालेली आई म्हणतें, "या माझ्या मानस-सरसीं । सारखें प्रेमजल वाही । त्या तरंग-लहरीवरतीं । राजहंस पोहत राही । सारखा पोहुनी दमला । मग मला भुकेला बाही । नयनांच्या शिंपामधुनी । अश्रूंचे मौक्तिकसुमणी । मीं दिले तया काढोनी । मोत्यांचा चारा असला । राजहंस खाउनि निजला !" तिला मुळीं पटतच नाही कीं, आपला बाळ काळमुखीं गेलेला आहे ! आणि लोकांच्या सांगण्यावरून तो मृत्यु पावला असें मानले तरी यमदूत त्याला उचलून नेणार नाहींत अशी तिची खात्री आहे. कारण, "जरि दूत यमाचे आले । लाडक्यास या न्यायाला । ते निष्ठुर असले तरिही । भुलतील पाहुनी याला । हृदयाचें होउनि पाणी । लागतील चुंबायाला । मी मुका असा घेतांना—। हा पहा-पुन्हा हंसला ना ? । कां अशा फिरवतां माना ? । सुख खुपे काय डोळ्याला ? । राजहंस माझा निजला !" कोणतें वत्सल हृदय गहिंवरणार नाहीं हें ऐकून ?

ती शोक-वेडी माउली विचारते, "मी इतकी वेडी कां हो ?" पुढें लोकांचें म्हणणें ऐकून मूल मेल्याचें तिनें क्षणभर गृहीत धरलें तरी ती त्या मुलाला आपल्या मांडीवरून नेण्याला व पुढें जमिनींत पुरण्याला कशी संमती देइल ? अंगाई गाऊन आईनें पाळण्यांत अलगद निजावलें तरी त्यांतील मऊ गादी ज्याला रुतते, त्याचा कोवळा, लुसलुशीत देह——छे, तिला कल्पनाच करवत नाहीं. ती निर्धारानें बजावते, "जरि होउं नये तें झालें । तरि सोडणार या नाहीं । पाळणाहि रुततो ज्याला । प्रेमें जरि निजवी आई । तो देह खांच—दगडांत—। छेः, नको नको ग बाई । हृदयाची खणुनी खांच । झाकिन मी बाळ असाच । दुःखाचे फत्तर साच । जा ! जाउनि सांगा काळा । "राजहंस माझा निजला" कालिदासानेंहि अज राजाच्या तोंडीं अशीच कल्पना घातलेली आहे. अज म्हणतों, "मृदुपल्लवसंस्तरेऽपि ते मृदु दूयेत यदंगमर्पितम् । तादिदं विषहिष्यते कथं वद वामोरु चिताधिरोहणम् ॥ ( रघुवंश—सर्ग ८ श्लोक ५७ )

पण मृत्यु अटळ आहे— जग दुःखमय आहे—व्यवहार कठोर आहे.

त्या मृत बाळाला उराशीं धरून त्याच्या मुखावर आपलें मुख ठेवून त्याचें अखेरचें चुंबन घेऊन व डोळ्यांत सारा जीव एकवटून, त्याच्याकडे निरखून पाहून, तीहि निजून गेली. बाळ आणि आई—दोघेंहि धरणीमातेच्या अंगावर कायमचीं पहुडलीं. तें पाहून माणसेंच काय, पण वृक्ष-लता, पशु-पक्षी, फार काय दगडहि दुःखी झाले त्यांचें वर्णन करतांना कवि शेवटीं म्हणतो, " मग मातापुत्रावरि त्या । तरु गाळिति कोमल पानें । ढाळिती लता निजसुमनें । पशुपक्षिहि रडती गानें । दशदिशा दगडही कढती । मन दुभंगुनी शोकानें ! दुमदुमतें स्थळ तें अजुनी, । त्या एकाच करुणा-गानीं । जा जाउनि ऐका कानीं ! ऐकाल याच बोलाला - " राजहंस माझा निजला ! "

प्रभु रामचंद्रानें सीतेसाठीं जो आक्रांत केला तो ऐकून " अपि ग्रावा रोदित्यपि " अशी स्थिति झाल्याचें भवभूतीनें संस्कृत भाषेंत जें हृदय-भेदक वर्णन केलें आहे, त्याचाच हा मराठी प्रतिध्वनी तितकाच हृदय-द्रावक नाहीं काय ? खरोखर कालिदास–भवभूतींनींहि माना डोलवाव्या अशाच थोर योग्यतेचें 'राजहंस' हें मराठी काव्य आहे.

## अन्य रसांची जोड

' राजहंस ' म्हणजे चंदनी पेटींत ठेवलेलें करुणरसाचें अत्तरच पण करुणाला शृंगार, वत्सल, हास्य इत्यादि रसांची जोड देऊन त्याचा विल-क्षण उठाव करण्याची शक्तिहि गोविंदाग्रजांच्या ठायीं आहे. 'भीमकबाळा' हें छोटेसें कवन म्हणजे शृंगार मिश्रित करुणाचें उदात्त उदाहरण होय. ' माझी स्वतःची एवढीच कविता मला आवडते ' अशी शिफारस खुद्द कवीनें केली आहे. तींत रुक्मिणी श्रीकृष्णाचा धावा करतांना म्हणते,

" कधिं पाहिनसें झालें मजला सांवळि ती काया । कधिं वाहिन ही काया माझी देवा तव पायां । कधीं सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा । मिळेल केव्हां अभागिनीला प्रेमाचा ठेवा । नका करूं छळ याहुनि माझा अजुनी घननीळा । वाट बघूं किती घेउनी हातीं अश्रूंची माळा । किती आळवूं परोपरीनें ? कंठ किं हो सुकला । तरी यावया अजुनी माझा माधव

का चुकला ? । सर्वसाक्षि भगवंता ! आतां अंत नका पाहूं । कीं विष-पानें प्राण तरी हा पदकमला वाहूं ? ”

शोकरसाच्या लाटा प्रत्येक चरणाचरणाला कशा उंचावत-हेलावत आहेत, हें येथें पहाण्यासारखें आहे. रुक्मीनें आपलें लग्न शिशुपालाशीं लावण्याचें ठरविलें, म्हणून रुक्मिणीनें आपल्या प्रिय श्रीकृष्णाला निमंत्रण केलें. पण तो आला नाहीं, तेव्हां विरहानें व्याकुल होऊन, हातीं अश्रूंची माळ घेऊन ती टाहो फोडीत आहे. तिच्या हृदयाची आर्तता, प्रेमाची एकनिष्ठता आणि मनाचा निर्धार हे सारे गुण या साध्या शब्दांच्या माळेंत कवीनें किती कौशल्यानें गुंफले आहेत ! साधी भाषा, तीव्र भावना व उदात्त प्रेम यांचा मनोहर संगम आहे हा !

शृंगार व वात्सल्य यांचा संगम ‘ घुगुरवाळा ’मध्यें दिसतो. सातआठ महिन्यांच्या मुलाच्या पायांतील वाळा खुळखुळ वाजला कीं, ‘ अल्लड मातेला ’ पोटांत मावेनासा आनंद कसा होतो, याचें नादमधुर शब्दांनीं कवीनें वर्णन केलें आहे. ते शब्द व ती चाल इतकी अनुरूप आहे कीं, कविता वाचतांना वाळाच वाजत आहे असें वाटते ! ती म्हणते, “ हृदयीं खळबळलें । दरवळलें । विना ऐकिल्या कळलें । गाणें मंजुळ तें । झुळझुळतें । तुझिया वाळ्याभंवतें । वाळा हालूं दे । बोलूं दे । आनंदें डोलूं दे । एकच हा चाळा । वेल्हाळा । घेरे तान्ह्या बाळा । एकच पायाचा । वाळ्याचा नाच गोड बाळाचा । ऐकुनि आनंदें । त्या छंदें । घर सगळें नाचूं दे । ‘ गोविंदाग्रज ’ ही । कवनांहीं । त्या छंदावर गाई !

## प्रेमाचें तत्त्वज्ञान

‘ शृंगाररसाचे शाहीर ’ अशी पदवी मिळण्याइतकें प्रेमरसानें थबथबलेलें विपुल व मधुर काव्य गोविंदाग्रजांनीं रचलें आहे. “ मी प्रेमाचा बंदा माझा हाच असे धंदा ! ” अशी आपली भूमिका त्यांनींच ‘प्रेमपाठ’ या कवितेमध्यें मांडली आहे. हा ‘ प्रेमाचा भाट ’ निरानिराळ्या रूपांनीं प्रेमाचा महिमा गात आहे. एकच चीज निरानिराळ्या रागांत गवयानें गाऊन दाखवावी तशी करामत गोविंदाग्रज करून दाखवितात. कवि व

प्रीति यांचा अन्योन्यसंबंध स्पष्ट करण्यासाठीं गोविंदाग्रजांनीं 'हृदयशारदेस' या कवितेमध्यें असें रूपक बसविलें आहे कीं, " प्रीतिदेवीच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा ! प्रीतिदेवता जरा हालतां कवि करि गानाला ! "

' प्रेम आणि मरण ' या कवितेंत आपलें प्रेमाचें तत्त्वज्ञान त्यांनीं एका कथेच्या द्वारें निवेदिलें आहे–आणि ती कथा आहे एका वृक्षाची–देवा-मानवाची नव्हे ! एक मोकळें मैदान. त्यांत एकच थोर वृक्ष. एकदां आकाशांत वीज लखलखली. तिच्यावर त्याची प्रीति जडली. ती ' गगनांतिल चंचल बाला ' त्याला हवीशी वाटूं लागली. तिच्या प्राप्ती-साठीं त्यानें ' हठयोग ' आरंभिला. ' टोकाविण चालू मरणें । हृदयाला फसवुनि हसणें । जीवाला न कळत जगणें । ' अशी प्रेम–विव्हलता त्याचे जीवनांत उत्पन्न झाली. शेवटीं त्याची तपश्चर्या फळाला आली. देवता म्हणाली " वर माग. तुला स्वर्गींचा कल्पवृक्ष करूं कां ? प्रळयकाळचा वटवृक्ष करूं कां ? " पण त्याचें मागणें एकच–" देवि ! एकदां मला ती वीज भेटव." देवांनीं त्याला पुष्कळ समजावून सांगितलें कीं, " तिच्या स्पर्शानेंच तुला मरण येईल," पण त्याचा निर्धार एक–" क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षाव पडो मरणांचा । " शेवटीं देवांनीं ती ' गगनांतिल चंचल बाला ' त्याच्या भेटीस पाठविली. तिचा स्पर्श होतांच तो वृक्ष दुभंगून खालीं पडला, ' परि पडतां पडतां हंसला.' कारण त्याची प्रीति सफल झाली. त्याचीं सारीं पानें फडफडलीं, साऱ्या कळ्या फुलल्या–' खुलल्या त्या कायम खुलल्या ! ' अशा त्या एकनिष्ठ प्रेमाचा गौरव करण्यासाठीं ' बोलांची रानपालवी ' कवीनें वाहिली आहे. ' निष्प्रेम चिरंजीवन ते । जागिं दगडालाहि मिळतें । " हें तत्त्व कवीनें वृक्षाच्या रूपकानें निवेदिलें आहे.

## प्रेमगीतांचा सुवर्णकळस

गोविंदाग्रजांनीं आपल्या सर्व प्रेमकाव्यांचा कळसच ' प्रेमपाठ ' या कवितेच्या रूपानें उभारला आहे. सुमारें दोनशें ओळींचें हें काव्य म्हणजे प्रभावी भाषाशैली, उत्तुंग कल्पनाशक्ति आणि रम्य निसर्गप्रेम यांचा

त्रिवेणी संगम होय. एकाहून एक सरस अशा कल्पनांचा कवीनें नुसता पाऊस पाडला आहे. कवीच्या हृदयाचा वसंत खुललेला आहे आणि चित्ताचा कोकीळ पंचप्राणाचा पंचम स्वर लावीत आहे. तेव्हां त्याला आकाशाच्या लग्नमंडपामध्यें कोणतें मंगल दृश्य दिसतें पहा–"आकाशाच्या लग्नमंडपीं लता करवल्या वा । वृक्षबालकां लाजुनि पल्लव सांवरितां दमल्या । कळ्या कोंवळ्या, हलतीं कानीं झूल मजेदार । उषा–वधूवरि सुमाक्षतांही करिती भडिमार ॥ " तुकारामांनीं आकाशाला नुसत्या मंडपाचीच उपमा दिली होती, पण गडकऱ्यांनीं लग्नमंडपाचे रूपक रचलें आहे आणि तें विस्तारानें व बहारीनें रंगविले आहे. उषा ही वधू आणि तिचें लग्न सूर्याशीं झालें. पण नवरदेव नाचरा निघाला. तेव्हां आतां पृथ्वीचें चंद्राशीं लग्न लावावयाचें. त्यासाठीं कवि सर्व निसर्गदेवतांना हाक मारीत आहे. " दिशेदिशेच्या दिक्पालांनो । सावधान सगळे । संध्यापट–पीतांबर काढा ताराबल जमलें । प्रेममंगलाष्टकें जगीं गाजवा हो । नक्षत्रांच्या करा अक्षता शुभ मंगल बोला । मेघांचा चौघडा गगनिंचा जगीं वाजवा हो । सप्तपदीची चाल चालवा सप्तभुवनिं सकलां । दुग्ध–चंद्रिका जिकडेतिकडे नवरदेव ओती । पुष्परेणु–शर्करा–कणांची पृथ्वी करि भरती । "

## निसर्ग जिवंत केला

त्याचप्रमाणें या मंगल समारंभासाठीं लतांना आणि फुलांना कवि निमंत्रण देत आहे. " वनांत लपलेल्या वेलींनो । या ग बाहेर । वृक्षांचे कर धरुनी घ्या मग प्रेमाचे घेर । गवताचा गालिचा कोंवळा, हळूहळू चाला, । पायघड्या पसरल्या फुलांचा सडा वरति घाला । वाऱ्यावरती वरात काढा जीवाभावांनीं, । वनदेवींच्या मुलिंनो ! या ग, या लौकर नटुनी । कुणी गुलाबी पातळ नेसा, शालु कुणी हिरवा, । कुणि मोत्याची जाळी लेउनि हव्या तशा मिरवा । " कवीला सर्वत्र प्रेमाचें मांगल्य ओसंडत असलेलें दिसतें. "जिकडे तिकडे शुभ लग्नें हीं सारखीच लावी." अशी तो प्रीतिदेवतेची प्रार्थना करतो. त्याला फुलाफुलांमध्यें नवनवीन गुण दिसतात आणि त्या गुणांचे द्योतक असें नांव प्रत्येकाला तो देतो. कमल

म. ग्रं. सं. पुणें, ...

म्हणजे काव्यपुष्प, जास्वदी म्हणजे उषा–पुष्प, तेरडा म्हणजे बाल-पुष्प, निशिगंध म्हणजे यौवन–पुष्प, कोरांटी म्हणजे जरठ–पुष्प अशी निंदा-व्यंजक नांवें प्रथम कवि ठेवतो, पण मग " मंगलकालीं मंगल वदनीं मंगलताच हवी" याची जाणीव होऊन तो गौरवदर्शक नांवें देतो. मोगरा हें हास्य–पुष्प तर गुलाब हें लज्जा–पुष्प; पारिजातक हें हृदय–पुष्प तर वकुल हें प्रेम–पुष्प असा ' बारशाचा थाट ' उडवून कवि म्हणतो— " फुलें तुम्ही घ्या, फुलें मला द्या, प्रेमाची ठेव, । कृष्ण घ्या कुणी, कृष्ण द्या कुणी, हीच देवघेव । "

## कल्पनेची भरारी

शेवटीं प्रीतीचें निसर्गाशीं लग्न लावण्यास कवि निघतो. त्या लग्नाचें वैभव काय सांगावें ! प्रीति ही कवीची कन्या. तेव्हां तिला विवाह-प्रसगीचे उंची उंची दागिने घालण्यास तो सहजच उत्सुक असतो. निसर्गांतील सारी सुंदरता, रम्यता व कोमलता यांचे अलंकार तो आपल्या कल्पकतेनें घडवित आहे. ते असे—

" शशिकिरणांचे तंतु भिजवुनी संध्या रंगांनीं, । अष्टपुत्रि द्या नव नवरीला कुणी तरी विणुनी. । इंद्रधनुष्यें वळवुनि हातीं वज्रचुडा भरवा । शुभ्र फुलांचें तेज आटवुनि घडवा कुणि त्यांची । वेढें विरोदी सौभाग्याचीं लेणीं पायांचीं । " चराचरांमध्यें एक प्रेमाचा धागा ओवलेला आहे आणि या प्रेमामुळेंच पशूचा मनुष्य होतो, मनुष्याचा देव बनतो, आणि देवाचा देवपणा टिकून राहतो, हें तत्त्वज्ञान त्रिभुवनांत दुमदुमविण्या-साठीं कवि आवेशानें म्हणतो, " जलदेवींनो । स्थलदेवींनो । गगन-देवतांनो । सकला शिकवा प्रेमपाठ; गा हाच अप्सरांनों ! । हृदयशारदे । हृदयिं राहुनि करिं मज प्रेमकवी । तुझ्या प्रीतिची स्फूर्तिच मज हा प्रेमपाठ शिकवी । पशूस कर शील मानव । मानव नेशिल देवपदा । देवपणा स्थिर देवांचाही राखिसी तूंच सदा । " या सर्व प्रेमपाठाची फलश्रुती काय ? तर " प्रेमतरंगें चित्त तरंगें, आत्माही रंगे । जगत् रंगलें, विश्व रंगलें एक प्रेमरंगें । "

## उदात्त प्रेमाचें वर्णन

प्रेमाचें अधिकाधिक उदात्त स्वरूप गोविंदाग्रज वाचकांपुढें ठेवीत आहेत. वैषयिक प्रेम हें सर्वसामान्य लोकांच्या स्थूल दृष्टीला कळणारें. त्याचें वर्णन करणारीं थोडीफार कवनें त्यांनीं रचलीं, पण त्यापेक्षां दोन हृदयांचें परस्परांमधील आकर्षण रंगविणारीं निर्हेतुक गीतेंहि त्यांनीं पुष्कळ रचिलीं. त्यांच्यावरची पायरी निसर्ग–प्रेमाची. प्रेमाचा चष्मा डोळ्यांवर लावला म्हणजे सर्वत्र मंगलच कसें दिसूं लागतें याचें चित्रण त्यांनीं कांहीं कवितामध्यें केलें आहे. आणि याहूनहि उदात्त असा प्रेमाचा प्रकार आहे. तो आकलन करण्यास मात्र कठिण आहे. एखाद्या डोंगरावर आपण जसजसें वर चढत जातों तसतशी अधिकाधिक शुद्ध हवा आपणांस मिळत जाते, पण त्यासाठीं चढण्याचे श्रम घ्यावे लागतात. ‘ प्रेमाचा प्रलयकाळ ’ या कवितेंत सर्वांत उच्च व उदात्त प्रेमाचें कवीनें गुणगान केलें आहे. बुद्ध, तुकाराम, ख्रिस्त, नानक यांच्या मनांचें गाणें या काव्यांत प्रगट झालेलें आहे. गडकरी आज असते तर त्यांनीं गांधीजींचेंहि नांव यांत गुंफलें असतें. या सर्व महात्म्यांनीं विश्वामध्यें प्रेमाचा प्रलयकाळ निर्माण केला आहे. आणि त्यामुळें “ खडक बुडाले गर्वाचे । विरले डोंगर रागाचे । खंदक जिरले द्वेषाचे । कडे मोडले त्वेषाचे । जीव कोंडला आशेचा । श्वासाचि बंद निराशेचा । प्रेम–जलाचा । हृदयरसाचा । सागर करि तांडव–नाच । प्रलयकाळ तो बा हाच । ”

अशा बंधुप्रेमाचें, मानवप्रेमाचें, विश्वप्रेमाचें पाणी पूर येऊन चोहोंकडे पसरूं दे, अशी इच्छा प्रगट करतांना गोविंदाग्रज म्हणतात, “ प्रेमसागरा, तव लहरीं । उडवी अजुनी वरी वरी । अफाट लाटा नाचीव । ब्रह्मनाद तो ऐकीव । लाटांचे देउनि झोके । काळाचीं मिळवी टोंकें । या बाजूला । त्या बाजूला । कुठेंहि मग मी पडे जरी । सर्व सारखे मला तरी. ”

## महाराष्ट्रांतील निसर्ग

उदात्त व विशाल कल्पना गोविंदाग्रजांच्या काव्यांत ओतप्रोत भरून राहिल्या आहेत. प्रसादपूर्ण भाषेंतुन त्या ऐकत असतांना रसिकांच्या

डोळ्यापुढें त्यावेळीं त्या नद्या, तो पूर, ते डोंगर वगैरे तीं तीं दृश्यें मूर्तिमंत उभीं राहतात. निसर्ग–चित्रें रंगविण्यांत ते मोठें कसब दाखवितात. श्रावण महिन्यांतील पावसाच्या सरीप्रमाणें त्यांच्या शब्दांच्या पंक्ती सर सर येऊन जातात आणि त्यांतून शुभ्र व शीतल अशा गारांप्रमाणें भासणाऱ्या कल्पनांचाहि सडा पडतो. "कृष्णाकाठीं कुंडल" या काव्यांत भाषेचा हा धावता ओघ जितका अस्खलित व डौलदार आहे, तितकींच त्यांतील कल्पना–चित्रें सुस्पष्ट व रेखीव आहेत. खरें पाहिलें तर, आतां कृष्णा-नदीच्या कांठांवर कुंडल गांव कांहीं नाहीं, पण शिवाजीच्या काळीं तें तेथें होतें अशी कल्पना कवीनें केली आहे आणि आपल्या कल्पनेला मोकाट सोडलें आहे. एक 'प्रेमकहाणी' सांगणें हा ह्या कवनाचा मुख्य उद्देश. पण तें कवन अपूर्णच राहिलें आहे. त्या अपूर्ण कवनांतहि महा-राष्ट्राचा निसर्ग आणि शिवरायाचा गौरव यांचें वर्णन जें येऊन गेलें आहे, तें अगदीं हृदय हलविणारें आहे.

'राजसंन्यास' मधील रायाजी–शिवांगी यांच्या प्राणांतिक प्रेमाचे व स्वामिभक्तीचे पडसाद या काव्यांतहि ऐकूं येतात. सह्याद्रीचें स्वरूप कवीनें किती ओघवती भाषेनें व प्रसन्न कल्पकतेनें रेखाटलें आहे, पहा. "सह्याद्रीच्या कडेकपारीं, कोठें मोठे घाट। दरीपठारीं धुंडित जाणें, भारी अवघड वाट" महाराष्ट्रांतील नद्यांचें वर्णनहि वाचकाच्या डोळ्यापुढें उभें राहील अशा कौशल्यानें गडकऱ्यांनीं केलें आहे. या 'लोक–मातांचा' गौरव आचार्य कालेलकरांनीं गद्यांत व राजकवि यशवंतांनीं पद्यांत केलेलाच आहे, पण गडकऱ्यांच्या शब्दांचीं जादू व कल्पनेची किमया कांहीं औरच! एकेका शब्दामध्यें त्या त्या नदीचा सारा इतिहास ते उभा करूं शकतात. त्याचा नमुना–"मार्गीं दिसल्या सह्यगिरीच्या चिमण्या चिमण्या बाळा। वाजवितांना फिरतां पायीं घुंगुरवाळा। भीमानामें इथें नांदते श्रीमती चंद्रभागा। पुंडलिकाची मायमावली श्रीमहाराष्ट्र–गंगा। साधीसुरती बाळजिवाची डामडौलही नाहीं। बघून घ्या ही रसिका इकडे नाचे नीराबाई।"

## महाराष्ट्राचें गौरव–गीत

'श्रीमहाराष्ट्रगीत' अपूर्ण आहे, पण एखाद्या मोठ्या मूर्तीचा उंच व

सुबक चौथरा पाहिला म्हणजे त्यावर केवढी मूर्ति बसाविली जाणार होती याची कल्पना येते, त्याप्रमाणें या पहिल्या दहा कडव्यावरूनहि कवीच्या मनानें या गीताचें स्वरूप केवढें भव्य बांधलें असेल हें सहज कळून येतें. महाराष्ट्रांत शौर्य आहे, तसेंच प्रेमहि आहे; पराक्रम आहे तसाच परमार्थहि आहे, वैभव आहे तसेच वैराग्यहि आहे. हा देश राकट आहे आणि नाजूक आहे, कणखर आहे आणि कोमलहि आहे, तो दगडांचा आहे आणि फुलांचाहि आहे—विविधतेनें तो नटलेला आहे. त्या विविधतेचें रमणीय वर्णन करतांना आरंभींच कवि भक्तिभावानें म्हणतो,

" मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
प्रणाम घ्यावा, माझा हा श्री-महाराष्ट्र देशा ॥ "

महाराष्ट्रांतील शेतकरी साधा भोळा व दीनदरिद्री असा असला तरी त्याच्या शौर्याचा दरारा दूरवर पसरलेला आहे. हें अभिमानानें कवि सांगतो, " तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा । वहाण पायीं अंगीं कांबळी उशाखालिं धोंडा । विळा कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात । इकडे कर्णाटक हांसतसे, तिकडे गुजरात । आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल । तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल ॥ "

## प्रीति—भक्तीचा संगम

' मुरली ' हें गोविंदाग्रजांचें अत्यंत प्रेममधुर काव्य आहे. श्रीकृष्णाचें चारित्रच मधुर !-त्याचे ते गोप-त्यांच्या त्या बालक्रीडा-ती यमुना-ते कदंब आणि ती श्रीकृष्णाची मुरली-या सर्वांची मोहिनी हजारों वर्षें सर्व भारतीयांच्या मनावर विलक्षण पडलेली आहे. हिंदु-मुसलमान सर्व गवयांच्या बहुसंख्य गीतांचा विषय कृष्णलीला हाच असतो. शेंकडो संस्कृत व मराठी कवींनीं श्रीकृष्णावर व त्याच्या मुरलीवर आपापल्या काव्यांचीं फुलें वाहिलीं आहेत. गोविंदाग्रजांचें मन अतिशय महत्त्वाकांक्षी ! इतरांहून आपण कांहीं आगळें करून दाखवावें आणि इतरांना चकित करून सोडावें अशी ईर्षा त्यांच्या प्रतिभेमध्यें मुसमुसत होती. त्यांना श्रीकृष्णाच्या मुरली-रवामध्यें प्रीति, भक्ति आणि मुक्ति यांचा संगम दिसला

अनुक्रम २९

श्रीकृष्णाच्या मुरलीचा मधुर ध्वनि श्रवण करण्यासाठीं राधेला जी अनिवार ओढ लागलेली होती; तिच्यावर त्यांनीं असें रूपक बसवलें आहे कीं, तळमळणाऱ्या जीवात्म्याला ईश्वरी साक्षात्काराचीं भूक लागलेली आहे. ' ही एक आस मनिं उरली । कन्हय्या ! बजाव बजाव मुरली ! ' अशी विनवणी राधा करीत आहे. त्याचा अर्थ तुकारामासारखा एखादा मुमुक्षु मानव ईश्वराच्या भेटीची वाट पहात आहे. या तळमळीची तीव्रता निरनिराळ्या शब्दांनीं गोविंदाग्रजांनीं व्यक्त केली आहे. राधा–कृष्णाचे हे भक्ति–भावनेचे खेळ उत्तर हिंदुस्थानांतील मथुरा–वृन्दावनाकडे खेळले गेले असल्याकारणानें त्यामध्यें 'छेल–छबेला,' 'अलबेला' यांसारखे हिंदी शब्द आणि " अब नंदलाल कर खैर ", " अब खेल करो बनमाली " अशीं वाक्यें मधूनमधून गुंफलेलीं आहेत. राधेचीं पहिली अवस्था वर्णन करतांना कवि म्हणतो—" जन्माचें झालें चीज । कायमची मेली नीज । विश्वाचें गवसे बीज, चिद्वृत्ति त्यांत अवतरली । " परमेश्वराची ओळख पटली त्यामुळें सुकलेलीं विश्वें भिजलीं आणि " पुष्पाविण येइ वास ! वाऱ्याविण चाले श्वास । हर्षाविण आतां हास । मरणाविण सुटका झाली" अशी राधेची अवस्था झाली.

## कल्पनांची चमत्कृति

चमत्कृति हा काव्यांतील सौंदर्याचा प्राण आहे. शब्दांची, कल्पनांची, वर्णनांची योजना गोविंदाग्रज अशा कांहीं कौशल्यानें करतात कीं, त्यामुळें त्यांच्या काव्यांत चमत्कृति व वाचकांच्या चित्तांत विस्मय निर्माण झाल्याशिवाय रहात नाहीं. 'गोड निराशा'मध्यें एका 'जादूच्या बागे'चें वर्णन ते करतात. ही बाग म्हणजे एक बाला. ती कशी होती ? तर " नाहीं पाणी जरि भवतीं । तरी दोन कमळें हसतीं; । जन्म जलामधिं कमळांचा । न्याय असें हा जगताचा । परि या कमळांच्या रंगा । खेळे प्रेमाची गंगा । तुमच्या जगतीं । किरणें पडतीं । कमळें फुलतीं, । परि माझीं कमळेंच बघा । निजकिरणीं खुलवितीं जगा ॥ " नेहमींच्या बागेंत पाण्यामध्यें कमळें असतात ना ? पण बालेच्या कमळांत—म्हणजे डोळ्यांत

पाणी खेळत आहे. सत्यसृष्टींत सूर्याचीं किरणें पडलीं म्हणजे कमळें फुलतात ना ? पण काव्य-सृष्टींत बालेच्या डोळ्याचे किरणच जगाला खुलवितात. तिचे गाल म्हणजे पुरे फुललेले गुलाब ! पण कांटे नसलेले. विशेष हें कीं, 'गुलाब तर न मिळे मजला । परि कांटे मम देहाला ।" हे गालीचे गुलाब कसे चंचल आहेत, हें उडत्या शब्दांनीं व धांवत्या चालीनें कवीनें वर्णिले आहे, तें असें:—" क्षणांत फुलतीं, । क्षणांत लपती । दिसती हंसती, । घेर घेतला गिर्कीचा । थेर थरकत्या फिर्कीचा !"

'विचार' या कवितेंत विरोधाभासाची गंमत कवीनें पुढीलप्रमाणें केली आहे—" करिसी एकांती गर्दी, । एकांतहि जनसंमर्दी । जागा असतां कुणि त्यासी, । पुढचीं स्वप्नें दाखविसी । निजतां कोणी त्याकरवीं, करविसी तूं कामें बरवीं ।"

## मोहक वर्णन-शैली

अशाच चमत्कृतिपूर्ण वर्णनशैलीनें ' चिमुकली कविता'हि नटलेली आहे. एक ' दशवर्षा बाला ' हर्ष उधळीत चालली असतां ' भूदेवी—स्वर्देवी यांतिल हाच काय सांधा ' अशी भ्रांति कवीला पडते. तो तिचे ओठ, केस, अंगकांति या सर्वांवर मनोहर उत्प्रेक्षांची रास उधळतो. तिच्या भुंवया पाहून कवीला वाटतें, " किंचित खुलत्या भिंवया चिमणी धनुष्येंच साचीं । चित्रपटांतील काय चिमुकल्या रामलक्ष्मणाचीं ! नखा-एवढ्या दोन हिरकण्या हंसती त्याखालीं, । तेजोरूपा श्रीकमला जणुं निज-कमलीं रमली !" तसेंच तिच्या अंगाच्या गौर—गुलाबी रंगाची कल्पना देण्यासाठीं कवि उत्प्रेक्षा लढवितो, " उषा—चंद्रिका जणूं भेटल्या त्या संगमकालीं । तांबुस धवलहि रस पाझरतां काय त्यांत न्हाली " अशी ही चिमुकली, सौंदर्यसंपन्न व उल्हासपूर्ण बालिका म्हणजे कवीच्या हृदयांतील कल्पनाच आहे असा आरोप गोविंदाग्रज करतात. या काव्यांतील निर्मल भावाचें वर्णन करावें कीं उज्ज्वल कल्पकतेचें स्तवन करावें कीं कोमल शब्द-पंक्तीच्या ओघाचे गुण गावेत ? हें सांगणें खरोखर कठीण आहे. अशाच गुणसंपदेनें भूषविलेली दुसरी कविता " लीला " ही आहे.

एक पांच वर्षांचीमुलगी-तीहि अनाथबालकाश्रमांतील. पण तिचें वर्णन करतांना गोविंदाग्रज म्हणतात, " पांच वर्षांची छबकडी सुरेख । जणूं चिमणीशी हिरकणीच देख । कशी चित्रासारखी उभी राही । नांव ठेवाया सोय मुळीं नाहीं ॥ " हिरकणीची उपमा देऊन कवीचें समाधान होत नाहीं. किती केलें तरी, हिरकणी या जमिनीवरचीच. म्हणून आकाशींच्या चांदणीची उपमा कवि देतो व म्हणतो, " कुण्या ऋषिचे यानास अडखळून । पडे निखळूनि जणुं नील पटांतून । आलि खालीं ही चांदणीच एक । तरिच इतकी ही चमकते सुरेख ॥ "

तो मोराचा पिसारा! आणि त्याचे ते चमचम करणारे निळे डोळे! त्यावर एकाहून एक सरस अशा तीन उपमा गोविंदाग्रज चढवितात, त्या अशा— " बुट्टे काळ्या शालूवरती । तारे निळ्या नभीं लकलकती । कृष्णजलावरि कमलें रमतीं । तसा डोळा हा ॥ मोरपिसावरती पाहा ॥ "

वयाच्या अकराव्या वर्षीं गोविंदाग्रजांनीं जी पहिली आर्या रचली, तींतहि वर्णनाचा बारकावा आढळतो. ती आर्या अशी, " चष्मा लावुनि डोळां, डोकिस पागोटि तांबडी घाली ! काठी टेंकित टेंकित येउनि बैसे पथारिच्या खालीं ॥ १ ॥ "

## शब्द-सृष्टीचे ईश्वर

सुंदर पद—लालित्य हा तर गोविंदाग्रजांच्या काव्य—सृष्टीचा सुवर्ण—कळसच होय. दुरून प्रारंभीं दिसणारें हें शब्द-सौंदर्य त्यांच्या काव्याकाव्यांतून नुसतें ओसंडत आहे. त्याचें एकच उदाहरण द्यावयाचें तर, 'वेशभूषा'कारास सादरार्पित पद्यभूषा'मधील पुढील पंक्ति पहा—"मंजुळ गुंजारवें रंजवी कुंज कुंजगत भृंग, । घालिसि कुंज—मुखावरि रुंजी मृदुपदिं होउनि दंग । रचिसी नादभूषा । अथवा कुसुम—चापाशा "

शब्दांची लीला व अलंकाराची चमत्कृति ही गोविंदाग्रजांच्या काव्य—सृष्टीचीं बाह्य लक्षणें इतकीं लखलखीत आहेत कीं, त्यानेंच बरेचसे तरुण वाचक दिपून जातात. राजवाड्याच्या बाहेरील विजेची रोषणाईच टकमका पहात उभे राहणाऱ्या खेडवळासारखी त्यांची स्थिति होते. आंतील भावनेचें

जडजवाहीर पहाण्यास ते मोकळेच नसतात. अशा रसिक-मनांचें वर्णन कवि 'दिव्य प्रेमाच्या जाती'मध्यें करतो, " प्राण चंद्र हा कुमुदांना । काय जाणतो तो त्यांना । फुलें हंसति पाहुनि रविला । कळे न परि त्यांचे त्याला । चंद्रकांतमणि पाझरती चंद्र फिरे वरच्यावरती । कवि कोठें तरि तत्कविता परि । फिरे दिगंतरिं । रसिकमनें मग कविवरतीं । करिती ती दिव्यप्रीति । "

## अनुप्रासांच्या लाटा

'पानपतचा फटका' म्हणजे तर केवळ फटाकड्यांची माळच आहे. ओळींओळींतून शब्दांचे स्फोट होत आहेत. " बोले नाना युक्ती नाना करुनी यवन ठार करा " अशा अनुप्रासांच्या लाटा ओळीओळींमध्यें उसळत आहेत. "अध्यक्ष नेमिले दक्ष भाऊ अरि भक्ष्य कराया तक्षकधे ॥" अशा वर्णनांत वीर वा करुण अशा रसांकडे वाचकांचें चित्त जाण्याऐवजीं तें त्या त्या शब्दावरच खिळून राहतें. पानिपतचें युद्ध हरण्याला शेवटचें कारण दुही हेंच झालें, हें कवीनें पुढील अलंकारिक भाषेनें निवेदिलें आहे. " सरदारांच्या बुद्धिमंदिरा आग लागली कलहाची " प्राण जाण्याची वेळ आली व यशःश्री बुडायची पाळी आली, तेव्हां तरी ही दुही टाळा, अशी काकुळत करणारा निरोप भाऊसाहेब पेशव्यांनीं होळकरांकडे धाडला; त्यांत ते म्हणतात, " देशकार्य हें व्यक्तीचें नच; सक्ति नको; भक्तीच हवी । आसक्ती सर्वांची असतां मिळवूं आतां कीर्ति नवी । राग नका धरूं, आग लागते यशा; भाग हा सर्वांचा । शब्द मुलाचा धरितां कैचा ? हाच मान का काकाचा ? । "

आठ चौकांचा हा पानपतचा पोवाडा वेगवती भाषा व अचाट कल्पना यांनीं नटलेला आहे. रण-संग्रामावर कोठें लग्नाचें, कोठें गोंधळाचें तर कोठें राष्ट्रसभेचें रूपक कवीनें बसविलें आहे. पण मुख्य भर लाटानुप्रास करून वाचकांना चकित करण्यावरच दिसतो. त्यापायीं अर्थ-हानि किंवा रसभंग झाला, तरी कवीस त्याची पर्वा नाहीं. पानिपतच्या पराभवामुळें मराठ्यांच्या राज्याचा ओघच फिरला, हें सांगतांना कवीनें

पुढील उपमा दिली आहे. " जसा नदाचा ओघ फिरावा पार्त्री पडतां गिरिशिखरें । पानपताच्या पर्वतपातें इतिहासाचा ओघ फिरे । " हें सर्व प्रदीर्घ काव्य आपण कां रचलें हेंहि कवीनें अखेरीस सांगितलें आहे. " पुरें पुरें हें राष्ट्रविघातक परस्परांतील वैर अहो । पानपताची कथा ऐकुनी बोध एवढा तरि घ्याहो ॥ " आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचें–भाऊसाहेब, विश्वासराव प्रभृतींच्या शौर्याचें वर्णन करतांना कवीचें हृदय अभिमानानें भरून येतें व तो प्रांजलपणें धन्योद्गार काढतो, " धन्य कवीचें भाग्य असे या, म्हणूनि मिळें हें गायाला ॥ "

## विनोदी कविता

शृंगार व करुण याप्रमाणेंच हास्यरसहि खुलविण्याबद्दल गोविंदाग्रज प्रसिद्ध आहेत. विनोदकार म्हणून त्यांना मराठी साहित्यांत मानाचें स्थान आहे. नाटकाइतकें काव्यांत त्यांच्या विनोदाला मोकळें रान मिळालें नाहीं हें खरें, तथापि त्यांनीं कांहीं कांहीं कविता खास विनोदासाठींच रचलेल्या आहेत. ' विहिणींचा कलकलाट 'यांत ते लिहितात, " रण-वाद्यांचा दणदणाट । हत्यारांचा खणखणाट । विजयघंटांचा घणघणाट । एका जागीं मिळविले ॥ प्रळयमेघांचा गडगडाट । आणि विजांचा कडकडाट । भूमिभंगाचा तडतडाट । भरतीस हे घातले ॥ नाना वाजंत्री हीं सारीं । एक केलीं यत्नें तरी । त्या कलकलाटाची नये सरी । लग्नांत विहिणी करितात जो ॥ " स्त्रियांच्या बोलभांडपणाचें हें वर्णन त्यांतील अतिशयोक्तीमुळें कोणाला हासविणार नाहीं ? प्रिं. वामनराव जोशी यांनींहि अशाच बाबतींत अशीच मजेशीर अतिशयोक्ति केल्याचें सुप्रसिद्ध आहे. एकदां ते आपल्या कॉलेजांतील मुलींना गिरसप्पाचा धबधबा पाहण्यास घेऊन गेले होते. त्या धबधब्याचें रौद्र स्वरूप पाहून आणि घनगंभीर घोष ऐकून मुलींना आनंद झाला व तो त्यांच्या बडबडींतून व्यक्त होऊं लागला. त्यांतील एक मुलगी वामनरावांना म्हणाली, " तात्या, या धबधब्याचा आवाज म्हणे दहा मैलांवर ऐकूं जातो ! " त्यावर वामन-रावांनीं मिस्किल स्मित करीत शांतपणें उत्तर दिलें, " तें सारें खरें, पण

तुम्ही गप्प बसला तरच ! " गोविंदाग्रजांनीं ' काय करावें ? ' या कवितेंत "तोंडाळ बायको कडकडून येतां, काय करावें ?" असा प्रश्न करून बायकांवर अशीच खमंग टीका केली आहे. नदीला पूर आला असतां धरण बांधतां येतें, तोफ धडाडली तरी तिचा नेम चुकवितां येतो, वीज घरावर पडत असली तर उंच तार बांधतां येते, सावकाराची जप्ती आली असतां बाकी देऊन ती उठवितां येते, म्हैस अंगावर धावून आली असतां छत्री उघडून तिला पळवितां येतें, भिकार कवि आपलें काव्य घेऊन आला असतां तें वरवर वाचून त्याचा त्रास चुकवितां येतो, असे सर्वांवर उपाय आहेत, पण बायकोच्या तोंडाळपणावर तोडगा नाहीं. असें खुमासदार वर्णन गोविंदाग्रजांनीं या कवितेंत केलें आहे. ' रांगोळी घातलेली पाहून ' या कवितेंत स्त्रियांच्या आगंतुक वृत्तीवर अशीच टीका केली आहे.

## उपहासाची धार

काव्य–गायनाचा, कवींच्या परस्पर–प्रशंसेचा व प्रसिद्धि–लोलुपतेचा उपहास ' हुकुमेहुकूम ' या कवितेंत करून गोविंदाग्रजांनीं हास्य निर्माण केलें आहे. रानांत एक पक्षी दृष्टीस पडला, तेव्हां त्या ' वृक्षावरच्या मित्रास ' त्यांनीं ' गाणें गाच ' असा आग्रह केला आणि त्याला अशी लालुच दाखविली कीं, " स्तुति गाण्याची तुझ्या बहुपरि करिन चार-चौघांत । चित्रहि आणिन तुझें कशाच्या तरी खास अंकांत । गाण्याची या तुझ्या शिफारस करूं अशी भरपूर । कीं शाळाखातेंही वेड्या करील तें मंजूर "

जगांत कांहीं माणसें निष्कारण चिंता करीत असतात, कुढत असतात, दुःखी असतात–अशा निराशेला त्यांना कांहीं कारणहि लागत नाहीं. ' सूरत वो वैसी ' स्वभावच त्यांचा तसा. हें सत्य गोविंदाग्रजांनीं 'चिंतातुर जंतु' या छोट्या कवितेंत मोठ्या मौजेनें मांडलें आहे. असा एक निराशावादी माणूस काय म्हणतो हें आरंभीं सांगून त्याला कवि उत्तर देत आहे—" निजलें जग कां आतां इतक्या तारा खिळल्या गगनाला । काय म्हणावें त्या देवाला—" " वर जाउनि म्हण जा त्याला ॥ "

तसेंच "तेज रवीचें फुकट सांडतें उजाड माळावर उघड्या । उधळणूक ती ग्रधवत नाहीं ' " डोळे फोडुनि घेच गड्या ॥ "

आकाशांतील तारांचें व सूर्याचें तेज जसें फुकट जातें, तसेंच पृथ्वीवरील झाडांचीं पानें व नदीचें पाणीहि. तें पाहून तो ' जंतु ' विचारतो, " हिरवीं पानें उगाच केलीं झाडांवर इतकीं कांहीं । मातींत त्यांचें काय होतसे ? " " मातिस मिळुनी जा पाहीं । " " पुराबरोबर फुकटावारी पाणी हें वाहुनि जात । काय करावें जीव तळमळे " " उडी टाक त्या पूरांत " ॥

## तत्त्वज्ञानाचें गूढगुंजन

गोविंदाग्रजांची कल्पकता जसा सौंदर्याचा साज धारण करते, तसाच भव्यतेचा वेशहि परिधान करते. एकादी बालिका किंवा कलिका यांचें वर्णन ते जितक्या चातुर्यानें करूं शकतात, तितकेंच अखिल विश्वाचा पसारा आपल्या बुद्धींत सांठवून त्याचें रहस्य काव्यमय भाषेनें उकलून दाखविण्याचीहि शक्ति त्यांच्या लेखणींत आहे. केशवसुतांच्या ' झपूर्झा ', ' हरपलें श्रेय ' या कवितांप्रमाणेंच गोविंदाग्रजांनींहि कांहीं गूढगुंजनात्मक कविता लिहून अज्ञेयाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला आहे. ' फुटकी तपेली ' ही कविता अशा कल्पकतेनें व तत्त्व-चिंतनानें भरलेली आहे. " अनंततेची तहान " मानवी आत्म्याला लागलेली आहे. त्याचा प्रवास अखंड व दूरवरचा आहे. " विश्व मला जें दिसतें त्यांतिल, । विश्वें तुमचीं अणुसम होतिल, निजेक्षणीं तें तुमच्या जिरविल । काळांचा बाजारच सगळा । प्रवास माझा असा भयंकर ॥ " या दृश्य विश्वांच्या अनंत पटींनीं मोठीं अशीं विश्वें कवि पहात आहे. हें विश्व म्हणजे एक तपेली आहे, असें सांगतांना कवि म्हणतो, " ब्रह्मांडांची खरी तपेली । करा रिकामी तरिहीं भरली । भरुनी भरणें भरवुनि उरली । जिरतिल विश्वें कितीक असलीं । कांठवरी जरि आधीं भरली ! " उपनिषदांतील 'पूर्णात् पूर्णमिदं ब्रह्म ' इत्यादि वचनांचें हें मराठी काव्यरूप किती सुगम आहे ! अशाचि उन्मनी अवस्था ' कलगीचें गाणें ' या कवितेंत गोविंदाग्रजांनीं

रंगविली आहे. 'घुबडाच्या घूघूं' मधूनहि त्यांना 'शंभूचा डमरू' ऐकूं येतो.

## उपमांची उधळपट्टी

गोविंदाग्रजांची कल्पनाशक्ति उद्दाम आहे, अनावर आहे, अकुंठित आहे. निसर्गाशीं तन्मय झालेले 'बालकवि' "अरुण" नांवाचें हृदयंगम गीत रचतात, हें पाहून गोविंदाग्रजांच्या काव्यमय मनामध्यें हर्षाच्या लाटा तर उसळल्याच, पण त्याबरोबर महत्वाकांक्षेचीहि ऊर्मि उचंबळली. "आपणहि असें काव्य कां न करावें ? किंबहुना याहूनहि सरस कवन निर्माण करून आपण रसिकांना चकित करून टाकूं." अशी ईर्षा गोविंदाग्रजांच्या चित्तांत पेटली आणि त्यांनीं एक सोडून दोन काव्यें अरुणावर लिहिलीं. त्यांतील पहिला 'अरुण' म्हणजे मनोहर उपमांची उधळपट्टीच आहे. दुसऱ्या अरुणांत त्यांच्या मनांतील निराशेचा करुण सूर ऐकूं येत आहे. पहिल्याचें पदलालित्य व प्रसादपूर्ण रचना हीं इतकी रमणीय आहेत कीं, ती पाहतांच त्यांच्या 'प्रेमपाठा' सारख्या काव्य-रत्नांचीच स्मृति व्हावी. पहिल्या 'अरुणा' च्या पहिल्या चार ओळींहि किती ऐटदार आहेत पहा—"अहा ! उगवला पहा अरुण हा उधळित तेजाला । जगा जागवी तसा जागवी कविच्या चित्ताला । जसा उडवि हा अरुण चहुकडे गगनीं रंगाला । तसा पहा कवि उडवी अपुल्या चित्त-तरंगाला" ॥

साक्षात् अरुणोदयाचें दर्शन गोविंदाग्रजांनीं कधीं घेतलें होतें कीं नाहीं याची साक्ष दोन्ही अरुणावरून पटत नाहीं; पण तें त्या निसर्गदृश्यांशीं समरस झाल्याची, त्यांत रंगून गेल्याची, बुडून गेल्याची खूणहि या काव्यांत कोठेंच आढळत नाहीं. आकाशांतील तें नित्य-नूतन, रक्त-रम्य-दृश्य पाहून, त्याच्याशीं एकतानता पावून, स्वतःचें भान हरपून, सौंदर्याची समाधि लागण्याइतकी तल्लीनता गोविंदाग्रजांची झाली असावी असें वाटत नाहीं. एखाद्या चित्रकारानें एखाद्या यंत्राच्या साहाय्यानें प्रभात-कालचे फोटो भराभर घ्यावेत; त्याप्रमाणें गोविंदाग्रजांनीं आपल्या कल्प-

कतेच्या साहाय्यानें अरुणोदयावेळचा लाल रंग निरनिराळ्या अलंकारांनीं तटस्थपणें वर्णन केलेला आहे. सूर्य हा आकाशींचें पुष्प असून त्यांतील मकरंदाचे रस चहुंकडे पसरले आहेत काय ? कां सूर्याच्या राजवाड्यास लाल कांच लावलेली आहे ? कीं भूमातेचा हा मळवट आहे ? अशा कल्पना करतां करतां कवीनें अशी मनोरम उत्प्रेक्षा केली आहे कीं, " कल्पलतांवर फुलें बहरतां सडा परागाचा । काय तरंगें स्वर्गंगाजलिं तांबूस रंगाचा । " अशा नानाविध कल्पनांचा पाऊस कवीनें पाडला आहे. ब्रह्मपदाच्या किल्ल्यावरील हा जरिपटका आहे ? कीं मानवाला मिळालेला हा चिरंतनाचा ताम्रपट आहे ? अशा कल्पनामागून कल्पना करतांना खुद्द कवीच म्हणतो " मना ! कल्पना पुरे ! " आणि शेवटीं तत्त्व सांगतो, सृष्टि म्हणजे " सौंदर्याची, मांगल्याची, प्रेमाची खाण ! " अरुण-रसानें आपल्या 'मनिंचीं चित्रें रंगवा' असा संदेश कवीनें शेवटीं दिला आहे.

## निराशेचें रडगाणें

प्रेमाचें व सृष्टिसौंदर्याचें गुणगान मुक्त कंठानें व अकुंठित कल्पनेनें गोविंदाग्रज करीत असले आणि त्यांतून नावीन्य, चमत्कृती, हर्ष ओसंडत असले तरी त्यांचें हृदय जखमी झालेलें होतें आणि त्यामुळें त्यांच्या काव्याच्या नसांतून निराशेचें रक्त वहात होतें. या निराशेची कारणमीमांसा या लेखाचे प्रारंभीं केलेली आहे. तिचीं तीव्र-सौम्य प्रतिबिंबें निरनिराळ्या कवितांमध्यें आढळतात. एका ' बालकवीस ' उद्देशून ते म्हणतात—" आम्ही गातों जें गाणें । तें जगताचें रडगाणें । हृदयीं जो भरला त्रास । तो कविताचरणीं प्रास । शब्दासाठीं हपापले । अर्थासाठीं जन टपले । हृदय करपले । रसहि हरपले । कवनाचि खपलें । गा तूं आतां गाच जरा । रसगंगेच्या मुशाफरा । " कवीला निराशा वाटण्याचीं कारणें कोणतीं हें त्यांनीं एका कडव्यांत सांगितलें आहे, तें असें-"नियमांनीं झालों ठार । ठराविकानें बेजार । हा जगण्याचा बाजार । सजीवतेचा आजार । अमुच्या कवनाचा पूर । मरत्या जीवाचा सूर । परि तव

कवनें । हलतां पवनें । झुलतिल भवनें । त्या कवनाचा सूर खरा । गा वागडल्या मुशाफरा । ”

संसारांत निराशा झालेली आणि भविष्य काळांतहि आशा लोपलेली, या आपल्या स्थितीचें शब्दचित्र कवि पुढील शब्दांनीं रेखाटतों, “ हातीं संसाराची माती । मनिंच्या आशा मनास खाती, । भूतकाळचीं भूतें रडती । मिटल्या जाग्या डोळ्यापुढतीं । शून्याचें मैदान । ”

अशा या मनःस्थितीवर तोडगा काय ? तर ‘ अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस ’ कवि विनवितो, “ गा तर चित्ता मम रमवाया; । हीच खरी जादूची माया । आनंदा खेळविणें वायां, । मशाल दिवसां लावुनि होतो । लाभ कुणाला काय । ”

जग म्हणजे सुखदुःखांचा बाजार. त्यांतील दुःखी चिजाच एखाद्याच्या वाट्याला येतात. एखादें फूल प्रेतावरच पडतें, एखाद्या पर्वतांतून ज्वालारस वाहतो, एखाद्या झाडावर वीज पडते ! अशा ‘ एखाद्याचें नाशिब ’ कवीनें अलंकारिक भाषेनें वर्णन केलें आहे आणि शेवटीं देवाची प्रार्थना केली आहे कीं, “ पाही कोण अशा हताश हृदया ? जो तो असें आपला । देवा ! तूं तरि टाकि अश्रु वरुनी, त्यासाठीं तो तापला ॥ ”

सुख किंवा दुःख वाट्यास येणें हें ज्याच्या त्याच्या नशिबाचें फळ असतें. पण सुखी माणसांनीं दुःखी माणसांची विचारपूस करण्याइतकी तरी आस्था दाखवावी नां ? ‘पण जो तो असे आपला.’ ही मानवाची अनास्था, हृदयाची शुष्कता; वृत्तीची स्वार्थपरता यांचा कटु अनुभव कवीला आला आहे. म्हणून तो देवाकडे धाव घेत आहे.

## समाजावर टीका

समाजांतील दुष्टत्वाच्या दडपणाखालीं कवीचें हळूवार हृदय चिरडून जातें आणि त्यांतून निराशेचा चीत्कार निघतो. अन्यायाचे आघात समाजाच्या अंगावर होत असलेले पाहून कवीचें कोमल मन निराशेचे सूर काढूं लागतें. पण व्यक्तिशः हळवे व दुबळें असलेलें हें मन प्रतिभेच्या पंखावर बसून उदात्त विचाराच्या अंतराळांत भराऱ्या मारूं लागलें,

म्हणजे मग मात्र तें अत्यंत आशावादी व सामर्थ्यशाली बनतें, एवढेंच नव्हे तर त्या दुष्टत्वाशीं व अन्यायाशीं युद्ध करण्याचा स्फूर्तिदायक संदेशहि तें जगास देतें. शारदेच्या सिंहासनापाशीं बसलेल्या कवीचा अधिकार सर्वांहून मोठा आहे. त्या अधिकारानें कवि समाजांतील व्यंगावर व वैषम्यावर जोराचे कोरडे ओढतो आणि समाजाला झगडा करण्याची, प्रतिकार करण्याची, प्रेरणा देतो. जगाचें स्वरूप कांटेरी कसें आहे, याचें वर्णन करतांना कवि ' अल्लड प्रेमास ' या कवितेंत म्हणतो, " बाग जगाची, ही न फुलांची, कांटे जागोजाग ! टाकिल कुणि तुज धिक्कारानें । रडविल किंवा उपहासानें । फसविल नकली की मालानें । कोणि भटकत, उगाच रखडत, फिरविल मागोमाग ! "

## रूढीवर हल्ले

समाजांतील दुष्ट रूढी व अन्याय्य चालीरीती यांचीं कांहीं उदाहरणें ' स्मशानांतलें गाणें ' या कवितेंत कवीनें दिलीं आहेत, तीं अशीं—'अन्नांवांचुनि सपिंड मरतीं; । मरतां त्यांतें पिंड अर्पिती ! । सजीव तोंवरि लत्ता देती । मरतां घेती, खांद्यावरतीं, उरफाटा सन्मान ! विधवा । मार्गीं मार्गें फिरवी, ! मांजर अडवें कार्य बिघडवी, । कर्तृत्वाची हीच थोरवी ! प्रेतां हसतां, कार्यक्षमता, न धरी परी गुमान ॥ "

" समानतेच्या मारी बाता । वरच्या लत्ता झेलित माथां; । सर्वेच खालीं झाडी लाथा । न ती निवारी, न ही आंवरी, बेशरमी हैवान ! "

घुबडास उद्देशून बोलतांना कवि म्हणतो, ' स्मशानांतील भुतापेक्षां समाजांतील माणसें अधिक हिंस्र व स्वार्थी आहेत.' कवि सांगतो, " शंख कुणाचा पोटासाठीं । गात कुणी तर तिसऱ्यासाठीं । छाया जिवाची उफराटी । जो तो ज्यात्यासाठीं ! । चल, हें मी तूं यांना सांगूं. "

## स्फूर्तीचा संदेश

गोविंदाग्रजांच्या अशा रूढिभंजक कवितांचा मेरुमणि म्हणजे "दसरा !" त्यांत कवि असा आवेशपूर्ण संदेश देतो, " टाकुनि सीमा मृत धर्माच्या,।

दंभाच्या वा अंधपणाच्या । जुनेपणाच्या, अहंपणाच्या; । सीमोल्लंघन–कालचि दसरा । जुन्या मतांचा जाळा कचरा ।। श्रुतिस्मृतींना आतां विसरा। अंधभक्तिचा पांगुळगाडा। मोडुनि तोडुनि उपडा पाडा। पाताळीं तो नेउनि गाडा ! ”

सुधारणेच्या ह्या मोहिमेंतील वीरांना वंदन करण्यास गोविंदाग्रज विसरत नाहींत. महाराष्ट्रांतील समाज सुधारणेचे जे अग्रदूत, त्यांचा गौरव करतांना ते म्हणतात—“ रूढीच्या किल्ल्यावर स्वारी । ‘अगरकरां’ची झडवा नौबत । ‘ भागवतां ’ची धराच हिंमत । ‘ केशवचंद्रांचे ’ घ्या चिलखत । फुका ‘ कृष्णा’ ची च तुतारी ” ।।

रूढीच्या सीमा उल्लंघणें म्हणजेच खरा दसरा, हें तत्त्व ठसवितांना गोविंदाग्रज सांगतात, “ रूढीचा गड खालीं उतरा । पाकोळ्या घुबडांना उडवा । जिवंत सोनें अखंड लुटवा । कृपण मनाचा रस्ता खुटवा । असा साजरा कराच दसरा ।। ”

या दुष्ट रूढि तरी कोणत्या ? ‘ रडत बैसले महारमांग ’ । हा एक अस्पृश्यांचा प्रश्न आणि दुसरा विधवांचा–त्यांच्या दुर्दशेचें वर्णन कवि करतो—“ तशाच विधवा करिती तळमळ । फत्तर फुटतिल येउनि कळवळ । कुठला पोकळ गताभिमान ? । चला उठा रे बांधा कंबर । ” अशा अनेक दुष्ट रूढींचा विध्वंस करण्याची प्रेरणा देण्यासाठीं कवीनें कमर कसली आहे आणि तो गर्जत आहे, “कुणी मनाचा असेल कच्चा। करील त्यालाही महशूर । या गाण्याचे गाउनि सूर । ‘ केशवपुत्रा ’ चा महशूर । ‘ गोविंदाग्रज ’ चेला सच्चा ।। ”

## आदराचीं स्थानें

लो. टिळकांविषयीं गोविंदाग्रजांना गाढ आदर असे. महाराष्ट्रांतील हा ‘ बौद्धिक ताजमहालच ’ आहे असें त्यांना वाट. शिवाजीमहाराजानंतर हाच राजकारणी पुरुष महाराष्ट्राचा भाग्य–विधाता निघाला, या दृष्टीनें ते त्यांच्याकडे भक्तिभावानें पहात. १९१८ सालीं स्वराज्याची शिष्टाई करण्यासाठीं लोकमान्य इंग्लंडास गेले, तेव्हां कवीच्या या भावनेला भरती आली व त्याची वाणी गुणगुणली, “ जें जें नश्वर गेलें निघुनी काळाच्या

पाठीं । अमृत तेवढें उरलें केवळ या दिवसासाठीं ।।" याच दिवसासाठीं 'उंच उभारुनि मान हिमालय तिष्ठत केव्हांचा ।' आहे असें कवीला वाटतें. तानाजीचें शौर्य, व्यास-वाल्मीकींचें काव्य, आर्यभट्ट—मिहिरादींचें ज्ञान—सारें कांहीं हा दिवस उजाडावा म्हणून होतें, फार काय, पानपतचें युद्ध, श्रीकृष्णाची गीता, श्रीरामाचा सेतु—हा सारा इतिहास घडला तो या दिवसासाठीं—अशी अतिशयोक्त प्रशंसा करून कवि "लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद" देतो आणि एकच मागणें मागतो; तें असें—"नलगे दौलत नलगे बरकत नको कोहिनूर । स्वदेश नलगे स्वराज्य नलगे हो सर्वहि चूर । एक सांगणें एक मागणें तेंच लाखवार । मागुनि घ्यावी श्रीशिवबांची भवानि तलवार ।"

## खोल सहानुभूति

उपेक्षिताबद्दलहि गहिंवर येण्याइतकी गोविंदाग्रजांची सहानुभूति व्यापक आहे. ते 'ओसाड आडांतील फुला'ची दशा सहृदयतेनें वर्णितात; तशींच कुब्जेचीहि. श्रीकृष्ण मथुरेला गेले असतां सारें गोकुळ तळमळलें. त्यांचें सांत्वन करण्यासाठीं कृष्णांनीं उद्धवाला पाठविलें. उद्धवानें 'हे नंदाला, यशोदेस हे' असे निरोप सांगितले. 'राधेला तर बहाल केली हरिनें जीवाची दुनिया' पण बिचारी कुब्जा! तिची आठवण कोण करणार? "तोंड झांकुनी ओंठ दाबुनी, रडे आंतल्याआंत मनीं । पुसुनी टाकी क्षणि पदरानें अश्रू आले जरि नयनीं ।।" अशी त्या कुरूप भक्तिणीची अवस्था जाणण्याइतकी सूक्ष्मता कवीनें दाखविली आहे आणि तिचा धांवा "दैवाची निर्दयता' यांत रसपूर्ण रीतीनें दिला आहे. 'श्रीहरिसाठीं कुब्जा रडते हेंच हंसें होईल माझें' हें तिचें हृद्गत कवीनें बरोबर ताडलें आहे.

'विरामचिन्हें' या कवितेंत मानवी जीवनांतील विविध अवस्था कवीनें मार्मिकतेनें रंगविल्या आहेत. विद्यार्थिदशेंत जिज्ञासा वाढलेली असतांना मनुष्य प्रत्येक गोष्टीबद्दल चौकस असतो. याचें वर्णन करतांना कवि म्हणतो, "जें तें पाहुनि यापरी भकतसे, हकू संशयें टाकित, सारा

जीवनलेख मी करितसें तें ' प्रश्नचिन्हां ' कित !" शेवटी कवि प्रार्थना करतो, " देवा ! ' पूर्णविराम ' त्या तव पदीं दे शीघ्र आतां मला ! "

गोविंदाग्रजांच्या अकुंठित कल्पकतेनें ' माझा मृत्युलेख ' लिहिण्याचें धाडस केलें आहे. त्या कवितेंत कवीनें आपली निराशा व आपलें जीवनाविषयींचें अज्ञान मोठ्या नम्रतेनें व प्रांजलपणानें मांडलें आहे, तें असें—

" यावज्जीवहि " काय मी " न कळलें आतांप्रती नीटसें । मित्रांतेंहि कळे न गूढ—न कळे माझें मलाही तसें ॥ अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतें कसें ? । कोठें आणि कधीं तरी जगति मी होऊनि गेलों असें ॥ "

मराठी साहित्याच्या भाग्याची गोष्ट अशीं कीं, गोविंदाग्रजांच्या जीवनाचें गूढ त्यांच्या मरणोत्तर त्यांच्या चहात्यांनीं व भक्तांनीं उकलून दाखविलें आणि शब्द—सौंदर्य, कल्पना—प्रभुत्व व भावोत्कटता या त्यांच्या गुण—संपदेचा संप्रदाय वाढता ठेवला. त्यांच्याइतकी सार्वत्रिक व गौरवपूर्ण स्मृति महाराष्ट्रांत दुसऱ्या कोणत्याच आधुनिक कवीची पाळली जात नाहीं.

## अभ्यासाच्या वाटा

(१) ' केशवसुतांचा सच्चा चेला ' असें गोविंदाग्रज स्वतःला म्हणवितात; गुरु—शिष्यांच्या कार्याबद्दल माहिती लिहा.

(२) ' प्रेमाचा शाहीर ' ही पदवी गोविंदाग्रजांना कां देण्यांत येते ?

(३) ' गोविंदाग्रजांच्या काव्यांतील कल्पना सुंदर व भव्य आहेत;' कांहीं उदाहरणें द्या.

(४) 'समाजांतील विषमतेवर गोविंदाग्रजांनीं जोराचे कोरडे ओढले आहेत;' गोविंदाग्रजांचे हे विचार स्पष्ट करा.

(५) ' राजहंस माझा निजला ' व ' मुरली ' या कवितांतील आशय लिहा.

(६) प्रेम आणि मरण, चिंतातुर जंतु, कवि आणि कैदी, एखाद्याचें नशीब, विरामचिन्हें या कविता मूळांत वाचा व त्यांतील मध्यवर्ती कल्पना लिहा.

## राजकवि तांबे : : : ३

महाबळेश्वराच्या दाट झाडींतून चालत असतांना एखाद्या थकलेल्या व तहानेलेल्या वाटसरूच्या दृष्टीस भलेंमोठें मोहोळ दिसावें आणि त्यांतून टप् टप् टप् टप् मधाचे मधुर थेंब गळत असावेत म्हणजे त्या



वाटसरूला किती हर्ष वाटेल ? तसाच हर्ष रसिकवर्गाला तांबे यांचा काव्य-संग्रह पाहतांना होतो. महाबळेश्वरच्या वातावरणांतील अणु-रेणु जसा स्निग्ध व शीतल आहे; तसाच तांबे यांच्या कवनांतील भाव आहे. महाबळेश्वरचें पाणी जसें थंडगार व संजीवक; तसें तांबे यांच्या काव्यांतील शृंगार-वीर-करुण वत्सल हे रस आहेत आणि महाबळेश्वराच्या निरनिराळ्या 'टोंकावरून' सूर्योदयाची किंवा सूर्यास्ताची जी रम्य व चंचल प्रभा दिसते, तीच तांबे यांच्या कल्पनाविलासामध्यें चमकत आहे. महाबळेश्वरांतील त्या खोल दऱ्या कधीं पौर्णिमेच्या चांदण्यानें तर कधीं हिंवाळ्यांतील धुक्यानें काठोकांठ भरलेल्या असतात आणि फेसाळ दूध ओसंडणाऱ्या द्रोणाप्रमाणें भासतात; त्याचप्रमाणें तांबे यांच्या निरनिराळ्या प्रकारच्या काव्यांत सखोल सहानुभूति व अपार आशावाद ओतप्रोत भरून राहिलेला आहे. लुसलुशीत पद-लालित्य, मंजुळ नाद-माधुर्य,

विमल शृंगार–रस आणि एकंदरीनें सौंदर्य–पूजक वृत्ति या चार गुणांनीं तांबे हे अर्वाचीन कवींमध्यें सर्वश्रेष्ठ ठरले आहेत. किंबहुना त्या गुणांनीं संपन्न असा त्यांचा एक विशिष्ट संप्रदायहि रूढ झाला आहे.

## काव्यात्म वृत्ति

तांबे हे जातिवंत कवि होते. त्यांची अवघी वृत्तिच काव्यात्मक होती. ते जणूं काव्यच जगत होते. अष्टौप्रहर त्यांचें मन काव्याच्या चिंतनांत गुंगलेलें असें. त्यांना निदिध्यास असें तो एक काव्याचाच. जसा तुकारामाला पांडुरंगाचा किंवा लोकमान्यांना स्वराज्याचा; तसा त्यांना काव्याचाच छंद दिवसभर व आयुष्यभर लागलेला होता. संसारांत संतोष पावून समाधानी वृत्तीनें जीवन घालवीत असतांना जे जे विशेष अनुभव आपल्या मनाला चाटून किंवा कापून गेले, ते सर्व तांबे‘यांनीं काव्यरूपानें लिहून ठेवले. खुद्द त्यांनींच आपल्या काव्याची जन्मकथा निवेदन केली आहे, ती अशी, ‘ एखाद्या गोष्टीनें मनाला चटका बसला कीं, तिला कवितेचें रूप द्यावयाचें. संसारांतील अनेक लहानमोठीं, घरांतील, घराबाहेर, जड सृष्टींतील, चैतन्य-सृष्टींतील दृश्यें मनाला झोंबलीं म्हणजे तीं काव्यरूपानें परिणत व्हावयाचीं; मग तीं कसल्याहि स्वरूपाचीं असोत. सामाजिक असोत, धार्मिक असोत, राष्ट्रीय असोत; असा क्रम आजतागाईत चालू आहे. ”

जेवढें म्हणून आपण अनुभविलें तेवढेंच लिहावयाचें, असें ब्रीद तांबे यांनीं ठेवलेलें होतें. त्यांनीं लौकिकाची चाड धरली नाहीं; द्रव्याची अभिलाषा ठेवली नाहीं. अत्यंत निष्कामपणें त्यांनीं काव्याची सेवा केली. ती लोकांपुढें ठेवून कवि म्हणून आपण मिरवावें असें त्यांना कधीं स्वप्नहि पडलें नाहीं. त्यांनीं काव्य रचण्यास लहानपणापासून प्रारंभ केला. पण त्यांच्या काव्याचें दर्शन मराठी वाचकाना प्रथम झालें तें १९२० सालीं–त्यांच्या वयाचे ४६ वे वर्षीं आणि तेंहि त्यांचे चाहते कवि प्रो. मायदेव यांच्या प्रयत्नांमुळें. ‘ डोळे हे जुल्मी गडे ’ हें रसिकांचें लाडकें पद तांबे यांनीं १८९१ मध्यें वयाच्या १६ वे वर्षीं लिहिलें, पण तें सुमारें तीस वर्षे दप्तरांत पडून होतें.

बरीच कविता त्यांनीं जाळूनहि टाकली. कीर्ति देवतेकडे पाठ फिरवूनच तें सरस्वती–देवीची आराधना करीत होते–त्यांच्याइतका प्रसिद्धि–विन्मुख कवि सापडणें कठिण. जसा कीर्तीचा तसाच संपत्तीचाहि नाद त्यांना कधींच लागला नाहीं. या आपल्या निरपेक्ष वृत्तीचें वर्णन खुद्द तांबेच अलंकारिक भाषेनें करतात, तें असें—" आपल्या ठायीं जर थोडीफार प्रतिभा असेल तर तिला लक्ष्मीपुढें नर्तकी म्हणून नाचवावयाचें नाहीं, सुवर्णाच्या नादावर तिला गावयास लावावयाचें नाहीं, हा अगदीं आरंभापासून माझो निश्चय होता आणि ईश्वरकृपेंकरून तो अद्यापि टिकला आहे." जशी पूर्वींच्या साधु–संतांची भगवद्भक्ति, तशीच तांबे यांची काव्य–भक्ति.

## जीवन व काव्य यांची सांगड

त्यांचें काव्य म्हणजे त्यांच्या जीवनाचें प्रतिबिंब. जसजसें जीवन वाढत गेलें; तसतसें त्यांच्या काव्याचे विषय बदलत गेले. या बदलाचें वर्णन तांबे पुढील प्रांजल शब्दांनीं करतात, " माझ्या कवितेचा हा एक विशेष आहे कीं, तिची वाढ माझ्या जीवनाच्या संगतीनें झाली आहे, मी पंधरा वर्षांचा होईपर्यंत ती शिशुप्रमाणें बोबडे बोल बोले. माझ्या नवयौवनाच्या कालांत ती कामुक झाली. आणि खरोखर त्या वेळच्या कांहीं कविता मी जाळून टाकिल्या. विवाहानंतर ती एका प्रेमांतच गुंगून गेली. पुढें माझीं मुलें सभोंवतीं दिसूं लागतांच तिनें मुलांचीं गाणीं गाइलीं. मृत्यु जेव्हां माझ्या दाराशीं आला आणि मुलांना घेऊन गेला, तेव्हां ती कविता चिंताक्रांत आणि उदासवाणी झाली." अखेरीस दिक्कालापलीकडील परम साध्यावर त्यांची दृष्टि खिळली व त्या वृत्तीचेहि पडसाद त्यांच्या काव्यांत उमटले. तांबे यांचें जीवन व काव्य यांचे ओघ एकमेकांत मिसळून चालले होते.

## शिक्षण–सुखाचा त्याग

तांबे यांच्या जीवनास सुरुवात ता. २७ नोव्हेंबर १८७४ रोजीं झाली. त्या दिवशीं ग्वाल्हेर संस्थानांतील मुगावली या गांवीं या भास्कराचा जन्म

झाला. त्याचे वडील रामचंद्रपंत हे झांशी संस्थानांत कारकून होते. बालपणीं गांवांतल्या नदीकांठीं व रानावनांत भास्करानें स्वैर संचार केला व निसर्गाचीं चित्रें आपल्या मनाच्या तबकडीवर उमटवून घेतलीं, गरिबीमुळें शिक्षणांत खंड पडला. त्या खेड्यांत कांहीं दिवस भास्करानें भिक्षुकी केली व साधुसंतांच्या पोथ्या वाचल्या. पुढें देवास संस्थानांत त्याचें इंग्रजी शिक्षण झालें. त्याची बुद्धि तरतरीत असल्यामुळें ते प्रवेश-परीक्षेत मानानें उत्तीर्ण झाले. १८९३ सालीं अलाहाबाद विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उतरून ते पहिल्या वर्गात आले. शिक्षणाची ओढ त्यांना इतकी कीं, एकदां त्यांनीं रात्रीं घरांतून पळ काढला व पंचवीस मैलांचा प्रवास पायीं केला. प्रि. आगरकर, सानेगुरुजी वगैरे विद्या-सेवकांचा पंथच त्यांनीं धरला. आग्रा येथें भास्कररावांनीं बी. ए.चा अभ्यास सुरू केला, परंतु आपल्या वडील बंधूसाठीं त्यांनीं मोठा त्याग केला. त्यांचें शिक्षण पूर्ण व्हावें म्हणून त्यांनीं आपलें शिक्षण अपूर्ण ठेवलें. आपल्या अत्यंत आवडीच्या वस्तूचा त्याग हाच सर्वश्रेष्ठ नव्हे का ? तो त्यांनीं केला. देवास तेथील शाळेंत वीस रुपये पगारावर, त्यांनीं शिक्षकाची नोकरी धरली. पुढें ते तेथील बालराजांचे शिक्षक बनले. त्यामुळें राजवाड्यांतील ग्रंथ-संग्रह त्यांना खुला झाला. त्याचा त्यांनीं यथेच्छ उपभोग घेतला.

## राजकवित्वाचा मान

पुढें ते देवासच्या महाराजांचे खाजगी कारभारी झाले, नंतर त्या संस्थानाचे वकील म्हणून ते इंदूरास गेले. तेथें ते १९०८ पर्यंत राहिले. पुढें एका खेड्यांत न्यायाधीशाचें काम करण्याचा योग आला. नंतर दोनतीन संस्थानांत निरनिराळ्या नोकऱ्या त्यांना कराव्या लागल्या. त्यांच्या न्यायप्रिय व बाणेदार स्वभावाला त्या संस्थानांची हवा मानवेना. त्यामुळें त्यांना स्थलांतरें व स्थित्यंतरें करावीं लागलीं. शेवटीं ग्वाल्हेर संस्थानांत ते १९२६ सालापासून स्थिरावले व ‘ राजकवि ’हि बनले. १९३४ सालीं त्यांच्या वयाला साठ वर्षें पूर्ण झालीं. म्हणून महाराष्ट्रांतील

शहरोशहरीं साहित्यिकांनीं सत्कार-सभा भरवून त्यांचा मोठा गौरव केला.

प्रा. मायदेव यांनीं १९२० सालीं तांबे यांच्या खनपटीस बसून व संशोधन करून त्यांच्या कविता जमविल्या व प्रसिद्ध केल्या, आणि स्वतः त्या सभा-परिषदामधून गाऊन दाखवून तांबे यांना योग्य ती कीर्ति मिळवून दिली. १९२६ सालीं तांबे हे इंदूर येथें भरलेल्या मध्यभारतीय कवि–संमेलनाचे अध्यक्ष झाले आणि १९३२ सालीं कोल्हापूरच्या साहित्य–संमेलनांतील काव्य–विभागाचें अध्यक्षस्थानहि त्यांना अर्पण करण्यांत आलें. त्याचप्रमाणें १९३५ सालीं, षष्ठ्यब्दिपूर्ति–समारंभाचे निमित्तानें, दुसरे एक कवि प्रा. माधवराव पटवर्धन यांनींहि त्यांचा काव्य–संग्रह साक्षेपानें संपादून प्रकाशित केला. "दुर्दैवानें मराठी कवींना नालायक वा निष्काळजीच संपादक भेटतात असें दिसतें." अशी तक्रार प्रा. पटवर्धनांनीं 'केशव-सुतां'च्या बाबतींत केलेली होती. तिला निदान तांबे यांच्या बाबतींत तरी पटवर्धनांनीं अणुमात्र जागा ठेवली नाहीं. तीस वर्षें तांबे यांच्या काव्यानें जो अज्ञात-वास पतकरला होता, तो मायदेव-पटवर्धनांच्या प्रयत्नानें समाप्त होऊन त्यांच्या काव्य–देवतेला पुढें राजैश्वर्य व लोकमान्यता उपभोगावयास सांपडली. अशा साफल्याच्या स्थितींत, वयाच्या ६७ वे वर्षीं, ता. ७ डिसेंबर १९४१ रोजीं ग्वाल्हेर येथें हा काव्य–भास्कर अस्तंगत झाला.

## नाट्य-गीतांचे प्रवर्तक

तांबे यांचें पद-लालित्य कमालीचें कोमल आहे. मृदु व मंजुल शब्दांनीं नटलेलीं व मधुर चालीवर रचलेलीं त्यांचीं नाट्य-गीतें तर अतिशय मनोहर आहेत. गुलाबाच्या पाकळ्यांच्या पायघड्यावरून त्यांची शारदा पाउलें टाकीत जाते, असें वाटतें. 'श्वासानें जें सुमन करपतें' असा पारिजातकाचा नाजूकपणा गोविंदाग्रजांनीं वर्णिलेला आहे. तोच तांबे यांच्या काव्यांत भरून राहिलेला आहे खुद्द तांबेच आपल्या काव्याच्या कोवळिकेचें स्वरूप 'अंगुली कठिण लागली, तरी संपली' असें करतात. तें अगदीं यथार्थ आहे. अशा भाव-मधुर व लालित्य-संपन्न नाट्य-गीतांचे

ते प्रवर्तकच आहेत म्हटलें तरी चालेल. ‘ मुशाफिर आम्ही ’ ‘ राजकन्या आणि तिची दासी. ’ ‘ बिजली जाशि चमके स्वारी, ’ ‘ आज फिरुनि कां दारीं, ’ ‘ फेरीवाला, ’ इत्यादि त्यांचीं नाट्य-गीतें चतुर व संयमित शृंगारानें थबथबलेलीं आहेत. ‘ कुणि कोडें माझें उकलिल कां ? ’ हें त्यांचें प्रणय-गीत गोविंदाग्रजांच्या ‘ गुलाबी कोड्या ’ इतकेंच लोकप्रिय झालेलें आहे. “ प्रणयप्रभा, तुजवीण, हृदय सांग, जगाहून भिन्न, डोळे हे जुल्मी गडे, कोणिकडे जादुगारिणी, कुणि असेल ग, घट तिचा रिकामा, घट भरे प्रवाहीं इत्यादि किती तरी काव्यांतून प्रेम रसांच्या धारा वहात आहेत. शुद्ध शृंगाराचे निर्मल नमुने असणारीं प्रेम-गीतें त्यांच्या सर्व कवितांच्या सुमारें निम्मी आहेत. ‘ कला व नीति ’ या वादांत त्यांनीं आपलें मत ‘ केवळ कलेच्या ’ बाजूनें आपल्या पत्रांत दिलेलें असलें, तरी त्यांच्या काव्य-देवतेनें मात्र नीतीची व सभ्यतेची ‘ लक्ष्मण-रेषा ’ कोठेंच ओलांडलेली नाहीं. त्यांच्या कलेनें सर्वत्र सूचकतेची मर्यादा पाळलेली आहे.

## विषयांची विविधता

तांबे यांच्या काव्यांत शृंगार हा प्रधान रस असला, तरी करुण—वत्सलादि रसांनाहि त्यांत स्थान आहेच. “ सांत्वन, शिशु-वंचना, आईकडे न्या ” इत्यादि गीतें कारुण्यानें ओथंबलेलीं आहेत. तसेंच ‘ अंगाई गीत ’ ‘ चिवचिव चिमणा छतांत ’ ‘ रुणुझुणु ये, ’ ‘ तर मग गट्टी कोणाशीं ? ’ ‘ लाजूं नको ताई ’ वगैरे गीतें वात्सल्य रसानें न्हालेलीं आहेत ‘ डुमडुमत डमरू ये ’ असें ‘ रुद्रास आवाहन ’ करणारें त्यांचें वीररसयुक्त गीत सुप्रसिद्धच आहे. ‘ प्रतिज्ञा ’ ‘ कोण रोधील ? ’ ‘ उखळांत दिलें शिर, ’ ‘ वाटलें नाथ हो ’ या कविता गांधीजींच्या सत्याग्रही आंदोलनाचें गुणगान करणाऱ्या आहेत, तर ‘ राजराजेश्वरा हो दयाळा ’ ही ‘ लोकमान्यांस ’ उद्देशून लिहिलेली कविता भक्तिभावानें भरलेली आहे. ‘ झांशीवाली ’सारख्या व्यक्तिगौरवाच्या कविता थोड्याच आहेत. ‘ नववधू प्रिया, ’ ‘ रतलें परपुरुषाशीं ’ ‘ घातली एकदां अतां उडी ’ इत्यादि गूढगुंजनात्मक कवनें जीवात्मा व परमात्मा यांच्यासंबंधींचीं आहेत. संत—

कवींच्या 'विराण्यां'ची ही आधुनिक आवृत्तीच होय. " अनन्त-स्तोत्र, चरण कधीं कां, चरणिं तुझ्या मज, हरि अर्पावें काय, घर राहिलें दूर " इत्यादि काव्यांतून भक्तीचा आर्त स्वर ऐकूं येतो. ' घन तमीं शुक्र, ' ' मरणांत खरोखर ' इत्यादि कविता म्हणजे आशावादाच्या तुताऱ्याच होत. तांबे यांच्या काव्य-सृष्टींत जशीं रण-शृंगें आहेत, तशींच लग्न-वाद्यें आहेत आणि तशीच देवळाच्या गोपुरांतील सनईहि वाजत आहे.

तांबे याची काव्याची बैठक किती नम्रतेची आहे, याची साक्ष पुढील कवनावरून कोणासहि येईल. आपलीं कवनें हीं सुमनें आहेत असें मानून ते रसिकांना विनवितात, " कुस्करूं नका हीं सुमनें । जरि वास नसे यास । तरी तुम्हांस अर्पिलीं सु-मनें । मधु जरी नसे तिळभरी अन्तरीं तरी करीं हीं धरणें । यां वर्ण नसे सौवर्ण। जों न हीं शीर्ण तोंवरी धरणें । क्या करीं, क्षणाभीतरीं वाळतिल तरी तयांना जपणें । अङ्गुली कठिण लागली तरी सम्पलीं ! हळुच यां शिवणें । अंजलीं धरुनि अर्पिलीं, भक्तिनें दिलीं म्हणुनि तरि घेणें ! "

## नादमधुर-शब्द-रचना

मोहक वेष धारण करून एकादी सुंदर बालिका येतांना दिसावी, त्याप्रमाणें तांबे यांच्या कवितेंत ललित शब्दांनीं रंगविलेली रेखीव वर्णन-शैली पहावयास मिळते. ' रुणुझुणु ये ' या कवितेंतील शब्दसौंदर्य व वत्सलरस तर असामान्य आहे. त्याचा एक नमुना पहा — ' रुणुझुणु ये, रुणुझुणु ये झणकारित वाळा ! लुटुलुटुलुटु दुडुदुडुदुडु ठुमकत ये बाळा ! " बालभास्कराच्या उदय-कालाचें वर्णन आरंभीं करून एक माता आपल्या बाळाला उठवितांना म्हणते, " जागति बघ चिऊकाऊ । लागति घरट्यांत गाऊं । डोलति तरु, लागति करुं ते हरिभजनाला । जागति गोठ्यांत गाइ,। धाजति वत्सांस पाहिं । ये रांगे ! कळ लागे माझिया स्तनांला ! "

' आनंदीआनंद ' या कवितेचा अणुरेणु आशावादानें भरलेला आहे. त्याला योग्य अशीच शब्दरचना कवीनें किती कौशल्यानें केली आहे, पहा—" आनन्दी आनन्द मुलांनो, आनन्दी आनन्द । चहूकडे दश-

दिशीं दाटला आनन्दी आनन्द ॥ फुलावरुनिया फुलावरि सुखें फुलपाखरुं ज्यापरी झुले, । तसें झुलाया तुम्हां उधळिलीं प्रभुजीनें चहुबाजू फुलें । म्हणुनी उडतां बागडतां । गरगरगर मण्डल धरितां । सलील हांसत गुणगुणतां । वस्तुमात्र आनन्द दे, तुम्हां काय जगाचे फन्दू ? ''

' पुंगीवाला ' हें एक प्रदीर्घ कथा–काव्य आहे. त्यांत १११ श्लोक असले, तरी ते सुबोध, धावते व आकर्षक आहेत. पुंगीच्या जोरावर त्यानें गांवांतील उंदीर नदीकडे नेले, पुढें त्यानेंच इनाम न मिळाल्यामुळें गांवांतील मुलेंहि पुंगीच्या गुंगीनें गुहेकडे नेलीं, ही कथा अर्थानुसारी ध्वनीनें कवि कशी कथन करतो पहा—

" झटपट पटपट पाय आपटत, पुटपुट करित मुखानें, । खटपट वटवट टाकुनि चटचट टाळ्या पिटित करानें । नाचत भरभर मुलें चिमुकलीं निघतीं आनंदानें, । गरगर फिरती मधुर पांखरें जशी उधळतां दाणे । "

## सुरेख वर्णनशैली

त्या पुंगीवाल्याचें शब्द–चित्र तांबे यांनीं बारकाईनें रेखाटलें आहे. तें असें—" बघति टकमक हे सकल नयन काय ? मूक व्हाया काय ह्या मुखा होय ? कुठुनि येई ही मूर्ति अति विचित्र ? कोण रेखाटूं शके इचें चित्र ? ॥ रंगीबेरंगी झगा पायघोळ । लाल पिवळा अति सैल, पडे झोळ । अंगकाठी किती रोड उन्च काळी, । उरीं केसाची दाट झुले जाळी । तीक्ष्ण लोचन अंगार पेटतात, । मिशा दाढी उभयतां भेटतात; अधिच त्याचें भाल तें भव्य मोठें । वरी भस्माचे ओढले फराटे । शेन्दुराचा वरि तिलक रसरशीत, । नयनिं तिसऱ्या जणुं अग्नि धगधगीत । दोन्हि कानीं रुद्राक्ष डोलतात, रुळे स्फटिकाची । माळ ही गळ्यांत " ॥

## निसर्गाचीं शब्द–चित्रें

खेड्यांतील निसर्गाचें वर्णन ' गुराख्याचें गाणें 'मध्यें बहारीचें आहे; आणि त्याहून आहे त्या गुराख्याच्या समाधानी मनःस्थितीचें वर्णन. गुराखी आपला जीवन-क्रम सांगतांना म्हणतो, " तृषा लागतां नीर

२९०९

झन्याचें ओंजळीनें मी पितों । क्षुधा लागतां कांदाभाकर यथेच्छ मी जेवीतों । फिरतां फिरतां करवंदें हीं तोडुनि मी भक्षितों । काडीनें मी काटे दाबुनि बोरेंही तोडितों । धनिका ताट रुप्याचें जरी । पांचहि पक्वान्नें त्यावरी, । नाहीं गोडि मुखाला परी. । गाईसङ्गें हिण्डुनि रानीं थकुनि सुखें जेवितों । जाडेंभरडें खाउनि धनिकाहूनि अधिक तोषतों. । ”

गुराख्याची संतुष्ट वृत्ति अशी कीं, त्याला काळी घोंगडीच आवडते, भरजरी मंदिल नव्हे. कोणाचा बांधलेला नाहीं, नोकर नाहीं, गुलाम नाहीं, असा तो गुराखी आपल्या सुखाची गुरुकिल्ली सांगतो, “ समाधान हा परिस अहा ! मज रानांतचि लाभतो । दुःखाच्या लोहास लाविता सुखसोनें बनवितो. । ” इंग्रजींतील ‘ चक्कीवाल्या ’ची ही किती सुंदर प्रतिकृति आहे !

प्रभातकाळचें मनोहर दृश्य ‘ सोन्याची घेउनि करिं झारी ’मध्यें तांबे यांनीं रंगविलें आहे. तसेंच वर्णन ‘ रासमंडळ–गोपीचंदन ’ या कवितेंतहि त्यांनीं केलें आहे. तें असें—“ पिवळें ताम्बुस ऊन कोवळें पसरे चहुफेर, । ओढा नेई सोनें वाटे वाहुनिया दूर. । झाडांनीं किति मुगुट घातले डोकिस सोनेरी, । अहाहा ! पहा तर सोन्याचा गोळा तो क्षितिजीं । ” उषःकालीं आकाशांत उंच उंच भराऱ्या मारणाऱ्या पांखरांचीं शब्द-चित्रें तांबे यांची लेखणी किती कुशलतेनें काढते पहा—“ सोनेरी मखमली रुपेरी पङ्ख कितीकांचे, । रङ्ग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इन्द्रधनुष्याचे । अशीं अचल फुलपाखरें फुलें साळिस जणु फुलती । साळीवर झोपली जणू का पाळण्यांत झुलती. । झुळकन् सुळकन् इकडुनि तिकडे किति दुसरी उडती, । हिरेमाणिकेंपाचू फुटुनी पङ्खचि गरगरती । उडूं, बागडूं, नाचूं, गरगर फिरूं चला मौजें । ”

रात्रीचें वर्णन करतां करतां तांबे यांनीं समाजांतील वैषम्य ‘ मार्ग-प्रतीक्षा ’ या कवितेंत किती मार्मिकतेनें सूचित केलें आहे. “ धनिक सुन्दरी रम्य मान्दिरीं । मंचकावरी मुदित अन्तरीं. । कृषक–योषिता काम सारुनी । निजति तान्हुलें जवळ घेऊनी । ” हीं दोन दृश्यें भांडवलवाले व कामकरी या दोन ध्रुवांचें दर्शन घडवीत नाहींत काय ?

## व्यक्तींचीं शब्द-चित्रें

'नदितिरीं उभी' असणाऱ्या स्त्रीची मूर्ति तांबे यांनीं मोजक्या शब्दांनीं कशी कोरली आहे, पहा—" नदितिरीं उभीं ती दाट तृणीं। आर्द्र वस्त्र ठिबके चरणीं.। नयन नमीं, कर दोन्ही जुळले। केशपाश उरिं पाठीं रुळले। तुफान हृदयीं घोर उसळले। ही पसरे छाया मुखिं नयनीं। बघति तुङ्ग गिरि घेरा घालुनि। थिजले तरुवर तिला पाहुनी। स्थिरावले ढंग पळतां गगनीं। डोकावि बालरवि ढगांतुनी।"

तसेंच सुरेख वर्णन 'घट भरे प्रवाहीं बुडबुडनी' या काव्यांतहि आहे. नदींत घागर भरली तरी स्त्रीचें लक्ष भलतीकडेच होतें. त्यावेळचें दृश्य रंगवितांना कवि म्हणतो, "घट भरे प्रवाहीं बुडबुडनी-। न दिसे तुज न पडे श्रवणीं? पदर गळाला, उडे वायुवर, । कुरळे उडती केसहि भुरभुर प्रमदे, बघ त्या सावर आवर—कां उभी प्रवाहीं शून्य मनीं?" तिला वाटतें, आपण ज्याची वाट बघत आहों, तो प्रियकरच आला. पण त्याच्या आगमनाच्या खुणा ज्या तिला वाटतात त्यां निसर्गाच्याच लीला असतात. "पाउल नच तें, शेत सळसळे। शब्द न मानवि, वारा बोले। शीळ न वायुच वंशीं खेळे। कां विरघळशी भ्रमिं फिरफिरुनी?"

कल्पनांमागून कल्पना चालवून व विविध अलंकारांनीं आपली कविता नटवून तांबे एका सुंदर स्त्रीचें वर्णन किती मनोवेधक करतात, हें "तूं कवण जगांतील ललना?" या कवनामध्यें पहावयास सांपडतें. ते एका सुंदरीस पाहून प्रश्न करतात, "बालकल्पनासृष्टींतुनि का अवतरलीस या भुवना?। गन्धर्वांच्या सुरसृष्टीमधिं पावलीस का जनना?। का नन्दन-वनकुसुम पातलिस रिझवाया मम नयनां?। सुर—जान्हवितिल कमलगन्ध का मूर्त येशि मम सदना? आनन्दच का शरीर धरूनी आलिस विहसित वदना?।" ही मुलाची कल्पना? कीं गंधर्वांची तान? कीं नदनवनांतील कळी? कीं आकाशगंगेंतील कमल-गंध' कीं मूर्तिमंत आनंद—असे संदेहामागून संदेह कवीच्या मनांत उत्पन्न होतात.

'तीनी सांजा' या कवितेंतील एका कडव्यांत सहा उपमा कवीनें गुंफल्या आहेत. त्या अशा—"नाद जसा वेणूंत, रस जसा सुंदर कवनांत,

गन्ध जसा सुमनांत, रस जसा बघ या द्राक्षांत, । पाणि जसें मोत्यांत, मनोहर वर्ण सुवर्णात । हृदयीं मी साठवी तुज तसा जीवित जों मजला । ”

## अढळ आशावाद

खिन्न मनाला आशा व आनंद देणारी तांबे यांची एक सुविख्यात कविता आहे. निसर्गातील नाना दृश्यांतून आशावादाचा सूर त्यांनीं पुढील-प्रमाणें काढला आहे, “ घन तमीं शुक्र बघ राज्य करी, । रे खिन्न मना, बघ जरा तरी । फूल हसे काट्यांत बघ कसें, । काळ्या ढगिं बघ तेज रस-रमतें, तीव्र हिमांतुनि वसन्तहि हसे । रे उघड नयन, काळ पळे दुरी. ॥” काळोखांतहि तारा चमकतो, काट्यांतहि फूल फुलतें, ढगांतहि वीज तळ-पते, हेमंतानंतर वसंत येतो, असें सांगून कवि म्हणतो, “ फूल गळे, फळ गोड जाहलें, । बीज नुरे, डौलांत तरु डुले; । तेल जळे, बघ ज्योत पाजळे । का, मरणिं अमरता ही न खरी ? ” ॥ झाडावरील फूल सुकलें तरी तेथें फळ येतें, आंब्याची कोय नाहींशी झाली, तरी तिच्यांतूनच झाड वाढतें, तेल थेंबाथेंबानें संपतें पण तेज पसरतें आणि मरणानें माणूस दृष्टिआड झाला तरी कीर्तीनें तो अमर होतो हा संदेश किती आशावादी आहे ! केशवसुत—गडकरी—यशवंत आदि अर्वाचीन कवींच्या साऱ्या काव्यांतून निराशेचाच सूर प्रामुख्यानें ऐकूं येतो, पण तांबे यांचा काव्यात्म जीव कधींच निराश होत नाहीं. तो निसर्गांतून आशावादाचें रम्य गीतच ऐकतो व इतरांना ऐकवितो हें विशेष. स्वतःच्या हृदयांत आनंदाचा तंबोरा लागलेला असला, म्हणजे बाहेरील अंधार—उजेड किंवा उन्हाळा—पावसाळा अथवा सुख—दुःख ध्यानींसुद्धां येत नाहींत, या सिद्धांताचा हा पुरावाच नव्हे काय ?

## वीराचा शुद्ध प्रणय

शुद्ध, निर्मळ व रसरशीत प्रणयाचें सभ्य, संयमित व कलापूर्ण चित्रण तांबे यांनीं आपल्या अनेक शब्द-मंजुल, कल्पना—सुंदर व भाव-मधुर गीतां-मध्यें केलेलें आहे. रजपूत रमणींच्या प्रणय-भावना रंगविण्यांत ते चतुर आहेत. रणांगणावर शौर्य गाजविणाऱ्या वीर—शिरोमणीची वाट पहाणारी

एक प्रिया आहे. तिच्या मनांतील भाव—लहरी ' बिजली जाशि चमके स्वारी । ' या कवनामध्यें उमटलेल्या आहेत. त्या स्त्रीला आपल्या वीर पतीचा अभिमान किती वाटतो, पहा—" जळ झुलें जसें वाऱ्यानें । तिकडील तशा शब्दानें । काशि बाइ झुलति हीं सैन्यें । देईल विजय मल्हारी"॥ अशा रणशूर विजयी पतीला " सोन्याच्या तबकामाजीं रत्नदीप उज-ळुनी " ओवाळण्यासाठीं ती सिद्ध आहे.

अशीच प्रतीक्षा करणारी दुसरी एक रमणी 'स्वारी कशी येईल ?' असें चिंतन करतां करतां गुणगुणते, " कुणास ठाऊक कवणे रूपीं येइल माझ्या घरीं ? । कशी तयारी करूं ? अङ्गणीं घालु कशी हातरी ? " असा संभ्रम उत्पन्न झाला असतांना तिला एकेक कल्पना सुचतात, त्या अशा— " का वाऱ्यावरि परिमळापरी अवतरेल तो तरी ? का ढगावरी गर्जनेपरी येइल भूमीवरी ? । काय विजेवरि लखलख येइल जाशि सोन्याची सरी ? नदीपुरावरि येइल का तो तरल तरङ्गापरी ? । घन राइमाधिल का गोड लकेरीपरी ? का स्मितसा निजल्या बाल—कपोलावरी ? का मधुसा फुलल्या कमलदलाभीतरी । यापरि करितां विचार साजणि, होतें मी घाबरी । " किती कोमल शब्दांत किती रमणीय कल्पना !

थोर कुलांतील एक रजपूत वीर व त्याची रमणी यांचा हृदयंगम संवाद " मुशाफिर आम्ही ' या कवनामध्यें कवीनें गोवला आहे. तो वीर रानावनांत राहतो, पण त्या वनवासांतच प्रेमाचें सुख भोगण्यास ती स्त्री तयार असते—आणि म्हणून म्हणते, " तुम्हांविण अन्न । जरी अन्न अमृत, । विषाहुनि कडु इथें खचित । तुम्हांविण शय्या । शय्या कुसुमांची । रुते मज कांट्याहुनि साची. । " तेव्हां तो तिला बजावतो, " जिवाला धोका । धोका रानांत । नीट हें आणी ध्यानांत. । " पण तिचा निर्धार असा कीं, " तुम्हांविण जगणें, । जगणें मृत्युच कीं । तयाहुनि दुस्सह या लोकीं । "

" राजकन्या आणि तिची दासी " हें तर एक प्रेम—मधुर असें नाट्य-गीतच आहे. जवाहराचा व्यापारी म्हणून खैरपूरचा राजपुत्र राजकन्येच्या

राजवाड्यांत आला व तिला पाहून गेला, असा नाट्य-प्रसंग कवीनें योजला आहे. त्यांच्या दृष्ट-भेटीनंतर राजकन्या व दासी यांचा जो लाडिक व लाजरा संवाद झाला, तो या गीतांत खुबीनें वर्णिलेला आहे, " कुंवराणीजी, किती लपवितां मन ? किति हीं सोंगं ? " असें दासीनें मिष्किलपणानें विचारल्यावर " काय पुन्हा ते खेर–तेच–त्या–का–कूवरजी ते " असा राजकन्येचा आनंदामुळें, लज्जेमुळें संभ्रम झाल्याचें या नाट्य-गीताचे शेवटीं दाखविलें आहे. ' स्वयंवर ' नाटकांतील रुक्मिणी व तिची दासी यांच्या संवादाची स्मृति होण्याइतका हा काव्य-रूप संवाद हृद्य व रम्य आहे.

## स्त्रीविषयीं आदरभाव

तांबे यांची प्रेमाची कल्पना निर्मल आहे. स्त्रीजातीकडे ते आदरानें पहातात. पुरुषांची खाण म्हणजे स्त्री. पुरुषाचा स्वभाव घडविण्याचें कार्य माताच करते. चंद्राची कांति, रत्नाचें तेज, फुलाची कोमलता–या सर्व गुणांची गंगोत्री म्हणजे स्त्री. असा नारी-महिमा तांबे पुढील वेचक शब्दांनीं गातात. " भयचकित नमावें तुज रमणी, । जन कसे तुडविती तुज चरणीं ? । महाकवी, तत्त्वज्ञ, भूपती, । समर-–धुरन्धर वीर धीरगति । स्थितप्रज्ञ हरि उरीं कोण्डिती, प्रसव तयांचा तूं जननी । भूत निघाला तव उदरांतुन । वर्तमान घे अंकीं लोळण, । भविष्य पाही मुली, रात्रदिन । तव हाकेची वाट मनी । तुझ्या कान्तिनें चन्द्र झळझळे । फुला फूलपण, मुली तुजमुळें, । रत्नीं राग तुझा गे उजळे, । तुझ्यास्तवच हीं प्रिय भगिनी । "

स्वतःच्या पत्नीवर कवि पूर्ण संतुष्ट आहे—तिचा त्याला अभिमान-सुद्धां आहे. आपली पत्नी काळी आहे असें लोक म्हणतात, हें ध्यानीं घेऊन कवि उत्तर देतो, " जन म्हणति सावळी तुज सगळे, । करुणार्ह बिचारे ते अन्धळे।' आपल्या अर्धांगीच्या काळेपणाची कैफियत देण्यासाठीं कवि एक पौराणिक पुरावा देतो; तो असा — ' अगाध सुंदर यमुना काळी । तटीं गर्द झाडाच्या ओळी, । वेडा झाला तो वनमाळी,

उजळिते मनोमल श्याम जळें ॥ " काळ्या यमुनेच्या कांठी खेळणाऱ्या श्रीकृष्णानें कैक मनांचे कोपरे उजळले. निसर्गाचा दाखलाहि तसाच. काळा ढग द्रवतो म्हणून धनधान्य मानवाला मिळतें. हें सांगतांना कवि म्हणतो, " काळा काळा मेघ सुंदरी, । भाग्यहीन जो मोहे न परी, । धनधान्याची समृद्धि उदरीं । मरतील बापडे जरि न वळे ॥ "

ही बचावाची भूमिका सोडून कवि 'सहज तुझी हालचाल' या काव्यांत आपल्या पत्नीविषयींचा अभिमान मोठ्या गौरवानें गातो, तो असा— " सहज तुझी हालचाल मन्त्रें जणूं मोहिते । एकवार बघ हासुन डळमळेल सिंहासन । तळमळतिल मनि सुरगण हास्यास्तव खास ते ! ही अपूर्व शक्ति सगुण । झाडितसे मम अङ्गण । हें माझें भाग्य बघुन जळफळतिल देव ते ॥ ' राजेच काय, पण देवहि हेवा करतील, असें माझ्या पत्नीचें थोरपण आहे अशी ग्वाही कवि देतो. बाह्यसौंदर्यापेक्षां अंतःसौंदर्याचेच पूजक तांबे आहेत.

## नाट्य-प्रसंगाचें चित्रण

तांबे यांचें काव्य म्हणजे मधानें भरलेले घट. झऱ्यावर सायंकाळीं पाणी भरण्यास गेलेली तरुणी कोठें दिसेनाशी झाली—तिची घागर मात्र रिकामी राहिलेली आहे, अशा नाट्य—प्रसंगाचें चित्रण करतांना तांबे म्हणतात,"घट तिचा रिकामा झऱ्यावरी । त्या चुम्बिति नाचुनि जळ लहरी॥" संध्याकाळच्या वेळीं शेतांतील कामकरिणी कशा विसांवा घेत बसतात याचें शब्द-चित्र पुढील कडव्यांत काढलें आहे—" पलीकडे त्या करुनि कापणी । बसल्या बाया हुश्श करोनी । विनोद करिती रमती हसुनी । जा पहा तिथें कुणि ही भ्रमरी ॥ "

नागरी ललनांची देव—दर्शनाला जाण्याची वेळ म्हणजे संध्याकाळ. त्यांचेंहि शब्द-चित्र पुढील शब्द-पंक्तींत काढलेलें आहे—" तांदूळ पदरीं बिल्वदळ करीं । चरण क्षाळुनि जवळ तळ्यावरि । जमति शिवालयिं पोक्त सुंदरी । हिरकणी बघा ही त्यांत तरी ॥ " वेळूच्या बेटांतून प्रिय-कराची शीळ ऐकूं आली, म्हणून ही तिकडे गेली, हें सांगून कवितेची

सूचक समाप्ति केली आहे. ती अशी—"पलीकडे वेलूंची जाळी । तेथें वारा धुडगुस घाली । शीळ गोड तीमधुनि निघाली । ही झुळुक हरपली लकिरीपरी ॥" संगीताच्या लकेरीप्रमाणें ती दिसेनाशी झाली.

दुसरा एक घट दुधानें भरलेला आहे व त्यांत प्रेमाची गोडी मिसळलेली आहे. कवि म्हणतो; "तें दूध तुझ्या त्या घटांतलें । कां अधिक गोड लागे न कळे ॥ साईहूनि मउमउ बोटें ती । झुरूमुरू झुरूमुरू धार काढिती, । रुणुझुणु कंकण करिती गीतीं, । का गान मनांतील त्यांत मिळे ? " गाण्याची गोडी दुधांत मिसळलेली !

## प्रेमाचें अद्वैत तत्त्वज्ञान

प्रेम स्त्री–पुरुषांमध्यें अद्वैत उत्पन्न करतें. दोघांचीहि सुखदु:खें समान होतात. कारण एकांवर, तर कार्य दुसऱ्यावर, असा असंगति अलंकार साधून तांबे यांनीं १९२० सालीं, ४६ वे वर्षी, एक अतिरम्य भावगीत रचलें; तें असें—"कुणि कोडें माझें उकलिल का ? कुणि शास्त्री रहस्य कळविल का ?। हृदयिं तुझ्या सखि दीप पाजळे, । प्रभा मुखावरि माझ्या उजळे, । नव रत्नें तूं तूज भूषविलें, मन्मन खुललें आंतिल कां ? । गुलाब माझ्या हृदयीं फुलला । रंग तुझ्या गालावर खुलला । कांटा माझ्या पायीं रुतला, । शूल तुझ्या उरीं कोमल कां ? । माझ्या शिरिं ढग निळा डवरला, । तुझ्या नयनिं पाऊस खळखळला । शरच्चंद्र या हृदयीं उगवला, । प्रभा तुझ्या उरिं शीतल कां ? । मद्याचा मी प्यालों प्याला । प्रिये, तयाचा मद तुज आला; । कुणीं जखडिलें दोन जिवांला । मंत्र--बंधनीं केवळ कां ? । "

यांतील शब्द–सौंदर्य, अलंकार–वैभव व भाव–माधुर्य किती मनोहर आहे !

तसेंच दुसरें शृंगारपूर्ण नाट्य–गीत म्हणजे 'डोळे हे.' ध्वनि–मुद्रिकेमुळें या गीताचा प्रसार खूप झाला व त्यानें तरुण हृदयांना वेडें केलें. एका तरुणीची सलज्ज स्थिति किती थोडक्यांत कवीनें चितारली आहे, पहा—"डोळे हे जुल्मि गडे रोखुनी मज पाहूं नका ! जादुगिरी त्यांत

पुरी येथ उभे राहूं नका । घालुं कशी कशिदा मी ? होति किति सांगूं चुका ! बोंचे सुइ फिरफिरुनी वेळ सख्या, जाय फुका । खळबळ किती होय मनीं ! हसतिल मज सर्व जणी; । येतिल त्या सन्धि बघुनि । आंग उगा लावुं नका ! " महाराष्ट्रांतील मध्यमवर्गीय तरुण स्त्रीचा दिनक्रम व तिच्या सलज्ज प्रेमलीला यांचें हें चित्रण किती सूचक, संयमित व आल्हा-दक आहे, नाहीं ?

शृंगार व वत्सल या रसांचा संगम करणारें नाट्य-गीत म्हणजे 'गट्टी' हें होय. बहिणीचें लपलेलें प्रेम भाऊ तिच्या साध्यासाध्या शब्दांतून कसें हुडकून काढतो तें पहाण्यासारखें आहे. " तुझ्या गळा । माझ्या गळां । गुम्फूं मोत्यांच्या माळा—" " ताई, आणखि कोणाला ? "। चल रे दादा चहाटळा ! " " तुज कण्ठीं । मज अंगठी । " आणखि गोऽफ कोणाला ? " " वेड लागलें दादाला ! " " मला कुणाचें ? ताईला "। " तुज पगडी । मज चिरडी "। " आणखि शेला कोणाला ? " " दादा, सांगूं बाबाला ? " " सांग तिकडल्या स्वारीला ! " असा हा संवाद मौजेचा आहे.

## राष्ट्र-प्रेमाची ललकारी

तांबे यांच्या संवेदनक्षम हृदयांतून प्रेमाच्या अनेक धारा अखंड वाहात. त्या केवळ सांसारिक प्रेमाच्या असत असें नव्हे. स्त्री, मुलें, मित्र इत्यादी जिव्हाळ्याच्या व्यक्तीवर तर ते प्रेमाचा अभिषेक करीतच; पण भूमाता व जगन्माता यांच्याविषयींहि त्यांच्या अंतःकरणांत अगाध प्रेम असे. प्रेमाच्या नाना जाति त्यांच्या काव्यांत भरलेल्या आहेत. १९२० सालीं म. गांधींनीं राष्ट्रांत असहकारितेचें अभिनव, उदात्त व स्फूर्तिदायक असें युद्ध पुकारलें. त्याच्या नौबती ऐकून तांबे यांचें चिरतरुण अंतःकरण रोमांचित झालें. राष्ट्रीय संस्थेंत काम करण्याच्या उद्देशानें ते पुण्यास आले होते. पुढें देहानें नसलें तरी अंतःकरणानें ते राष्ट्रीय आंदोलनांत भाग घेत असत. त्या आंदोलनांतील भावनापूर्ण व उदात्त अंगांचें त्यांना आकर्षण होतें. त्याच्याशीं समरस होऊन त्यांनीं चार-पांच काव्यें रचलीं

आहेत. ‘ कोण रोधील ? ’ या कवितेंत गांधीजींच्या आत्मबलाला उद्देशून ते म्हणतात, “ या भविष्याचिया दिव्य कारागिरा । कोण रोधील ? ॥ दे कोण कर सागरा ? ॥ ” शस्त्रसंपन्न ब्रिटिश साम्राज्यसत्तेला ते बजावतात, “ ज्यावरी भार तव, ज्यावरी गर्व तव । विफल तोफा तुझ्या, पलटणी सर्व तव । विफल बलदर्प तव, यांत का शर्व तव । उघड लोचन, पहा दूर राजा, जरा ॥ ” दूरदृष्टीनें पुढील भविष्य काय दिसेल, हें सांगण्याचा अधिकार कवीचा आहे. कारण “ कविस्तु क्रांतदर्शी. ” त्या दिव्यचक्षूनें पाहून कवि भविष्य सांगतो, “ तेथ त्या रत्नमय दिव्य सिंहासनीं । लखलखे भरतभूजननि बघ विजयिनी । प्रणय, नय, सत्य हे सज्ज गण रक्षणीं । बघ भविष्याचिया दिव्य त्या मन्दिरा.” ॥ स्वातंत्र्याच्या दिव्य सिंहासनावर विराजलेली भारतमाता पाहून तांबे यांना किती आनंद झाला असता !

सत्याग्रही सेनेला चिरडून टाकण्यासाठीं ब्रिटिश सरकारानें दडपशाहीची पराकाष्ठा केली. पण या रावणी उपायांनीं गांधीजींचा रामबाण हटणार नाहीं, हें सांगतांना तांबे यांनीं कांहीं पौराणिक दाखले दिले व विचारलें, “ उखळांत दिलें शिर, काय अतां ? । दणकवा मुसळ ढोंग न करितां । हरिश्चन्द्र तव सुत सत्याग्रही । सदा अहिंसारत तो निग्रही, । अजस्र मारा रिपुचा साही । परि हरीस आणी मानवता. ॥ ” चिलया, प्रल्हाद इत्यादि सत्याग्रही बाल-वीरांचा इतिहास सांगून त्या सर्वांचें तेज गांधीजींत उतरलें आहे, असें कवि म्हणतो, “ ह्या बाळांचा आत्मा पसरे । युगान्तरीं, तो आतां उतरे, । एकवटुनि ‘ मोहनीं ’ अवतरे-॥ तूं वांझ न गे माझी माता । ”

## तृणाच्या पात्यांत खड्ग

गांधीजींची प्रतिकारशाली चळवळ सुरू झाली, तेव्हां परतंत्र, भयभीत, निराश व असहाय्य जनतेला केवढा धीर आला, किती आशा वाटली, कोणती स्फूर्ति संचरली याचें वर्णन तांबे असें करतात, “ वाटलें नाथ हो, तुम्ही उतरतां खालीं । दे असहकारिता हाक तुम्हां ज्या कालीं । हम्बरडा फोडी आर्त महात्मा जेव्हां । आघात झेलिले घोर

उरावर तेव्हां । त्या यज्ञें द्रवुनी गमे धावला देवा । ऐकिली आर्त किङ्काळी ॥ वाटलें उघडलीं द्वारें तीं स्वर्गांचीं, । वाटलें धावली माउलि ती गरिबांची । वाटलें पळालीं सकळ सङ्कटें साची । गरिबांचा आला वाली " ॥

निःशस्त्रांचा हा प्रतिकार बलाढ्य साम्राज्यसत्तेला काय करूं शकणार ? अशा शंकाकुल चिंतातुरांना उत्तर ' तृणाचें पातें ' या कवितेंत तांबे यांनीं दिलें आहे, तें असें—" तृणाचें पातें । हालतें डोलतें वातें ॥ झगा मखमली हिरवागार । मुकुटहि रत्नजडित छान्दार । तुरा तयावर झुपकेदार । हलवि हृदयातें ॥ यावरि तेज कसें रसरसतें । जीवन नसांतुनी थबथबतें । चिमणें इन्द्रचाप थयथयतें, दंवीं जइं न्हातें. ॥ मग या पायिं कसें तुड-वीतां ? खड्ग यांतलें उद्यत बघतां । भरे कापरें स्मरतां सत्ता । झुलवि जी यांतें ॥" गवताचें पातें म्हणजे तरवारीचें पातें आहे असा अनुभव ब्रिटिश सत्तेला अखेर आलाच. कारण, " यांतुनि कृष्ण मुरलि वाजवितो । वामन बलीस यांत दडवितो । यांतुनि नारसिंह गुरगुरतो । भ्या रे यातें" ॥ असें कवि सांगतो. सत्यादि गुणांच्या मागें जनता धावते व जनतेचें सामर्थ्य कोणाहि सम्राटाला भारी होतें, हा अनुभव इतिहासांत पुनः एकदां नोंदला गेला.

लो. टिळकांच्या निधनाची वार्ता ऐकतांच तांबे यांचें हृदय शोकानें उचंबळलें. ' लोकमान्यांस ' या काव्यांत ते त्यांच्या कार्याची थोरवी एका रूपकानें वर्णितात, ती अशी—" राजेराजेश्वरा हो दयाळा, । तातडी कां असे हो निघालां ? । अन्धकारीं पहातां नभांत । फिरे बाले अजूनहि रात, । देहकष्टामधीं रोड झाला, । रात्र सारी न निद्रा तुम्हांला । कुक्कु-टाचा नसे शब्द झाला । पाहटेचा न तारा उदेला; । केवि ऊठाउठी हो निघालां ? । काय झालें असें हो दयाळा ? । हाक कोणी दिली हो तुम्हांला ? । तातडी कां असें हो निघाला ? " ॥

झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या समाधीवर तांबे यांनीं चार कड-व्यांचें एक गीत रचलें आहे. त्यांतून त्यांचा पूर्वजांविषयींचा अभिमान प्रगट होतो. ' रे हिंदबांधवा, थांब या स्थळीं अश्रु दोन ढाळीं ' असें

सांगून ते म्हणतात, "मिळतील इथें शाहीर, । लववितील माना वीर । तरु सारे ढाळितिल नीर, । ह्या दगडां फुटतिल जिभा । कथाया कथा सकळ काळीं " ॥

## वीररसाचा आविष्कार

कोमल प्रेमगीतांची सनई वाजविण्यांत तांबे जितके सराईत होते, तितकेच आव्हान देणारीं, स्फुरण चढविणारीं, चैतन्य संचरविणारीं रणगीतें रचण्यांतहि ते चतुर होते. केशवसुतांची 'तुतारी' किंवा गोविंदाग्रजांचा 'दसरा' यांच्याइतकेंच आवेशपूर्ण व स्फूर्तिदायक 'रुद्रास आवाहन' हें तांबे यांचें काव्य आहे. वीररसाला साजेसा शब्द–शस्त्रांचा संभार त्यांच्या या कवितेनें धारण केला आहे. ऐरणीवरील तापल्या लोखंडावर घणाचे घाव बसले असतांना जशा अग्नीच्या ठिणग्या उडतात, तसे त्यांचे या कवितेंतील रसरशीत शब्द उचंबळत आहेत. १९२० सालीं सर्व राष्ट्रानें रौद्र रूप धारण केलें असतां कवीहि रुद्रास आपल्या कवितेच्या द्वारें पाचारण करतांना म्हणतो, "डुमडुमत डमरु ये, खणखणत शूल ये, शंख फुंकीत ये येइ रुद्रा ! प्रलयघनभैरवा, करित कर्कश रवा क्रूर विक्राळ घे क्रुद्ध मुद्रा ! ॥ कडकडा फोड नभ, उडव उडुमक्षिका । खडबडवि दिग्गजां तुडव रविमालिका । माण्ड वादळ, उधळ गिरि जशी मृत्तिका–खवळवी चहूकडे या समुद्रां ! पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथी, । ओढ हत्तीवरूनि मत्त नृप खालती, । मुकुट रंकास दे, करटि भूपाप्रती–झाड खट्‌खट तुझे खड्ग क्षुद्रां "॥ तसेंच 'घाबरूं नको बावरूं नको' या कवितेंत त्रस्त जनतेला धीर देतांना कवि म्हणतो, " जरी दिशांचे तट ढासळती, । नभ–सौधाचे स्तंभ कडाडति, । हंड्याझुंबर तडतड पडती । तरि हे वीरा, डगमगूं नको ! निर्वाणीचे काढ सुदर्शन । तळघरांत जे ठेलें लपवून । मार नेम रे अचूक रोखून । तूं जयश्रीस अंतरूं नको ॥ "

## शाश्वत तत्त्वांचा उद्गार

या राष्ट्रीय आंदोलनाच्या काळांत तांबे यांनीं ज्या कविता रचल्या, त्यांतील बहुतेकामध्यें निर्भयतेचा व प्रतिकाराचा संदेश, प्रगटपणें वा पर्या-

यानें, दिलेला आढळतो. त्यांतील तत्त्वे शाश्वत तर खरेंच, पण त्या वेळेस तें अत्यंत समयोचितहि होतें. एका कवितेंत ते म्हणतात, " जन पळभर म्हणतिल ' हाय हाय ! ' मी जातां राहिल कार्य काय ? । सूर्य तळपतिल, चंद्र झळकतिल । तारे अपुला क्रम आचरितिल । असेच वारे पुढें वाहतिल, । होईल कांही अंतराय ? । सखे-सोयरे डोळे पुसतिल । पुन्हा आपल्या कामीं लागतिल । उठतिल, बसतिल, हसुनि खिदळतिल,-। मी जातां त्यांचें काय जाय ? । रामकृष्णही आले, गेले । त्यांविण जग का ओसचि पडलें ? । कुणी सदोदित सुतक धरिलें ? । मग काय अटकलें मजशिवाय ? ।

याच तत्त्वाचा पुरस्कार करणारी त्यांची एक कविता लोकप्रिय व चिरंजीव झाली आहे. ती म्हणजे—" मरणांत खरोखर जग जगतें; । अधिं मरण, अमरपण ये मग तें । सर्वस्वाचें दान अधी करि । सर्वस्वच ये स्वयें तुझ्या घरिं । सर्वस्वाचा यज्ञ करीं तरि । रे ! स्वयें सैल बन्धन पडतें । सीता सति यज्ञीं दे निजबळि । उजळुनि ये सोन्याची पुतळी, । बळी देउनी बळी हो बळी । यशेंच पुढें पाऊल पडतें । "

## भक्ताची आळवणी

मातेप्रमाणेंच राष्ट्रमातेचें आणि राष्ट्रमातेप्रमाणेंच जगन्मातेचेंहि प्रेम तांबे यांच्या अंतःकरणांतून वहात असे. एका कवितेंत ते परमेश्वराच्या वात्सल्याचें वर्णन करतात, तें असें–"निजल्या तान्ह्यावरी माउली दृष्टि सारखी धरी । तिचा कलीज़ा पदरीं निजला । जिवापलीकडे जपे त्याजला । कुरवाळुनि चिमण्या राजाला चुम्बी वरचेवरी ॥ अशीच असशी त्रिभुवनजननी, । बघत झोपल्या मज का वरुनी ? सुखदुःखांचीं स्वप्नें बघुनी कौतुकशी का खरी ?"

त्रिभुवनजननीची करुणा भाकतांना पन्नाशी उलटलेले तांबे म्हणतात, " चरण कधीं का पाहिन आई ? त्रिभुवनजननी मुंगीची तुज काळजि, मग का माझी नाहीं ? ढळे ऊन, दिन उरला थोडा । मागमूसही घरचा नाहीं. थकले घोडे पाय न टाकी, कशि गत होइल आज अगाई ? "

' सर्व कांहीं ईश्वरानें भरलेलें आहे. ' त्याला कोणीं, काय अर्पण करावें ? तसें अर्पण करणें हा एक प्रकारचा उद्धटपणांच होईल, अशी भक्तिपूर्ण, विनम्र, निरहंकारी भावना तांबे यांनीं ' अनंत-स्तोत्र ' या कवितेंत व्यक्त केली आहे, ती अशी-मदीं त्या तुझें रूप गाऊं धजें, । स्वयंदीपका दीप दावूं सजें; । न द्यावा जिथें पाय तेथें दिला, । बहू लाजलों भान येतां मला. । " तरी पण कवीला एक वस्तु परमेश्वरास अर्पण करण्याजोगी आढळली. तेव्हां तो म्हणतो, "हरि, अर्पावें काय तुला मीं ?। धूप, दीप, जळ, फूल फळ तुझें कसें तुलाच वहावें ? । मीपण मम मी म्हणें तेंच मी अतां अर्पितों भावें. "

## अवीट गोडीचा मध

साठीच्या घरांत तांबे जाऊन पोहचले. त्यांच्या अंतःकरणांतील प्रतिभेचें मोहोळ सुकून गेलें. अशा स्थितींत १९३३ सालीं एका पुणेरी रसिकानें तांबे यांना लिहिलें कीं, एक रसाळ कविता लिहून पाठवा. तेव्हां उत्तरादाखल तांबे यांनीं रिकामे मधुघट' ही चार कडव्यांची कविता पाठविली. ' आता कविता रचतां येत नाहींत ' असें निवेदन करणारी ही कविताच एक करुणरम्य असें हृदयंगम काव्य झालें आहे. त्यांत त्यांच्या साऱ्या जीवनाचें कार्य जसें सामावलें आहे, तसेंच मृत्यूच्या छायेचेंहि स्वरूप रेखाटलेंलें आहे. दोन्ही अवस्था सारख्याच ललित व भावनापूर्ण शब्दांनीं त्यांनीं रंगविलेल्या आहेत. तांबे यांच्या काव्य-घटांतील मधाची गोडी अवीट व अक्षय्य आहे. त्यांच्या काव्य-मंदिरावरील हा सुवर्ण-कळस समग्रच पुढें देतों:—

" मधु मागशि माझ्या सख्या परी । मधुघटचि रिकामे पडति घरीं ! आजवरी कमळाच्या द्रोणीं । मधू पाजिला तुला भरोनी । सेवा ही पूर्वींची स्मरोनी । करि रोष न सखया, दया करीं ॥ नैवेद्याची एकच वाटी । अता दुधाची माझ्या गांठीं । देवपूजेस्तव ही कोरांटी । बाळगी अंगणीं कशी-तरी ॥ तरुण-तरुणींचीं सलज्ज कुजबुज । वृक्षझऱ्यांचें गूढ मधुर

गुज । संसाराचें मर्म इवें तुज, । मधु पिळण्या परि हें बळ न करीं । ढळला रे ढळला दिन सखया ? । सन्ध्याछांया भिवविति हृदया । अतां मधूचें नांव कासया ? । लागले नेत्र रे पैलतिरीं ॥ ”

## अभ्यासाच्या वाटा

( १ ) तांबे यांची कविता महाबळेश्वरासारखी आहे, या उपमेंतील अर्थ स्पष्ट करा. तांबे हे जातिवंत कवि होते असें कां म्हटलें आहे.

( २ ) नाट्यगीत म्हणजे काय ? तांब्यांच्या नाट्यगीतांपैकीं कांहीं सुंदर गीतांचीं नांवें लिहा.

( ३ ) ‘ तांबे यांच्या काव्यसृष्टींत रणवाद्यें आहेत, तशींच लग्नवाद्यें आहेत आणि देवळाच्या गोपुरांतील सनईहि वाजत आहे, ’ स्पष्टीकरण करा.

( ४ ) ‘तांब्यांनीं रंगविलेलीं सुंदर निसर्ग-चित्रें’ या विषयावर एक लहानसा निबंध लिहा.

( ५ ) राष्ट्रप्रेमानें भरलेल्या अशा तांब्यांच्या कवितांतील तुम्हांला कोणत्या आवडतात ? त्यांतील मध्यवर्ती कल्पना लिहा.

( ६ ) तांबे यांच्या काव्याचीं वैशिष्ट्यें कोणतीं ?

( ७ ) रुद्रास आवाहन, भयचकित नमावें तुज रमणी, कुस्करूं नका हीं सुमनें, घनतमीं शुक्र बघ राज्य करी, या कविता मुळांत वाचा व त्यांतील कल्पना स्पष्ट करा.

'निसर्ग' हा इतर कवींच्या वर्णनाचा एक विषय असतो-पण अनेकापैकीं एक; 'बालकवीं'च्या बाबतींत मात्र तो एकच एक विषय होता. त्यांची बहुतेक सर्वच कविता या एकमेव विषयाला वाहिलेली आहे. फार काय, बालकवींच्या काव्यांतून साकार झाला तो विषय म्हणजे निसर्ग आणि निसर्गानें वाङ्मयीन अवतार घेतला तो म्हणजे बाल-कवि असें म्हटलें तरी चालेल. ते निसर्ग पहात होते, नव्हे जगत होते. निसर्गाशीं बोलण्यांत, त्याची मैत्री जोडण्यांत, त्याच्याशीं एकजीव होण्यांत, त्यांचें सारें आयुष्य समाप्त झालें. त्यांच्या लेखणीवाटें जणुं निसर्गच अवतरत असे-आणि त्याचें नांव काव्य!



## सौंदर्याचे पूजक

कवि कोण? जो प्रौढवयांतहि आपली बाल्यवृत्ति कायम ठेवतो तो! "प्रौढत्वीं निज शैशवासि जपणें बाणा कवीचा असे" अशी खूण केशवसुतांनीं सांगून ठेवली आहे. त्या कसोटीस बाल-कवीइतके दुसरें कोणीच उतरत नाहीं. त्यांची ती लडिवाळ भाषा, त्यांच्या त्या स्वच्छंदी

कल्पना आणि त्यांचा तो सृष्टिमातेशीं प्रेमळपणा यावरून बाल–कवि हे वृत्तीनें आमरण बालच राहिले होते हें उघड दिसतें. आजूबाजूला राजकीय आंदोलनाचे झंझावात सुटलेले असोत कीं सामाजिक क्रांतीचे वणवे पेटलेले असोत, बाल–कवींचें मन निसर्ग–प्रेमांतच गुंग ! त्याची महत्त्वाकांक्षा कोणती ? " सुमकोशीं आपोआप । क्षण घ्यावी साखर-झोप " फुलांच्या पुड्यांत फुलपांखराप्रमाणें पहुडावें हेंच त्यांच्या जीवनाचें अंतिम साध्य. ती झोप संपल्यावर तुम्ही काय करणार ? असें कोणीं विचारलें, तर बाल–कवि लगेच सांगतात, " डोलताचि जागें व्हावें । हासतची गुंगत जावें । " डोलावें-बागडावें-गावें, अशी आनंदमय, स्वप्नमय, काव्यमय अभिलाषा बाल–कवींची होती. जगांत जें जें सुंदर असेल, त्याचे ते भोक्ते होते. म्हणून त्यांना सदैव वाटे, " सुंदरतेच्या सुमनांवरचें दंव चुंबुनि घ्यावें । चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावें । "

## खानदेशांतील त्रिमूर्ति

असें काव्यमय जीवन जगणारे बालकवि यांचें संपूर्ण नांव त्र्यंबक बापूजी ठोमरे. त्यांचा जन्म ता. १३ ऑगस्ट १८९० रोजीं खानदेशांतील धरणगांव येथें झाला. केशवसुत, विनायक व बालकवि ही आधुनिक काव्य–त्रिमूर्ति कान्हदेशाच्या कुशींतूनच जन्मली. बालकवींचे वडील फौजदार होते. त्यांच्या नोकरीच्या बदलीमुळें बालकवींचें बालपण खान-देशच्या अनेक खेड्यांत गेलें. त्यामुळें निसर्गाचे ठसे त्यांच्या कोमल मनावर उमटले. त्यांना दोन भाऊ व दोन बहिणी होत्या. पैकीं ज्येष्ठ बहीण जिजी यांनीं त्यांना काव्याची गोडी लावली, त्यांचेकडून संत–वाङ्मय वाचून घेतलें आणि त्यांनीं कविता केल्यावर त्यांना प्रोत्साहन दिलें. बालकवींनीं पहिली कविता लिहिली ती वयाचे दहावे वर्षीं–एका लग्नाच्या गडबडींत–तीहि निसर्ग–वर्णनपरच आहे. त्यांनीं लहानपणींच मोरोपंतांचें समग्र आर्याभारत वाचलें होतें. त्याचें अनुकरण करून त्यांनीं कांहीं आर्याहि रचल्या. फुलांचें वेड त्यांना लहानपणापासून असे. तसेंच ओढ्याच्या कांठीं तासन्‌तास ते बसत व सृष्टि-सौंदर्याचें आकंठपान करीत.

पहाटे उठून ते बागेंत जात, कळ्याफुलें निरखीत, तन्मय होत व क्षितिजा-वरील अरुणोदयाची शोभा चित्तांत सांठवीत.

## कीर्तीचें कोंदण

एरंडोल येथें बालकवींचें मराठी शिक्षण झालें व धुळे येथें इंग्रजी शिक्षण सुरू झालें. वयाचे सोळावे वर्षी एका राष्ट्रीय शाळेंत शिक्षकाचेंहि काम त्यांनीं केलें. एका 'वनवासी' कीर्तनकाराबरोबर दोन महिने राहून त्यांनीं उज्जयिनीपर्यंत प्रवास केला. निसर्गाचा सहवास व देशाचा प्रवास यामुळें त्यांचें कवि-मन पुष्ट होत गेलें. १९०२ पासून ते प्रासंगिक काव्यें रचूं लागले. बाल-कवींच्या काव्य-प्रभेला कीर्तीचें कोंदण लवकर लाभलें. त्यांच्या वयाच्या १७ वे वर्षीं, १९०७ सालीं, जळगांव येथें 'पहिलें महाराष्ट्र कविसंमेलन' भरलें. त्यांत हा सडपातळ अंगाचा पण तेजस्वी डोळ्यांचा मुलगा उभा राहिला व 'अल्पमती मी बालक, नेणें काव्य-शास्त्र व्युत्पत्ति । कविवर्यांनो, मदिय बोबडे बोल धरा परि चित्तीं' असें समय स्फूर्त पद्य म्हटलें अध्यक्षांनीं त्यांना 'बाल-कवि' ही पदवी दिली आणि एक पागोटें व जरीकाठी उपरणें देऊन त्यांचा गौरव केला.

१९०९ सालीं बडोदें येथें साहित्य संमेलन भरलें असतां, तेथें बाल-कवि स्वयंसेवक होते. त्यांनीं आपल्या कविता रे. टिळक, श्री. तात्यासाहेब कोल्हटकर, श्री. तात्यासाहेब केळकर इत्यादि प्रतिष्ठित साहित्यिकांना वाचून दाखविल्या, त्या ऐकून सर्वांची मर्जी त्यांचेवर बसली–टिळकांची तर विशेषच. त्यांनीं त्यांना नगर येथें आपल्या घरीं नेलें, कारण त्यावेळीं बालकवींची प्रकृति खालावलेली होती. टिळकांचें घर म्हणजे काव्याचें माहेरघर. तेथें बालकवींची कविता चोहोअंगांनीं बहरली. तेथें त्यांना चाळीस दिवसांचा विषमज्वर झाला असतांना लक्ष्मीबाई टिळकांनीं आईप्रमाणें त्यांची सेवाशुश्रूषा केली. सुमारें दोन वर्षें तेथें काढल्यावर, १९११ सालीं बालकवि पुण्यास गेले, साहित्य-सम्राट केळकरांनीं त्यांना 'केसरी'चे सहसंपादक नेमले. ता. १३ जानेवारी १९१२ च्या 'केसरी'त बालकवींनीं 'अर्वाचीन कवि' हा लेख लिहिला. त्या

नोकरीचा राजीनामा देऊन बालकवि नगर येथें परत गेले व मिशन हायस्कुलांत शिक्षक म्हणून काम करूं लागले. तेथें वीस रुपये पगारांत त्यांनीं आपलें स्वतंत्र बिऱ्हाड थाटलें.

## अपघातानें अकाल-निधन

मिशनऱ्यांना मराठी शिकविण्याच्या निमित्तानें दरवर्षी ते उन्हाळ्यांत महाबळेश्वरास जात. तेथील पर्वतराजि व वृक्षराजि यांच्याकडे पहात-पहातच व मित्रमैत्रिणींच्या गप्पागोष्टींत रंगतरंगतच त्यांनीं ' निर्झर ' रचला व ' संध्या-रंजनी ' रंगविली. ' निर्झरासारखी कविता मला ज्यावेळीं करतां येईल तेव्हांच मी खरा कवि होईन ' असें गोविंदाग्रज म्हणत. त्यांच्या मैत्रीचा लाभ बालकवींना १९१४ पासून झाला. त्या वर्षीं ते पुनः पुण्यास गेले. या वेळच्या वियोगास उद्देशूनच रे. टिळकांनीं ' पांखरा, येशिल कधि परतून ? ' ही वात्सल्यानें ओथंबलेली कविता रचली. १९१६ मध्यें बालकवि पुनः पुण्याहून नगरास परत गेले व शिक्षकी करूं लागले. १९१८ सालीं ता. ३० एप्रिल रोजीं ते जळगांव येथें भाचीच्या लग्नासाठीं चालले होते. चैत्र शुद्ध नवमीचा दिवस ! भादली स्टेशनावर रेल्वेचे रूळ ओलांडतांना त्यांच्या अंगावरून मालगाडी गेली व एका काव्यमय जीवनाची समाप्ति झाली. ' स्वप्नांतच व्हावा अंत ' ही त्यांची दारुण मनीषा अशी पुरी झाली ! ' येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा । जो करिल तुझ्यासह अन्त तुझ्या गीताचा । ' हें त्यांनीं ' पांखरास ' उद्देशून केलेलें भीषण भवितव्य खुद्द त्यांच्याच बाबतींत खरें ठरलें, हें मराठी भाषेचें दुर्दैव !

## निराशेची मीमांसा

प्रकृतीचा आजार, आर्थिक ओढाताण, त्यामुळें स्थित्यंतरें- इत्यादि खडतर अनुभवांनीं बालकवींच्या हृदयाचे 'कोळसे' झाले होते, 'तूर्त जिवंतपणींच मी मरण अनुभवीत आहें' असे तीव्र निराशेचे उद्गार त्यांनीं एका पत्रांत काढले आहेत. बहुधा सर्वांच्या वाट्यास येतात, तींच सुखदुःखें कवीच्या

नशिबीं येतात, पण त्याचें मन संवेदनक्षम व हळूवार असल्यानें त्या सुखदुःखांचे स्वरूप त्यांना विराट व विक्राळ भासतें. सराफाच्या तरल ताजव्यांत केशरी काडी पडली, तरी केवढी हालचाल होते ! बाल–कवींचें मन सौंदर्याला आसुसलेलें व प्रेमाला भुकेलेलें ! त्याला रुक्ष व्यवहाराचे कांटे-कुटे व दगडधोंडे पाहून या जगाचाच वीट येणें साहजिक होतें. आत्महत्या करण्यापर्यंतहि त्यांच्या निराशेची धाव जाई.

## प्रेम, सौंदर्य व आनंद

बाल–कवींचें काव्य बहुधा एकाच रसानें भरलेलें आहे–आणि तो रस म्हणजे प्रेम. त्यांच्या काव्यांतून एकच सूर ऐकूं येतो–आणि तो म्हणजे निसर्ग–वर्णनाचा. त्यांच्या काव्याचा संदेश एकच–आणि तो म्हणजे "आनंदीआनंद गडे." त्यांची काव्य–सृष्टि एकरंगी आहे. त्यांचा "अरुण" अवलोका, "अष्टदिशांचा गोफ" पहा, 'फुलराणी' न्याहाळा, 'निर्झरास' निरखा, "तारकांचें गाणें" ऐका,—सर्वत्र सौंदर्य, प्रेम, आनंद यांचेच सुवर्ण–कण उधळलेले आढळतील. क्वचित् कोठें 'धर्मवीरां'सारखी वीररसाची ललकारी, तर क्वचित् 'निराशे'सारखी करुण तान कानावर येईल. पण तो अपवादच. तो त्यांचा नित्यधर्म नव्हे. त्यांचा स्वभावधर्म म्हणजे 'गिरिशिखरें वनमालाही' यांत रमणें हाच. 'सृष्टि मला हासविते, स्वर्गसौख्य दाखविते' या काव्यानंदांत ते सदैव गुंग असत. त्या तंद्रींत डोलत असतांना जे सहज उद्गार त्यांच्या मुखावाटें बाहेर पडत, ते म्हणजेच त्यांचें काव्य—भांडार. त्यांच्या एका कवितेसंबंधीं डॉ. माधवराव पटवर्धनहि एका चिकित्सक लेखांत असा गौरवपूर्ण अभिप्राय देतात कीं, "फुलराणी ही नितांतसुंदर कविता अथपासून इतिपर्यंत अवतरणीय व संस्मरणीय आहे." त्यांच्या सर्वच कवनांतील मार्दव व माधुर्य केवळ अप्रतिम आहे. डॉ. पटवर्धन अशीहि कबुली देतात कीं, "केशवसुतांच्या प्रतिभेचें रत्न अधिक मोठें व विविध-रंगी असेल, पण बालकवि या हिरकणीचें पाणी कांहीं और आहे." सृष्टिवर्णनाचा एकच रंग बालकवीच्या सर्व काव्यावर चमकत आहे खरा,

पण त्याची चमक इतकी अलौकिक आहे कीं, तिची सर दुसऱ्या कोण-त्याहि आधुनिक मराठी कवीला येत नाहीं.

## कवीचा स्वभावधर्म

‘ मुलाचे पाय पाळण्यांत ’ दिसतात असें म्हणतात, त्याप्रमाणें बाल-कवींची ‘ अगदीं पहिली कविता ’ ‘ वन–मुकुंद ’ ही आहे. तींत आरंभीं वनांतील वृक्ष–वेलींचें वर्णन असून पुढें मुकुंदाच्या मुरलीचें रूपक रचलें आहे. या पहिल्या कवितेंतहि किती नाजूक पदलालित्य आहे, पहा. “अशा वनीं मीं ऐकिली मुरली । तिला ऐकूनि वृत्ति निमाली । काय कथूं त्या सुस्वर नादा । पुढें पाहिलें रम्य मुकुंदा ॥ ”

‘ शारदेस ’ वंदन करतांना कवि आपली भूमिका तिजपुढें पुढील शब्दांनीं मांडतो. ‘ निर्झरमय काननमय, गायनमय दिव्य जाहला देह. ’ कवीला शारदा कशी, कोठें दिसते ? तर रविकिरणीं भासतसें कीं निर्झर–तांडवांत नाचतसें । पुष्पांवर हांसतसें रूप तुझें क्षणिक मानवांस दिसे. ”

## निसर्गाचा प्रभाव

जग अपूर्ण आहे, दुःखमय आहे याचा खेद करतां करतां कवीला त्या अपूर्णांतच सुख वाटूं लागलें. अपूर्ण जगाला पूर्ण करण्यांचे कर्तृत्वशाली ध्येय त्यांनीं ‘ दोष व प्रीति ’ या कवितेंत रंगविलें आहे तें असें, ‘ गड्या पूर्णा ! मज आस तुझी नाहीं. । सख्या न्यूना ! ये मार मिठी देही ! प्रीति, माझ्या हृदयांत करी वास न्यूनतेला पूर्णत्व द्यावयास ! ”

साऱ्या दुःखावर रामबाण रसायन कविजवळ आहे ते म्हणजें निसर्गाचें सान्निध्य. ‘ कवीची इच्छा ’ त्यांनीं अशी सांगितली आहे. सुमकोषीं आपोआप । क्षण घ्यावी सांखर झोंप । डोलतची जागें व्हावें । हांसतची गुंगत जावें, सत्याचें स्वप्न पहावें । सत्यानें स्वप्नें घ्यावें स्वप्नींही स्वप्नें बघत । स्वप्नांतच व्हावा अंत । निसर्गात तल्लीन होऊन आनंद कसा लुटावा याचा मार्ग दाखवितांना कवि ‘ कवीची इच्छा ’ या कवितेंत म्हणतो. तुला बघावें गुंगावें । गुंगतची चुंबुनि घ्यावें गुंगतची होउनि जावें । स्वदाधीन जीवें भावें ! गुं गुं गुं गुं जोंवरती । जडतेची पडते

भांती तरलित हो हृदयज्योती । दिव्य सूर श्रवणी येती. मुग्धमधुर हांस्यावरले । बिंदुकिरण कलिकेमधले, । हृदयतार हालविणारे । मनस्ताप मालविणारे मनोवृत्ति कालविणारे । अंधकार घालविणारे दिव्य तरंगीं तरणारे । गोड गोड गुंफित सारे.

आपल्या मधुर काव्यांच्या पुरांत जगांतील निराशा बुडवून टाकूं, अशी हिंमतहि कवीच्या अंगीं पुढें पुढें स्फुरण पावूं लागली. ‘ अतृप्ति ’ या कवितेंत तो अशी प्रतिज्ञा करतो, “ पाव्याच्या गोड सुरांत । बुडवून जगाला देऊं । स्वानंद सुखद राज्यांत । संत्रस्त जिवाला नेऊं । या अपूर्ण जगतासंगें । मन तृति कधींहि न पावे मग मंजु गायनासगें । बा, कां न उडुनि तें जावें ? ” तसेंच. तो म्हणतो “ दुष्ट मत्सरी जगतापरतें । प्रेमाचें साम्राज्य सभोंतें । बनवुनि राहुं ॥ ”

## गुप्त सौंदर्याचे उघडे खजिने

स्वतः बालकवि सृष्टीचे गायक होते–निसर्गाचे पूजक होते. विश्वांतील वस्तुवस्तूंत जें सौंदर्य लपलेलें आहे तें ते शोधून काढीत व इतरांना दाखवीत. त्यांचीं सारीं निसर्ग गीतें म्हणजे अशा गुप्त सौंदर्याचे उघडे खजिने होत. ‘ अरुण ’ हा त्या निसर्ग–गीतांचा राजा. अचेतन वस्तूंवर मानवी धर्मांचे आरोप करून सृष्टिदेवतेचें वर्णन बालकवींनीं सुंदर शब्दांनीं व मधुर कल्पनांनीं केलें आहे. तें असें–“पूर्व दिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं, । हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं ॥ हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिवळे कांहीं—रम्य मेत्र हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं. ॥ ”

अरुणोदयाचे वेळीं पूर्वेकडील आकाशावर लालिमा पसरलेला असतो. त्यावर बालकवींनीं पुढील मनोहर उत्प्रेक्षा लडिवाळ भाषेंत केल्या आहेत– “अरुण चितारी, नभःपटाला रंगवितो काय, । प्रतिभापूरित करी जगाला कीं हा कविराय ? । कीं, नव युवती उषासुंदरी दारीं येवोनी । रंगवल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनीं ? ॥ किंवा ‘ माझी चोरुनि नेली मोत्यांची माला ’ । म्हणुनि नभःश्री रुसली, आली लाली गालाला ? । प्रगट जाहलें श्रीरामाचें पुष्पक किंवा हें ?। कीं, सोन्याची पुरी द्वारका लखलखते आहे? ”

पुढें सूर्योदय होऊन पांढरा शुभ्र प्रकाश सर्वत्र पसरला, तेव्हांचें वर्णन

बालकवींनें सुकुमार शब्दांत केले आहे. "परस्परांना दिशा म्हणाल्या प्रेमळ वचनांनीं "विरह-काल संपला गा गडे प्रेमाचीं गाणीं। या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण? तिला बोलवा-पुरे गडे ग। हा तुमचा मान!"

## मानवी भावनांचा आरोप

दिवसाच्या प्रारंभींची संध्या रंगविणाऱ्या बालकवींनीं दिवसाच्या समाप्तीनंतरची संध्याहि तितक्याच लाडिक शब्दांनीं, कोमल कल्पनांनीं व नादमधुर रचनेनें 'संध्यारजनी' या काव्यांत रंगविली आहे. सूर्य दृष्टीआड झाला तरी पश्चिम दिशेच्या गालावर प्रेमाची लाली कायम आहे हें पाहून "थक्क होउनी दिशा म्हणाल्या 'काय मोहिनी ही। प्रेम-समाधी अजुनि खुळीची या उतरत नाहीं!"

संध्याकाळीं आकाशांत एक एक तारका हळुहळु उगवतांना दिसते. त्या त्यांच्या दर्शनाचें वर्णन कवीनें किती कौशल्यानें केलें आहे तें पहा— "संध्येच्या खिडकींत येउनी ही हंसरी तारा। हळूंच पाहते खुणाविते ही 'या-या' कोणाला?॥ पलिकडचा तो तेजोमय नव पडदा सारून। बघते, हंसते, क्षणांत लपते, ही दुसरी कोण?॥"

एक-दोन करतां करतां लाखो तारकांनीं आकाश भरून गेलें. त्या तारकांवर एकामागून एक उत्प्रेक्षांचे अलंकार कवि कसे चढवित आहे तें पहा—"आली होती भरती, आतां अस्त समुद्राला,। त्या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला?। कल्पतरूचीं फुलें उडालीं कीं वाऱ्यावरती! आकाशींच्या गंगेला कीं बुदबुद हे येती?। नव टिकल्यांची चंद्रकळा कीं गगनश्री नेसे?। स्वर्गीचें भांडार उघडलें कीं रात्रासरसे?। विश्वाशिखरावर टोप चढविला हिऱ्या-माणकांचा! मंगल मंगल जिकडेतिकडे जय मांगल्याचा!"

## प्रतिभेचा बहर

साधें हिरवें गवत! त्यांत उगवलेली एक बारीक कळी! तिचें लग्न ठरलें सूर्य-किरणांशीं. तेव्हां तिचा भाऊ-वारा-संध्याकाळीं तिची थट्टा

अनुक्रम २९८५३

करूं लागला. रात्रीं तिला प्रीतिचीं स्वप्नें पडलीं आणि प्रातःकालीं तिचें लग्न रविकिरणांशीं झालें. साराच स्वच्छंद कल्पनेचा मधुर खेळ ! तो खेळ बालकवि यशस्वीपणें खेळले आहेत. गेय चाल, सुगम शब्द, शब्दांची पुनरुक्ति, त्यांचें नादमाधुर्य, अनुप्रासादि अलंकार, रेखीव सृष्टीवर्णनें, तल्लीनतेची भावना आणि या सर्वांतून प्रेमाचा व मांगल्याचा ओतप्रोत भरलेला संदेश !—हे बालकवींचे सारे गुण या एका कवितेंत एकवटलेले दिसतात. त्यांच्या रम्य प्रतिभेचा हा तळपता तुरा होय. एकदां वाचली कीं ती पाठ व्हावी आणि पाठ झाली कीं सदैव गुणगुणत रहावी अशी ती गोड, रसाळ, हंसरी कविता आहे. तिचे कांहीं कण पुढें दिले आहेत. "हिरवे हिरवे गार गालिचे–हरित् तृणाच्या मखमालीचे–त्या सुंदर मखमालीवरतीं फुलराणी ही खेळत होती ! आईच्या मांडीवर बसुनी–झोके घ्यावे, गावीं गाणीं; । याहुनि ठावें काय तियेला–साध्याभोळ्या फुलराणीला ? पुरा विनोदी संध्यावात। डोल डोलवी हिरवें शेत; तोच एकदां हांसत आला–चुंबून म्हणे फुलराणीला॥" फुलराणीचें लग्न ठरलें ! मंडप घातला, वऱ्हाडी जमले. त्यांचें वर्णन—"तेजोमय नव मंडप केला,–लख्ख पांढरा दहा दिशांला, जिकडे तिकडे उधळित मोतीं–दिव्य वऱ्हाडी गगनीं येती। लाल सुवर्णी झगे घालुनी–हांसत हांसत आले कोणी; कुणी बांधिला गुलाबि फेटा–झगमगणारा सुंदर मोठा, आकाशीं चंडोल चालला। हा वाङ्‌निश्चय करावयाला; हें थाटाचें लग्न कुणाचें? साध्या भोळ्या फुलराणीचें"

आणि लग्नांत मंजुळ वाद्यें नकोत कां? तीं कोण आणणार ? अर्थात सृष्टि–देवताच. कोण कोणतें वाद्य वाजवितो तें ऐका. "गाउं लागले मंगलपाठ–सृष्टीचे गाणारे भाट। वाजवि सनई मारुतराणा–कोकिळ घे तानांवर ताना। नाचुं लागले भारद्वाज–वाजविती निर्झर पखवाज। नवरदेव सोनेरी रविकर–नवरी ही फुलराणी सुंदर। लग्न लागतें। सावध सारे। सावध पक्षी, सावध वारे। दवमय हा अंतःपट फिटला–भेटे रविकर फुलराणीला ॥"

## सृष्टिसौंदर्याचीं नाना रूपें

या झाडावरून त्या झाडांवर उड्या मारणारा पक्षी ! बालकवींनीं केवळ

आपल्या शब्दांच्या साहाय्यानें तो ' अष्टदिशांचा गोफ ' या कवितेमध्यें वाचकांच्या डोळ्यापुढें उभा केला आहे.

" बाल विहग आनंद मूर्तिमान् झुलतो गगनांत । क्षणभर येथें क्षणभर तेथें, भिंगोरी साची ॥ गिरिशिखराचें गोल फूल हें सांध्य तरंगांनीं । झुलुनि त्यांतला पराग कीं हा भरभरतों गगनीं ? ॥ सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें । चैतन्याच्या गोड कोंवळ्या उन्हांत हिंडावें ॥ " शेवटच्या या दोन ओळींत बालकवींचें सारें जीवन-ध्येय किती सुंदरपणें व्यक्त झालें आहे !

अंगणांतील बालिका, तशाच आकाशांतील तारका. त्या ' तारकांचें गाणें ' गातांना बालकवि म्हणतात, " कुणि नाहीं ग कुणि नाहीं । आम्हांला पाहत बाई । शांति दाटली चोंहिकडे । या ग आतां पुढें पुढें । लाजत लाजत । हळूंच हांसत । खेळ गडे खेळूं कांहीं । कोणीहि पाहत नाहीं. ॥ फेकुनि द्या इकडे तिकडे । थोडेसे दंवबिंदु गडे । या निर्मल अवकाशांत प्रेमाचें पेरूं शेत ॥ "

## सुरेख शब्द-चित्रें

' श्रावणमास ' हेंहि काव्य अतिशय मधुर व मनोहर आहे. त्यांतील शब्दांचें मार्दव व माधुर्य अप्रतिम आहे. पावसाच्या सरीप्रमाणें शब्दांच्या पंक्ति सफाईनें पडत आहेत. स्त्रियांचीं आणि पाखरांचीं, हरिणींची आणि गाईचीं, चाफ्याचीं आणि पारिजातकांचीं शब्दचित्रें तर कमालीचीं सुंदर आहेत. त्यांचे कांहीं नमुने—" श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोहिंकडे; क्षणांत येतें सरसर शिवरें, क्षणांत फिरुनी ऊन पडे । वरतीं बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे । मंगल तोरण काय बांधलें नभोमंडपीं कुणिं भासे । उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा । सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा । फडफड करूनी भिजले अपुले पंख पांखरें सांवरिती, सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निजबाळांसह बागडती ॥ देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत । वदनीं त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावण महिन्याचें गीत । "

## रंगांची शोभा

सृष्टींतील झाडें, वेली, फुलें, डोंगर, गवत इत्यादी वस्तूंच्या रंगांच्या छटाहि न्याहाळण्याइतकी बालकवींची दृष्टी सूक्ष्म आहे. 'पाऊस' या कवितेंत ते म्हणतात "कृष्ण कुणी काजळिच्या शिखरावाणी ! नील कुणी इन्द्रमण्याच्या कांतिहुनी ! गोकर्णी मिश्र जांभळे तसे कुणी; ॥ मधु मोतीं भूवरतीं भरभर ओती !" तसेंच मेघांचा कापूस' यामध्यें रंगाची शोभा वर्णितांना बालकवि लिहितात, "फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा वरुनि कुणी गुलजार फिरवला हात कुसुंब्याचा । त्यांतहि हंसली मंदपणें तीं चंद्रकला राणी । कडेकडेच्या मेघांवर ये मोत्यांचें पाणी । इंद्र निळाचा रंग बहरवी गिरिच्या अंगाला । मधुन जळाची शुभ्र शोभते ती मोहन-माला ॥"

## अलौकिक निसर्ग--गीत

आधींच बालकवींची चित्तवृत्ति आनंदी व निसर्गांत रमणारी. त्यांत ते महाबळेश्वराच्या उच्च स्थानीं, शीतल हवेंत, उंच उंच पर्वतराजि व हिरवी हिरवी वृक्षराजि पहात हिंडत होते. वर आकाशांत उगवत्या किंवा मावळत्या सूर्याचे पिवळे—तांबडे—जांभळेहि रंग निरखीत होते; तर खालीं खोल खोल दऱ्यांतून कधीं उड्या मारीत तर कधीं वळणें घेत, धावत नाचत जाणारे झरे आपल्या दृष्टींत साठवीत होते. आणि त्यांच्याबरोबर होतीं, त्यांच्याशीं समरस होणारीं दत्तोपंत व ताराबाई हीं टिळकांचीं मुलें. अशा या संजीवक वातावरणांत बालकवींना 'निर्झरास' हे अलौकिक काव्य स्फुरलें. त्यांत त्यांच्या सर्व काव्य-गुणांचें संमेलन झालेलें आढळतें. त्यामुळें हें एकंदर काव्य म्हणजे एक सुरेल संगीतच बनलेलें आहे. त्याचे कांहीं मासले पहा—"गिरिशिखरें वनमालाही । दरी दरी घुमवित येई ! कड्यावरुनि घेऊन उड्या । खेळ लतावलयीं फुगड्या । घे लोळण खडकावरती । फिर गरगर अंगाभवतीं, । जा हळुहळु वळसे घेत । लपत छपत हिरवाळींत । पाचूंचीं हिरवीं रानें । झुलव गडे, झुळुझुळु गानें ॥"

या सुंदर निसर्गावर श्रीकृष्णाचें रूपक चढवून कवि म्हणतो, "मुरली-

च्या काढित ताना । वृंदावनिं खेळे कान्हा; धुंद करुनि तो नादगुणें। जडताही हंसवी गानें । दिव्य तयाच्या वेणुपरी । तूंहि निर्झरा ! नवल परी– गाउनि हें झुळझुळु गान । विश्वाचें हरिसी भान । गोपि तुझ्या हिरव्या वेली । रास खेळती भंवताली । तुझ्या वेणुचा सूर तरी । चराचरावर राज्य करी ! ”

जगांत सत्याचा शोध शास्त्रज्ञ करतात आणि लपलेलें सौंदर्य कवि लोक हुडकून काढतात. शास्त्रीय सत्य हें दुपारच्या उन्हाप्रमाणें तेजस्वी पण रखरखीत असतें आणि काव्यांतील तत्त्व हें मध्यरात्रींच्या चांदण्याप्रमाणें मंद पण मधुर असतें. या दोघांचाहि हेतू मानव–समाजांतील प्रेमभाव व ऐक्यभाव वाढीस लावून साधुत्वाची स्थापना करणें हाच असतो. सत्य, शिव व मंगल या त्रिमूर्तीचें अद्वैत असतें. तें ज्याच्या काव्यांत जितक्या प्रमाणांत असेल तितक्या प्रमाणांत तो कवि श्रेष्ठ. सुंदर सजावटीनें व मधुर भाषेनें सत्य सिद्धांत वाचकांच्या गळीं उतरविण्याचें कार्य श्रेष्ठ कवि करीत असतात. अशा श्रेष्ठ कवींमध्यें स्थान पावणारे बाल–कवि हे एक होत.

## अभ्यासाच्या वाटा

(१) ‘ निसर्गानें वाङ्मयीन अवतार घेतला तो, म्हणजे बालकवि, ’ बालकवींच्या काव्याच्या आधारें या प्रश्नाचें उत्तर लिहा.

(२) बालकवींचें जीवनचरित्र थोडक्यांत लिहा. ‘ पांखरा, येशिल कधिं परतून ’ या कवितेचा बालकवींशीं कोणता संबंध आहे हें स्पष्ट करा.

(३) प्रेम, सौंदर्य, आनंद हीं बालकवींच्या काव्याचीं वैशिष्ट्यें; कवितांच्या आधारें या भावनांचें दिग्दर्शन करा.

(४) अष्टदिशांचा गोफ, अरुण, संध्यारजनी, निर्झरास या कवितांतील कल्पना स्पष्ट करा.

(५) ‘ फुलराणी ’ ही कविता मुळांत वाचा व त्या कवितेचें रसास्वादात्मक परीक्षण लिहा.

## बा. भ. बोरकर : : : ५

एक काळीसावळी बुटकी मूर्ति व्यासपीठावर उभी राहिली. तिच्या तोंडून आपल्या काव्याचे सकंप सूर बाहेर पडूं लागले. पण श्रोत्यांचा उत्साह उतूं चालला होता. 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा,' त्याप्रमाणें



साहित्य—संमेलनाबरोबर काव्य—गायनाचा कार्यक्रम होत असतो. तो ऐकण्यासाठीं जे लोक जमतात, त्यांचें लक्ष बहुधा गायनाकडेच जास्त; काव्याकडे कमी. एक जलसा, जत्रा किंवा गोंधळ असेंच स्वरूप बऱ्याच काव्य-गायनाच्या कार्यक्रमांना उच्छृंखल व उथळ श्रोतृवर्ग आणून देतो. बडोद्यासहि तसाच श्रोतृगण जमलेला होता. १९३४ सालीं तेथें 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' भरलें असतां रात्रींच्या वेळीं काव्य–गायनाचा ' समारंभ ' चालू झाला. हजारो स्त्री–पुरुषांनीं सभागृह ठेचून भरलें होतें. एकामागून एक जुने–नवे कवि व्यासपीठावर येऊन जनता–जनार्दनापुढें हजेरी देत होते. नव्या कवींना प्रायः अर्धवट काव्य म्हणूनच व्यासपीठ सोडण्यास श्रोतेमंडळी भाग पाडीत. अशा नव्या, अज्ञात कवि–जनापैकींच एकजण पुढें आला. त्याची बुटकी मूर्ति व्यासपीठावर दिसूं लागतांच श्रोत्यांनीं ओरडा सुरू केला. त्यानें आपल्या कवितेची गद्य प्रस्तावना सांगण्यास

सुरुवात केली. त्याचे कोंकणी उच्चार व सानुनासिक सूर यांचा विलक्षणपणाच श्रोत्यांच्या हुल्लडबाजीला पुरेसा होता. पण त्या उसळत्या उत्साहाच्या अनावर लाटा क्षणार्धांत थांबल्या. 'दिव्यत्वाची जेथ प्रतीती' इत्यादि उदात्त भाव त्यांचे मनांत शिरूं लागले. 'गाळुनिया भाळींचे मोती' यासारख्या मनोहर पद–लालित्यानें नटलेल्या पंक्ति श्रोतृवृंदाच्या कानांत शिरूं लागल्या, तसतसें त्यांच्या हृदयांतील वादळ शमत गेलें आणि मग 'शांतिशिरीं मन चंवऱ्या ढाळी' असा भास होत होत, काव्याच्या अखेरीस श्रोत्यांच्या भावना पुऱ्या जिंकल्या गेल्या. त्यांनीं गुण–ग्राहकतेनें टाळ्यांचा एकच कडकडाट केला व 'तेथें कर माझे जुळती' याचा साक्षात् अनुभव घेतला. नंतर 'मुशाफिर' ही कविताहि सारंगीप्रमाणें तेथें रंगली. कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर, मध्यरात्रहि उलटल्यावर, केवळ कविमंडळामध्यें, माधवराव पटवर्धन यांनीं निवडक काव्य–गायनाचा एक खास कार्यक्रम घडवून आणला, त्यांत या बुटक्या मूर्तीनें—बोरकरांनीं-आपल्या काव्याचा सारा पिसारा उलगडून दाखविला. त्याचें कौतुक सर्व कवींनीं मनोभावें केलें—माधनरावांनीं तर खूप उत्तेजन दिलें. जणूं या संमेलनांत हें नवें मोलाचें रत्नच आपल्या हातीं आलें अशा भावनेनें ते बोरकरांकडे अभिमानानें पहात होते. तेव्हांपासून बोरकरांच्या काव्याची कीर्ति कलेकलेनें एकसारखी वाढत आहे.

## क्रांतीच्या आंदोलनांत

बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचा जन्म गोमंतकांतील कुडचडे या गांवीं ता. ३० नोव्हेंबर १९१० रोजीं झाला. गोमंतक म्हणजे सृष्टि–सौंदर्याची खाण. तेथील राया, तेथील समुद्र व तेथील वन–सृष्टि यांवर बाळकृष्णाचें कवि–मन 'चरत होतें.' आपल्या जन्मग्रामीं बोरकर मराठी दोन यत्ता शिकले–तेवढेंच त्यांचें मराठीचें शिक्षण ! पुढें पोर्तुगीज व इंग्रजी या भाषांचा अभ्यास गोमंतकांतील परिस्थितीमुळें त्यांना करावा लागला. धारवाड येथें इंग्रजीच्या सात यत्ता तीन वर्षांत पुऱ्या करून ते १९२८ सालीं प्रवेश-परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर एक वर्ष

कर्नाटक कॉलेजांत त्यांनीं काढलें. पण शिक्षणाच्या पुढील पायऱ्या चढणें त्यांना गरिबीमुळें शक्य झालें नाहीं. ते सर्वांत वडील चिरंजीव. म्हणून त्यांचेवर संसाराची जबाबदारी. ती पार पाडण्यासाठीं पोर्तुगीज ट्रेनिंग कॉलेजचें प्रमाणपत्र मिळवून त्यांनीं १९३९ सालीं प्राध्यापकाचा पेशा पत्करला. खाजगी व सरकारी हायस्कुलांत शिक्षक म्हणून त्यांनीं सोळा वर्षे काढलीं. पण गोमंतकांतील स्वातंत्र्याचें आंदोलन सुरू होतांच त्यांचें मन अस्वस्थ झालें व त्यांनीं १९४६ सालीं राजिनामा दिला. त्यांनीं गोमंतकांतील राजकीय आंदोलनांत भाग घेतला. त्यामुळें तेथील सरकारनें त्यांना गोमंतकांत प्रवेश करण्यास बंदी केली. तरी भारतांत राहून ते ‘ आमचा गोमंतक ’ नांवाचें वृत्तपत्र चालवून गोमंतकीय आंदोलनास कुमक पुरवीत होते. मुंबईत चाललेल्या गोमंतक-स्वातंत्र्याच्या चळवळीसहि ते हातभार लावीत होते. सध्यां त्यांनीं रामायणाच्या धर्तीवर ‘महात्मायन’ नांवाचें महाकाव्य ओव्यामध्यें रचण्यास प्रारंभ केला आहे व पुणें येथें वास्तव्य केलें आहे.

## संत-वाङ्मयाचे संस्कार

आतांपर्यंत त्यांचे चार काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्याशिवाय ‘ मावळता चंद्र,’ ‘ भावीण ’ वगैरे कादंबऱ्या, ‘ कागदी होड्या ’सारखे लघुनिबंध आणि कांहीं अनुवादित पुस्तकेंहि त्यांनीं महाराष्ट्रीय रसिकांना सादर केलीं आहेत. लहानपणापासून त्यांच्या भावनेवर संत वाङ्मयाचे संस्कार झाले आहेत. त्यांत ज्ञानेश्वरीचा तर विलक्षण प्रभाव पडलेला आहे. स्वामी रामतीर्थ व विवेकानद, टॉलस्टॉय व टागोर प्रभृति आधुनिक ऋषि-मुनींच्या उदात्त भावाची छाप त्यांचे मनावर पडली. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत प्रवास करून त्यांनीं अनुभवाचें धन विपुल जमविलें. नाना धर्मांचे व नाना पेशांचे मित्र त्यांच्या परिवारांत आहेत. त्यामुळें त्यांचा दृष्टिकोन व्यापक व सहानुभूति सर्वस्पर्शी आहे. त्यांच्या काव्यांत निसर्गाचें प्रेम वर्णिलेलें आहे, प्रणयाच्या लीला रंगविलेल्या आहेत, राष्ट्रीय आकांक्षा उमटलेल्या आहेत; त्याप्रमाणें त्यांना लागलेला ‘ चिरंतनाचा ध्यासहि ’ सर्वत्र उमटलेला आहे. त्यांना ‘ शांती ’ची

प्यास लागलेली पुष्कळ काव्यांत दिसते. 'मंत्रमुग्ध माझी वृत्ती, मुकें मन, मुकी वाणी' ही त्यांची भूमिका त्यांच्या काव्याकाव्यांतून दिसते. ते राष्ट्रीय प्रवृत्तीचे असले तरी आध्यात्मिक वृत्तीचे आहेत—आणि या दोन्ही वृत्ति—प्रवृत्तींना अधिष्ठान आहे गाढ रसवत्तेचें.

## स्वतंत्र प्रतिभा

'बोरकर गुंगत कविता करतात का कविता करतां करतां गुंगून जातात' हें श्री. वि. स. खांडेकरांना कोडें आहे. तसें कोडें कोणाहि रसिकास पडावें इतकी काव्यात्म वृत्ति बोरकरांची आहे. तांबे व बालकवि यांच्याप्रमाणें ते अष्टौप्रहर काव्याच्या विश्वांतच रममाण असतात. काव्य जगणाऱ्या थोड्या भाग्यवंतांपैकीं ते एक आहेत. त्यांचें काव्य म्हणजे खरोखर त्यांचें जीवन-संगीतच. ते सदैव हें जीवन-संगीत आळवीत असतात आणि आळवितां आळवितां येणारे दिव्य अनुभव त्यांच्या काव्यांत शाश्वत रूप पावतात. "तांब्यांच्या अभिजात गायकीचा लौकिक व प्रसार वाढला तर हें 'जीवन संगीत' सार्थकीं लागलें असें मी समजेन" या संगीताच्या सुरांतच बोरकर बोलतात. याचा अर्थ त्यांची कविता केवळ अनुकरणात्मक आहे असा मात्र नाहीं. त्यांचें स्वतंत्रत्व त्यांच्या काव्याच्या अंतरंगांत स्पष्ट दिसतें. त्यांची बुद्धि स्वतंत्र व सूक्ष्म आहे आणि ती प्रखर चिकित्सा करणारी आहे. अनुकरणानें आंधळी बनणारी ती बुद्धीच नाहीं. त्यांच्या स्वर—सुंदर व भाव—निर्भर काव्य—गायनाइतकेंच त्यांचें विवेचक व समतोल गद्य भाषण ऐकणेंहि आल्हाद-दायक असतें. आणि संभाषणांत तर हे सारे गुण एकवटलेले असून त्यांचें भावपूर्ण हृदयहि ओतलेलें असतें. आस्था, ममत्व व सहानुभूति हे त्यांच्या स्वभावाचे विशेष गुण होत. 'जीवीं जीव घालून' ते दुसऱ्याच्या दुःखाशीं चटदिशीं समरस होतात. काव्य करण्याचे वेळींच तेवढी त्यांची भावना उसळ्या मारीत नाहीं. ती त्यांच्या बोलण्यांत, वागण्यांत हरघडीं दिसून येते. त्यामुळेंच त्यांचें काव्य रसिकांच्या हृदयाचा ठाव घेतें. त्यांच्या काव्यांत सृष्टि—वर्णनाचें वैभव आहे, प्रणयाचा विलास आहे, राजकीय

ध्येयवादाचा पडसाद आहे आणि तसाच ईश्वरी भक्तीचा जिव्हाळा पण आहे. या चारी गुणांवर मृदुल व मंजुल पद-लालित्याचा फुलोरा दरवळत आहे. ‘ करिं सुंदरि स्वर-शृंगार ’ किंवा ‘ क्षणभंगुर जरि जीवन सखे सुंदर करुं आपण ’ अशा पंक्ति त्यांतील विचार-सौंदर्याच्या आधीं शब्द-माधुर्यानेंच रसिकांचीं मनें जिंकून घेतात.

## संगीत व चित्रकला

काव्य, संगीत व चित्रकला या तिन्ही कोमल कलांची जादू बोरकरांच्या लेखणीमध्यें सांठविली आहे. तांबे-बालकवींप्रमाणें रम्य कल्पनेचें नर्तन त्यांच्या काव्यांत सर्वत्र आढळतें. त्याचप्रमाणें त्यांनीं अभ्यासिलेल्या चित्रकलेची व संगीत कलेची सोनेरी प्रभाहि त्यांच्या काव्यावर पडलेली दिसते. दोनचार ओळींतच तें एखादें वैशिष्ट्यपूर्ण शब्दचित्र सुरेख रीतीनें रंगवितात, एवढेंच नव्हे तर त्यांत निरनिराळे रंग भरण्याचें चित्रकाराचें कसबहि त्यांचे अंगीं आहे. स्वतःच्याच संवेदना ते आपल्या काव्यांत ओतीत असल्यामुळें त्यांचें काव्य स्वतंत्र व पृथक् आहे, तथापि ते तांबे यांना गुरु मानतात. १९३६ सालीं त्यांनीं आपली गुरुभक्ति प्रगट करणारें ‘ कविवर भास्करास ’ या नांवाचें कवन रचलें; त्यांत ‘ भास्कर ’ या शब्दावर श्लेष साधून सूर्याच्या कार्याचें वर्णन करतां करतांच तांब्यांच्या काव्याचेंहि वर्णन साधलेलें आहे.

## निसर्गाचें गौरव-गीत

पावसाळ्यामध्यें आकाशांत ढग भरून आले. त्यांचें शब्द-चित्र बोरकरांनीं अतिशय ललित-पद्धतीनें रेखाटलें आहे. त्याची चालहि आकाशांतील ढगांची गर्दी सूचित करणारी आहे. आणि निसर्गाचे चित्र-विचित्र रंगहि त्यांनीं मोठ्या कुशलतेनें या काव्यांत भरले आहेत, तें असें—“ गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले । शीतल तनु चपल चरण अनिलगण निघाले ॥ ” “ धुंद सजल हसित दिशा । तृणपर्णी सज्ज तृषा तृप्तींचे धन घनांत बघुनि मन निवालें ॥ ”

बालकवींनीहि ‘ श्रावणमास ’ चितारला आहे. बोरकरांनीं आपल्या

विशिष्ट शैलीनें रसिकांना ' श्रावण–दर्शन ' घडविलें आहे. तें असें—
" गिरिदरींतुनि झरे–नव्हे हे हिरे उसळती निळे । ढगाढगांतुनि अन् पाऱ्यापरि ऊन गळे कोवळे ॥ हवेंत फिरतें कुणी पाखरूं घुमत भिंगरी-परी । वर्ण रुपेरी लावुनि झुलती सुमनें दर्भांकुरी ॥ "

कोणत्याहि कवीच्या वर्णन–शक्तीला आव्हान देण्याइतकें भरघोस व हसरें सृष्टि–सौंदर्य बोरकरांच्या गोमंतकांत फुललेलें आहे. त्यांतील 'दूध–सागर' धबधब्याचें वर्णन करतां करतां त्यांनीं आनंदाचा व आशेचा संदेश दिला आहे.

## दिव्य भावाची प्रतीती

नुसती नादमधुर शब्द-योजना किंवा वर्णन-शैली अथवा कल्पना-शक्ति एवढीच सामुग्री काव्याला पुरेशी नाहीं. त्याच्या पोटांत खोल भावना व उदात्त विचार असावयास हवा तरच तें सत्काव्य ! या कसोटीला पूर्णपणें उतर-तील अशीं बोरकरांचीं बरींच काव्यें आहेत. त्यांतील क्रमानें व गुणानेंहि आद्य असणारें कवन म्हणजे ' तेथें कर माझे जुळती. ' गीतेंत सांगितल्या-प्रमाणें जेथें जेथें ' विभूतिमत्, श्रीमत्, ऊर्जित ' प्रगट झालेलें असेल. तेथें कोणाहि सहृदय माणसाचें शिर नम्र होतें व कर जोडले जातात. ह्या तत्त्वाला सगुण साकार स्वरूप बोरकरांनीं आपल्या कवितेंत दिलें आहे. "दिव्यत्वाची जेथ प्रतीती । तेथें कर माझे जुळती ॥" असा सिद्धांत सांगून बोरकर त्या दिव्यत्वाचे दाखले देतात. सर्वसामान्य व्यक्तीच्या हरघडीच्या जीवनांतहि असें दिव्यत्व दडलेलें असतें हें ते दाखवितात.

अशा त्यक्त–बहिष्कृत समाज–घटकांचें पूजन जो कवि करतो, तो राष्ट्रांतील डोळ्यासमोर घडणाऱ्या दिव्य घटनांना बहिरा किंवा पाठमोरा कसा होईल ! गांधीजी किंवा सानेगुरुजी यांचें जीवन म्हणजे अखंड यज्ञ होय. त्यांतून ज्या त्यागाच्या व सेवेच्या पवित्र ज्वाला निघाल्या, त्या पाहून कविचें हृदय बेभान नाचूं लागलें. १९४७ सालीं पंढरीच्या पांडुरंगाचें दर्शन हरिजनांना व्हावें म्हणून साने गुरुजींच्या ' पांडुरंगानें ' आमरण उपोषण सुरू केलें. ती वार्ता ऐकतांच बोरकरांनीं ' पंढरीस वाजे घंटा '

अशी घोषणा करून त्या घंटानादाचें रहस्य काव्यमय भाषेनें महाराष्ट्राला सांगितलें, तें असें–" पंढरीस वाजे घंटा पांडुरंग झाला जागा । झाडा मागाया उठल्या गोदा–भीमा–चंद्रभागा ॥ " " प्राण इरेला टाकून पांडुरंग रागें उगा । रडा रडा पश्चात्तापें दीनां आलिंगाया लागा ॥ " " न्हात न्हात आसवांनीं जोडा तुटलेला धागा । महारांच्या महाराष्ट्रीं लावा ब्रह्मत्वाच्या बागा ॥ "

'माझी पूजा' या कवितेमध्येंहि अशीच 'दिव्यत्वाची प्रतीती' देणारीं स्थळें कवीनें दाखविलीं आहेत. स्वतः जळून मातृभूमीचें मुख उज्ज्वल करणाऱ्या क्रांतिकारकांना आरंभीं वंदन करून, वडिलांना उद्देशून कवि म्हणतो, " तुम्हि चंदन, हित, शांति । आश्वासन, विश्रांति । पुण्योदक नयनांतील तुमच्या पाणी अभिषेकाचें ॥ " तसेंच श्रमजीवी लोकांचा गौरव करतांना कवि सांगतो, " भाग्य न माझें अन् श्रमिकांनो ! तुम्हांपरी खपण्याचें । पीक काढुनी ताट भराया षड्रस नैवेद्याचें ॥ " स्वतःकडे नम्र भूमिका घेऊन कवि म्हणतो, " घंटा झालों, स्रवलों स्तोत्रें, यश तुम्हां सर्वांचें । "

## गांधीजींचें विभूतिमत्व

गांधीजीबद्दल बोरकरांना गाढ आदर आहे. 'साबरमतीच्या कांठीं' या कवितेंत त्यांनीं आपला आदरभाव पुढील शब्दांनीं व्यक्त केला आहे, " महात्म्याच्या पावलांनीं । येथें धूळ झाली बुका । हवेमध्यें श्वास त्याचे । धूप यायचा न तुका । तुझी भक्ती, तुझा त्याग । तुझें तप आलें फळा । माझ्या भविष्याचा मार्ग । मला झाला ग मोकळा ॥ महात्म्याच्या संगतीचा । मला लाभला एकान्त । सहा महिन्यांत झाला । खरा स्वप्नींचा दृष्टांत ॥ गाऊं त्याच्या ओव्या गाणीं । शेकड्यांनीं, सहस्रांनीं । त्याच्या पावलांच्या खुणा । उमटवूं पानोपानीं ॥ चरक्याच्या तालावर । रचूं त्याचें रामायण । जीवनांत पदोपदीं । करूं त्याचें पारायण" । आणि कवि आतां 'महात्मायन' या नांवानें गांधीजींचें रामायण रचीत आहे.

एक साधी घटना ! केवळ एक चुकामूक ! पण तिच्यांतून कवि बोरकरांनीं आपल्या प्रतिभेच्या नजरेनें केवढें महान् तत्त्व शोधून काढलें

व किती प्रभावी रीतीनें तें मांडलें ! मुंबई येथें १९४५ सालीं गांधीजी असतांना त्यांची नेहमींची सायं प्रार्थना होई. त्या प्रार्थनेस हजर राहण्यासाठीं कवि निघाला पण उशीर झाला. समुद्राला साक्षी ठेवून सायंकाळची प्रार्थना गांधीजींनीं संपवली होती आणि ते आपल्या निवासस्थानाकडे निघाले होते. तें जातांना त्यांचें फक्त ओझरतें दर्शन कवीला झाले. महात्मे व समाज यांचीहि चुकामूक जगाच्या इतिहासांत अशीच होत आली आहे. थोर विभूतीचें ओझरतेंच दर्शन मानवसमाजाला घडलें आहें हें महान् तत्व कवीनें या कवितेंत मोठ्या कौशल्यानें सूचित केलें आहे. यांतील 'दधीची, हरिजन,' इत्यादि शब्दन्शब्द अर्थपूर्ण आहे. "डोळ्यांत घेउनी प्राण।" कवि दर्शनासाठीं उभा राहिला. "राजमार्ग उघडा झाला। सुखकंपानें देह फुलला। प्रभु साकार दिसला." असें वाटून कवि गांधीजींच्या मूर्तीचें वर्णन पुढील वेचक शब्दांनीं करतो. "ती मूर्ति साजिरी ज्योति कर्पूरगौर। ऋत–शांति–अहिंसा दलित स्फूर्ति गंभीर। गंगेपरि गेली पुढुनी संथ गतीनें। निःशब्द प्रीतिनें जीववुनि दोन्ही तीर। यांतील 'गंगेपरी गेली पुढूनी संथ गतीनें' हीं ओळच मुळीं त्या थोर विभूतीच्या गतीचें गांभीर्य मूर्तीमंत उभें करतें. ज्या रस्त्यावरून महात्माजी चालत गेले, तो 'जनसेवक पंथ तो कृतार्थ झाला आज।' असें वाटून कवि म्हणतों —'धजलों न तया मी तुडवाया या चरणीं।" आणि अशी प्रार्थना देवापाशीं करतो. "तें भाग्य पथाचें द्या हो या जीवाला।" आणि योगायोग असा कीं, त्या घटकेपासून बोरकरांच्या जीवनांत क्रांति झाली. त्यांच्या आयुष्याचें नवें पान उलटलें गेलें. केवळ काव्यांत गुंगत राहणारा त्यांचा आत्मा प्रत्यक्ष जीवनांत उडी घेऊं लागला आणि महात्म्याचा मार्ग अनुसरूं लागला.

आणि गांधीजींची हत्या ! अतिमानुष जीवाचा तो अमानुष अंत ! त्यांचे रहस्य पूर्णपणें उकलणारी कविता अद्याप मराठींत एकहि निर्माण झालेली नाहीं. कविवर्गहि स्तिमित–सुन्न झाला. काव्य रचनेला अवश्य ती प्रशांत मनःस्थिती त्यांना लाभलीच नाहीं. दु:खाचे चीत्कार मात्र कांहीं कांहीं कवींनीं काढले आहेत. बोरकर 'हंसत लावा वज्रटिळा' या कवितेंत

गांधी-हत्येचा परिणाम असा वर्णन करतात, "खिस्त गाळितो मूक आंसवें, दुःखी बुद्ध बुडाला हो । डंख कलीचा सात युगांचा जडला वंशवडाला हो ॥"

आणि शेवटीं मरून अमर झालेल्या त्या महात्म्यालाच कळवळून ते विचारतात, "या हत्येचें पातक खडतर किती पिढ्यांना जाळिल हो ? । कोण तुम्हांविण निज हृदयानें तात ! तयांना क्षाळिल हो ? ॥"

पं. जवाहरलालांवर त्यांनीं अलीकडे केलेली एक कविता तर डॉ. टागोरांच्या उंच पातळिला स्पर्श करणारी आहे.

रसिकता व विरक्ति या दोन्ही वृत्ति बोरकरांच्या काव्यांतून वहात आहेत. राष्ट्रप्रेम व सृष्टिप्रेम या दोन्ही प्रकारच्या रस-धारांनीं त्यांचें काव्य पोसलेलें आहे. पुराण संस्कृति व नवीं ध्येयें यांच्या संगमावर त्यांच्या काव्याचा ताजमहाल उभा आहे. "मज लोभस हा इहलोक हवा" अशी आपली आकांक्षा नाना दृष्टांतांनीं व्यक्त करतांना ते म्हणतात, "शास्त्रांचा अभ्यास हवा, परि मानव्याचा ध्यास हवा ॥ तृप्ति नको मज मुक्ति नको पण येथिल हर्ष नि शोक हवा । शोक हवा परि वाल्मिकीच्यापरि सद्रव अन् सश्लोक हवा । ? मराठीचे वाल्मिकी बनण्याइतकी भावनांची संशुद्धि व समृद्धि बोरकरांचे अंगीं बीजरूपानें आहे; तिचा रम्य साक्षात्कार त्यांचें 'महात्मायन' करुन देईल काय ?

## अभ्यासाच्या वाटा

( १ ) 'बोरकरांचें पहिलें काव्यगायन' या घटनेचें वर्णन करा.

( २ ) 'बोरकर काव्यमय जीवन जगतात' हें कसें ध्यानांत येतें ? यामुळें त्यांच्या काव्याचें स्वरूप कसें झालें आहे ?

( ३ ) बोरकरांनीं निसर्गवर्णनें कोणत्या कवितांतून केलीं आहेत ? त्या वर्णनाबद्दल तुम्हांस काय वाटतें ?

( ४ ) 'तेथें कर माझे जुळती' ही कविता अभ्यासा; त्या कवितेंतील तत्त्व आपल्या शब्दांत लिहा.

( ५ ) 'म. गांधींजींच्या दर्शनानें बोरकरांच्या जीवनांत क्रांति झाली,' या घटनेची माहिती देऊन क्रांतीचें स्वरूप कोणतें तें स्पष्ट करा.